
# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०२०




वर्ष चौदावे, अंक पाचवा, जानेवारी २०२१
मासिक अंकाची किंमत रु.पाच, वार्षिक वर्गणी रुपये १००/- (विशेषांक रु.२५/-)

CalCon
Instrumentation - Calibration

## Our Vision

Our aim is serve every process industry, they should not suffer any production loss due to non- availability of process measuring.

## Our Purpose

We want to make sure that every process industries instrumentation need shall be catered with our PROBLEM WIIL BE SOLVED policy.

## Our Mission

To give complete time-bound solutions, with competitive price, justifying the value. Use appropriate technology, backed by committed, efficient, and trained technical support team for complete peace of mind of the client, to run their operation.

To build a long term relationship and trust.

To be among the biggest stockiest of measuring instruments with in-house calibration and certification facility.

**WE ARE SPECIALISED IN:**

### Calcon Instrumentation & Sales LLC (Calibration laboratory)


Pressure


Temperature


Linear


Electrical


Mass

### Calcon Technical supply & Services LLC (Trading of Measuring Equipments)




**OUR SATISFIED CUSTOMERS:**

- Dubai Metro, GE-Energy & Power, Nestle, PEPSI, National Oil Well etc...
- Atlantis, Hilton, Taj, Habtoor, Novatel, Ramada, Address Federal Foods etc...
- Farnek, Serco, Imdaad, Etisalat, BK Gulf, Emrill, Lootah BC Gas, Middle East Fuji, etc...
- Wade Adams BILT, Imdaad, Emmar, Sobha Group, Eagle ElectroMechanical, Khansaheb etc..




**Calibration Laboratory:**
**Calcon Instrumentation & sales LLC (ISO9001-2015)**
PO Box: 119246, Dubai - United Arab Emirates,
Email: calibration@calconuae.com,
Tel.+971 4 222 8181, Fax: +971 4 222 8141, Makani No. 29921 96260

**Trading:**
**CalCon Technical Supply & Services LLC,**
PO Box: 119246, Dubai - United Arab Emirates,
Email: sales@calconuae.com,
Tel.: +971 4 2273 447, Fax: +971 4 2273 407, Makani No. 29942 96234

**CalCon Technical Supply & Services Sharjah Branch (LLC),**
PO Box: 24015, Sharjah-United Arab Emirates. Email: Calcon06@eim.ae
Tel.: +971 6 543 9160, Fax: +971 6 543 9162

**www.calconuae.com** **Cell No. +971 50 6504392**

GEFRAN | TRERICE | Brannan | fantinelli | TERMOTECH | FineTek | Orion Instruments | TA CHEN | KRUEGER SENTRY GAUGE | KOBOLD

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०२०


**संपादक**
श्री. जयंत कवठेकर
**कार्यकारी संपादक**
श्री. सुनील कुलकर्णी
**संपादकीय मंडळ**
सौ. मंजुषाताई कुलकर्णी
श्री. निलेश धायरकर
सौ. कोमल धायरकर



**दूरध्वनी संपर्क**
श्री. जयंत शंकर कवठेकर
संपर्क दूरध्वनी क्र. (घर) ०२०-२४२२१२९४
(कार्यालय) ०२०-२६१२१७०४
भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६



किंमत रूपये ५/-
वार्षिक वर्गणी रूपये १००/- (विशेषांकासह)
आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त
चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी
या नावाने काढावा.


## अंतरंग


❖ हृद्गत
❖ अध्यक्षीय मनोगत
❖ विशेष लेख
❖ विभागशः वार्षिक वृत्त
❖ आर्थिक आवाहन
❖ दैनंदिन शाखा व प्रकल्पांचे पत्ते



❖ छपाई ❖

प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक श्री. नंदकुमार कानडे यांनी प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून व प्रकाशक श्री. विश्वास विनायक कुलकर्णी, यांनी २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ – श्री. रवी देव,** ग्राफी ॲडव्हर्टायझिंग अँड मार्केटिंग

# 'स्व'–रूपवर्धिनी कार्यकारिणी


## सन्माननीय सभासद

✻ पद्मश्री मा. प्रतापराव पवार ✻ मा. डॉ. प्रमोद चौधरी

## संस्थापक सदस्य

✻ कै. पु. व. श्रॉफ ✻ कै. दत्तोबा तांबे ✻ कै. रा. प. देसाई

✻ कै. कृ. ल. पटवर्धन ✻ कै. अ. न. गोगावले

✻ कै. कां. गि. शहा ✻ कै. कृ. गो. लवळेकर ✻ श्री. श्री. शं. सामळ

## विश्वस्त मंडळ

**अध्यक्ष**
पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर

**उपाध्यक्ष**
श्री. उदय गुजर
श्री. शिरीष पटवर्धन

**कार्याध्यक्ष**
श्री. रामभाऊ डिंबळे

**सहकार्याध्यक्ष**
प्रा. डॉ. संजय तांबट (संघटन कार्य)
श्री. विश्वास कुलकर्णी (प्रशासन आणि प्रकल्प)

**कोषाध्यक्ष**
श्री. विलास कुलकर्णी

**सहकोषाध्यक्ष**
श्री. सुमित डोळे

**कार्यवाह**
श्री. विश्वास कुलकर्णी

**सहकार्यवाह**
श्रीमती पुष्पाताई नडे (महिला विभाग)
श्री. विनोद बिबवे (शाखा आणि युवा विभाग)
श्री. अरविंद केळकर (प्रशासन आणि प्रकल्प)
श्री. अमोल उंदरे (विकास आणि विस्तार)

**सदस्य**
श्री. कन्हैयालाल बलदोटा
डॉ. विनेश नगरे

**विश्वस्त मंडळाचे मानद सदस्य**

✻ पद्मश्री श्री. मिलिंद कांबळे ✻ श्री. सुधीर दरोडे ✻ श्री. अविनाश धर्माधिकारी ✻ कॅ. (नि.) सनतदादा भाटे



**पंजीकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नोंदणी क्र. :** MAH/588/Pune/80

**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६०**

**PAN No. : AAATS 5461K**



संपर्काचा पत्ता : – 'स्व'–रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११.

दूरध्वनी : – (कार्यालय) – (०२०) २६१२१७०४, मो. :९०११३८६३८६

भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (शिरीष पटवर्धन), ८६००१०१३०७ (विश्वास कुलकर्णी), ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे), ९०२९०७४५२१ (निलेश धायरकर)

ई–मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org


**धनादेश 'स्व'–रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

देणगीसाठी आयकर सवलतीचा तपशील :

**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**

गतवर्षाच्या, म्हणजेच २०२० सालाच्या कालावधीत 'स्व'-रूपवर्धिनीच्या विविध उपक्रमांची प्रगती कशी झाली ते सर्व सहानुभूतांस सांगण्यासाठी हा वार्षिक वृत्ताचा नित्यक्रम आहे.

२०२० साल एका भयकारी दुःस्वप्नाचे वर्ष होते. अजूनही ते संपलेले नाही. येत्या वर्षभरात आपल्यापुढे या कोरोना संकटातले अजून काय वाढून ठेवले आहे, त्याचा अंदाज येत नाही. इंग्लंड-अमेरिकेतली पुढची लाट पुन्हा जगाला व्यापील की लस टोचून आपण सुरक्षित राहू शकू, ते अजून कळायचे आहे. तथापि या वर्षी आपल्याला विषाणूंचे विज्ञान ठाऊक झाले आहे आणि आपण पुरेशा तयारीनिशी दोन हात करायला सिद्ध आहोत. तेव्हा २०२१ हे गतवर्षीप्रमाणे आपल्याला बेसावध पकडणार नाही. त्यामुळे अर्थव्यवहार चालू ठेवून हा लढा सारेजण लढू शकू.

हे सारे सांगण्याचे कारण एवढेच की, ज्या ज्या उपक्रमात माणसे एकत्र जमणे हाच पाया असतो, ते सारे उपक्रम कोलमडले आहेत. त्यामुळे शिक्षणावर सर्वात मोठा आघात झाला आहे. त्याच बरोबरीने पर्यटन, धर्मस्थळे, हॉटेल्स, समारंभ या साऱ्यांवर संक्रांत आली आहे.

यातला शिक्षणावरचा, विशेषतः गरीब मुलांच्या शिक्षणावरचा आघात फार दूरवर परिणाम करणारा आहे. लर्न फ्रॉम होम (घरातूनच/ऑनलाईन शिका) हे तंत्रदृष्ट्या श्रीमंतांनाच शक्य आहे. गरीबाच्या मुलांना कुठले आहेत स्मार्टफोन आणि इंटरनेट? त्यामुळे ही गरीब वस्त्यांमधली अभागी मुले हे वर्षच हरवून बसली आहेत.

वस्त्यावस्त्यांमधील १०-१० मुलांचे शिक्षणगट वस्तीमध्येच जमून आभासी वर्गाद्वारे (व्हर्च्युअल क्लासरुम) त्यांच्या शिक्षणगटात प्रक्षेपित होणाऱ्या संवादी तासिकांमध्ये (टू वे लर्निंग) सहभागी होत शिकू शकतील असे दिसते. या वर्षाच्या अखेरीला वर्धिनी हा अभिनव अध्यापन प्रयोग चिकाटीने राबवू पाहते आहे, त्याला निश्चितच यश येईल.

या दुर्दैवी वर्षात आपला शीर्षस्थ कार्यकर्ता ज्ञानेश पुरंदरे (ज्ञापु) अचानकपणे कोरोनास बळी पडला. वर्धिनीचा कार्यवाह म्हणून कार्यकर्ता गटाचे नेतृत्व करणारा हा योद्धा धारातीर्थी पडला. ही संघटनेची आणि आपल्यापैकी प्रत्येकाची न भरून निघणारी हानी आहे.

आता या सुमारे २५० कार्यकर्त्यांचे नेतृत्व कोण करणार, असा प्रश्न आपणा सर्वांनी परस्पर संवादाने उत्तमरीत्या सोडवला. आपल्या आयुष्याची किमान १० वर्षे या कार्याला देऊ इच्छिणारे पाच-दहा कार्यकर्ते या प्रसंगात उभे राहिले हे किशाभाऊंच्या कष्ट व पुण्याईचे फलित. त्या सर्वांमधून एकविचाराने श्री. विश्वास कुलकर्णी यांची कार्यवाहपदी नियुक्ती झाली. अतिशय कल्पकपणे आणि चिकाटीने नवनव्या कल्पना व योजना राबविणारा हा नवा कार्यवाह जोमाने कामास लागला आहे व त्याची फलिते दिसू लागली आहेत.

कै. किशाभाऊ पटवर्धनांची यंदा जन्मशताब्दी. या वर्षात आपण कार्यकर्त्यांनी हिरीरीने पाच प्रकल्पांचा नवा संकल्प प्रकटपणे मांडला. या पाचातील तीन संकल्प मार्गी लागले. २६ जानेवारी २०२० ला अठरापगड विद्यालय सुरू झाले. ११ वस्त्यांतून वेगवेगळ्या १८ वंचित जातींमधली १०० मुले आपण घरोघरी हिंडून निवडली. त्यांचे दर आठवड्यात दोन सत्र असे एकत्रीकरण सुरू झाले. त्या शिक्षणपद्धतीचे नवे प्रयोग आकारास येत असतानाच मार्च १९ मध्ये कोरोनाने त्यात खंड पडला आहे. आता त्याचा पुनश्च 'हरि ॐ' करणारच आहोत. या जिव्हाळ्याच्या अभिनव शिक्षण प्रयोगाकडे शिक्षणक्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे. वर्धिनीची यामध्ये कसोटी लागणार आहे.

दुसरा संकल्प प्रगतीपालक योजनेचा. अशिक्षित, अर्धशिक्षित पालकांची १३० मुले निवडून त्यांना

शैक्षणिक दिशा देणारे जाणकार पालक (मेंटॉर्स्) जोडून देण्यासाठी आपले कार्यकर्ते शिवाजी खरात यांनी खूप मेहनत घेतली आहे. गरीबाचे मूल आता उपेक्षित राहणार नाही. त्याच्या प्रगतीला खतपाणी घालणारा आपुलकीचा, जाणता प्रगतीपालक वर्धिनीने जोडून दिला आहे. ह्या वर्धकाने काय वाचावे, काय काय शिकावे, कुणाशी दोस्ती करावी, आहार-अभ्यास कसा करावा यावर घारीसारखे लक्ष ठेवणारा प्रगतीपालक त्याला मिळाला आहे.

तिसरा प्रकल्प 'किशाभाऊंची मुले' या शीर्षकाखाली गेल्या चाळीस वर्षातील १०० वर्धकांचे शिक्षणानुभव नोंदवण्याचे काम. वर्धिनीच्या प्रेरक शिक्षणतंत्राची मर्मे उलगडणारा लेखन प्रकल्प डॉ. संजय तांबट यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गी लागला आहे. १३ मेच्या वर्धापनदिनापर्यंत याचे प्रकाशन होईल असे योजले आहे.

पाचापैकी अजून दोन प्रकल्प कोरोना संकटामुळे आणि आपल्यातील काही अंगभूत उणीवांमुळे अजून मार्गी लागायचे राहिले आहेत. शिक्षणहक्क कायद्याने गरीबांची मुले खरोखरीच चांगल्या शाळांमध्ये रुजू व्हावीत यासाठी अभ्यास व चळवळ उभी करावयाची आहे. या कामात अजून जोम भरलेला नाही, हे खरे. येत्या वर्षात हे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे.

पाचवा प्रकल्प मुलींच्या वसतीगृहाचा. इथेही ओंकार न्यासाचे वर्धिनीत विलीनीकरण लांबल्याने काम मार्गी लागलेले नाही. नुकताच काही कार्यकर्त्यांनी या प्रकरणाचा पिच्छा पुरवायचा निश्चय केला आहे. आता हा संकल्प पूर्ततेस जाईल अशी आशा आहे.

चऱ्होलीच्या कौशल्य केंद्राची वास्तू आता पूर्ततेकडे वाटचाल करीत आहे. गरजू विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त कौशल्ये शिकवण्याचे मोठेच आव्हान आता पेलावे लागणार आहे. मा. शिरीष पटवर्धन हे यासाठी गेले वर्षभर अखंड कष्टत आहेत; त्यात नक्कीच यश येईल.

कोरोनाकाळात गरजू कुटुंबांना घरोघर शिधा साहित्य पोचवण्याचे काम कै. ज्ञानेश पुरंदरे सरांनी मोठ्या धारिष्ट्याने पुढे नेले. लक्षावधी रुपयांचे साहित्य त्यांनी पात्र कुटुंबांपर्यंत पोचवले. आपल्या युवक-युवती विभागाने मुलांना सातत्याने शैक्षणिक रसद पोचवण्याची अभिनव पद्धत राबवली. आपल्या युवांनी कोरोना योद्धा म्हणून केंद्रांमध्ये योगदान दिले. ही सारी वर्धिनीची अभिमानास्पद परंपरा उत्कृष्टपणे या कठोर काळातही आपल्या युवक-युवतींनी जिवंत ठेवली आहे.

**- श्री. रामभाऊ डिंबळे,**
कार्याध्यक्ष

❖ ❖ ❖

# नवीन पर्वाचा संकल्प



**'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी १८ ऑक्टोबर २०२० रोजी ऑनलाईन सर्वसाधारण सभेत केलेले मार्गदर्शनपर भाषण.**

नमस्कार. 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचा अध्यक्ष या नात्याने मी सर्वांना शुभेच्छा देतो. सर्वप्रथम माझे मित्र प्राज इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष आणि आपल्या संस्थेचे सन्माननीय सदस्य डॉ. प्रमोद चौधरींचे अभिनंदन करतो. औद्योगिक जैवतंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण संशोधनाबद्दल त्यांना देण्यात आलेला जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रथमच एका भारतीयाला मिळत आहे हा त्यांचा मोठा सन्मान आहे.

### कार्व्हरचे वारसदार

जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर हे १९ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि २० व्या शतकाचा पूर्वार्ध या काळात लोकोत्तर कार्य करणारे शेती संशोधक होते. बायोटेक्नॉलॉजी इनोव्हेशन ऑर्गनायझेशन (BIO) ही जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक स्तरावरील सर्वात मोठी व्यापारी संघटना आहे. ती २००८ पासून हा पुरस्कार देते आणि तो मिळवणारे आपले प्रमोद चौधरी हे पहिले भारतीय आहेत. पुरस्कारासोबत त्यांना देण्यात आलेल्या मानपत्रात असे गौरवोद्गार काढण्यात आले आहेत की ''शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना पूरक असे औद्योगिक जैवतंत्रज्ञान वापरून ते सातत्याने उत्तम काम करत आहेत. डॉ. चौधरी हे कार्व्हर यांचा वारसा पुढे चालवत आहेत.'' ही आपल्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे.

### ज्ञानेशच्या जाण्याचे दुःख

दुसरी गोष्ट म्हणजे आज ज्ञानेशची फार आठवण येते. एक वर्षापूर्वी ही जेव्हा सभा झाली होती त्यावेळी जर कुणी म्हटलं असतं की ही सभा तुम्ही फिजिकल नाही तर डिजिटल करणार आहात आणि त्यावेळी ज्ञानेश नसणार आहे तर मला हे पटलं नसतं. समाजासाठी अविरत झटणारा, राष्ट्रीय विचारांची सतत जागरण करणारा, युवा-युवतींचे प्रचंड प्रेम मिळवणारा, गोर-गरिबांच्या आयुष्याचं सोनं करणारा, भटक्या तरुणांना दिशा दाखवणारा असा ज्ञानेश आपल्या सभेत नाही याचं फार दुःख होत आहे. पण आपल्याला पुढे जायला पाहिजे.

आता कोरोना विषाणूचे मोठं संकट आपल्यावरच नव्हे तर सबंध जगावरच आले आहे. त्यात प्रचंड नुकसान झाले आहे. त्यात गरीबांचं जास्तीत जास्त नुकसान झालं आहे. दारिद्र्यरेषेखाली जी १० कोटी कुटुंबे होती ती आणखी दारिद्र्यात ढकलली गेली. त्यांना दारिद्र्यातून बाहेर काढण्याचे अनेक वर्षांचे काम १०० दिवसांमध्ये उद्ध्वस्त झाले. जवळजवळ कोट्यावधी मुलं शाळेतून बाहेर फेकली गेली. त्यांना घरातूनच अभ्यास करणे भाग पडले. समाजातील विषमता हळूहळू कमी होत होती. ती या १०० दिवसांत पुन्हा वाढली.

### दुर्दम्य इच्छाशक्ती

हे अभूतपूर्व असं कोरोनाचं संकट आहे. पण या संकटात आपल्याला मानवाची जिद्द व चिकाटी दिसली. आपण पाहिले की ज्योती पासवान या १५ वर्षाच्या मुलीने हिमाचल प्रदेशमधून बिहारमध्ये जाण्यासाठी वडिलांना मागे बसवून १२०० किमी सायकल चालवली तीही आठ दिवसांमध्ये. संकटाच्या प्रसंगी अशी प्रचंड इच्छाशक्ती

आपण दाखवतो. अशी दुर्दम्य इच्छाशक्ती आपण – 'स्व'-रूपवर्धिनीने दाखवली. लोकसंख्येची घनता जास्त असल्याने पुण्याच्या सेवावस्त्यांमध्ये कोरोना पॉझिटिव्ह प्रमाण बरंच वाढलं पण मला आपल्या कार्यकर्त्यांचा फार अभिमान वाटतो. त्यांनी सेवेच्या वेगवेगळ्या कामात स्वतःला झोकून दिलं. मग ते प्रायमरी स्क्रिनिंग असो, कष्टकरी समाजातील आपल्या बांधवांच्या घरी जाऊन धान्य पुरवणं असो, ऑनलाईन पैसे जमा करणं असो. शेकडो घरातील कुटुंबांची विवंचना मिटवण्यासाठी आपण मदत केली; समाजातील ज्येष्ठ व वृद्ध व्यक्तींना मानसिक आधार देण्याचे महत्त्वाचे कामही आपल्या कार्यकर्त्यांनी केले. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या एका भाषणात मी याचा उल्लेख केला आहे.

मला आठवते, ज्ञानेशचा आणि माझा शेवटचा ई-मेल संवाद झाला तो १३ मे ला. त्यात ज्ञानेशने वर्धिनीच्या कोरोनाविरुद्धच्या लढ्याचं वर्णन केले आहे, 'अंतराळात जाताना अंतराळवीर स्पेस सूट परिधान करतो तेव्हा जसा त्याला अभिमान वाटून येतो तसा अभिमान या आरोग्य तपासणी मोहीम करताना तो पीपीई कीट अंगावर चढवला की आमच्या कार्यकर्त्यांना वाटतो.' माझ्या मते ज्ञानेशचे हे स्फूर्तिदायक शब्द म्हणजे 'स्व'-रूपवर्धिनीचे इंधन आहे. ऊर्जा आहे आणि प्रेरणाही आहे. म्हणून या कोरोना संकटातून बाहेर पडण्यासाठी आणि बाहेर पडल्यानंतरही हा जो धास्तावलेला समाज आहे, अस्वस्थ झालेला देश आहे त्यावर आपण काय काय करायचं यावर आपण आज चर्चा करणार आहोत. रामभाऊ नेहमी म्हणतात की हा जगन्नाथाचा रथ आहे आणि तो पुढे जाण्यासाठी सगळ्यांचे हात लागतात, पण इथे जगन्नाथाच्या रथाला सगळ्यांची डोकी पाहिजेत, सगळ्यांच्या कल्पना पाहिजेत, विचार पाहिजेत. हा जो सामुदायिक विचार आहे तो प्रत्येकाने करुयात.

'स्व'-रूपवर्धिनीची खासियत काय ? तर आपण केवळ प्रश्नात अडकून बसत नाही. त्यामुळे आपण सर्व मिळून कोरोनाच्या संकटावर मात करून पुढे कसे जायचे या संबंधी चर्चा करणार आहोत. मी आता सुरुवातीला माझे काही विचार मांडतो आहे आणि आपल्या सगळ्यांच्या कल्पना ऐकल्या की त्यावरही माझे काही विचार आणि मत मांडणार आहे.

**७७ सेकंदाची गोष्ट**

आताचे भाषण संपवताना मी तुम्हाला एक गंमत सांगतो. जगभरातल्या महाराष्ट्रीय लोकांची 'गर्जेमराठी' नावाची संस्था आहे. त्यांचे मुख्यालय कॅलिफोर्नियात आहे आणि २५ देशांमध्ये केंद्रे आहेत. १ ऑगस्ट २०२० ला त्यांच्या एका कार्यक्रमाचा मी अध्यक्ष होतो आणि त्यावेळी मी त्यांना म्हटलं की तुम्ही सगळे इथे म्हणजे अमेरिकेत आहात आणि भारतात काय चाललंय आहे याची तुम्हाला कल्पना हवी.

मी त्यांना २३ जुलै २०२० रोजी एका वृत्तपत्रात आलेली मुख्य बातमी (हेडलाईन) सांगितली – 'मुकेश अंबानी जगातले चौथ्या क्रमांकाचे श्रीमंत'. त्याखालीच हिमाचल प्रदेशमधल्या कुलदीप कुमार या गरीब माणसाची बातमी होती. त्यांनी आपली एकुलती एक गाय विकली ६००० रु. साठी; कारण का तर त्यांच्या दोन मुलांना शिकण्यासाठी स्मार्टफोन विकत घ्यायचा होता. मी त्यांना म्हटले की वर्तमानपत्राच्या एकाच पानावर दिसणारी भारतातील ही विषमता पहा. कोरोनामुळे अनेक गरीब मुले शिक्षणाबाहेर फेकली जात आहेत. E-learning साठी त्यांच्याकडे डिजिटल सुविधा पाहिजेत. या मुलांकडे स्मार्टफोन, आय-पॅड कुठून येणार ? या रघुनाथ माशेलकरला ६० रु. शिष्यवृत्ती मिळाली आणि तो शिकला. पण आता शिष्यवृत्ती देऊन भागणार नाही. जगात जवळजवळ ३० ते ३५% मुलांना ऑनलाईन सुविधाच नाहीत तर त्यांना डिजिटल साधने पाहिजेत आणि इंटरनेटची जोडणीही.



**परिस्थितीनुसार कितीही कष्ट उपसण्यासाठी निरोगी, सुदृढ, कार्यक्षम असं शरीर आणि उत्साह तुमच्याजवळ असला पाहिजे.**

मी फक्त ७७ सेकंदांत हा विषय मांडला. त्यात उपस्थित काहींनी २४ तासात १ दशलक्ष डॉलर (७-८ कोटी रुपये) निधी गोळा करण्याचे ठरवले. त्यातून भारतातल्या गरजू मुलांना ते २५००० लॅपटॉप देणार आहेत. मी त्यांना 'स्व'-रूपवर्धिनीची विस्तृतपणे माहिती दिली आणि सांगितले की ते मुलांपर्यंत योग्य रीतीने पोहोचेल का आणि त्याचा नीट वापर होत आहे ना तेही पहा. केवळ देणगी देऊ नका तर सामाजिक कामात सहभागी व्हा. सामाजिक संस्थांचे पार्टनर व्हा. त्यातून परिवर्तन घडेल.

'नवीन पर्व के लिए नवीन प्राण चाहिए' या गीतात म्हटल्याप्रमाणे आपण आपल्या कल्पनांमधून समाजात नवीन प्राण आणुयात.

❖ ❖ ❖

## डॉ. माशेलकर यांचे मनोगत - उत्तरार्ध

### न्यू नॉर्मल

''कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत जिला आपण 'न्यू नॉर्मल' म्हणतो, तीत डिजिटल तंत्रज्ञान सगळ्यांनी स्वीकारले आहे. उदा. घरातून काम (Work from Home) हे काही आपल्याला नवीन नाही. माहिती तंत्रज्ञान सेवेचा भारतात विस्तार झाल्यापासून कोट्यावधी लोक या क्षेत्रात आहेत. जग २१ व्या शतकात प्रवेश करताना Y2K चा प्रश्न संगणकाधारित सेवांसाठी आव्हानात्मक होता तोही आपण सोडवला.

पण आता कोरोनाच्या संकटामुळे याचा वेग खूपच वाढला आहे. गेल्या शंभर दिवसांमधील हा मुख्य बदल आहे. याआधी डिजिटल लर्निंग, ऑनलाईन लर्निंग, टेलिमेडिसिन हे चालू होतं पण हळूहळू. इंग्लंडमधील एक तज्ज्ञ म्हणाले की टेलिमेडिसिन क्षेत्रात दहा वर्षात जे आम्ही केलं नसतं ते दहा दिवसात झाले. ई-कॉमर्समध्येही चार महिन्यात मोठी उलाढाल झाली. अमेरिकेतील लोकांचा हाच अनुभव आहे. या सर्वात 'वेग' हा घटक जास्त महत्त्वाचा आहे. त्यामुळे आपली घरेही बदलताहेत. कामही घरातून, शिक्षणही घरातून आणि नेटफ्लिक्ससारख्या माध्यमातून मनोरंजनही घरातून अशा सगळ्या बदलांना आपल्याला सामोरे जावे लागणार आहे. आपण वर्धिनीतल्या कामांच्या नियोजन व समन्वयासाठी माहिती तंत्रज्ञान समिती (आयटी समिती) स्थापन केली ते योग्यच झाले. या समितीने खूप सुंदर काम केले आहे. त्यामुळे नवीन कल्पनांचा विचार करून त्यातील नव्या परिस्थितीचा (न्यू नॉर्मल) आपण विचार करायला हवा.

### डिजिटल विषमतेचा प्रश्न

दोन महिन्यांपूर्वी युनेस्को महासंचालकांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठांच्या कुलगुरुंची सभा बोलावली होती. त्यात कोविडमुळे उच्च शिक्षणाचे काय होणार ? यावर चर्चा झाली. कारण सध्या सगळीकडे शाळा, महाविद्यालये बंद आहेत. त्यावेळी मी डिजिटल विषमता, डिजिटल साधनांची कमतरता याबद्दल बोललो आणि ज्या लोकांकडे ही साधनं नाहीत ते काय करणार असा प्रश्न मांडला. तेव्हा प्रसिद्ध अमेरिकन अर्थतज्ज्ञ जेफ्री सॅक्स यांनी शाश्वत विकासासंबंधीच्या, आधीच्या १७ उद्दिष्टांमध्ये सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स याची भर घालण्यास सुचविले. डिजिटल साधनांची उपलब्धता हा आता मूलभूत मानवी हक्क मानला जावा असे विचार त्यांनी मांडले. म्हणजेच यापुढे सर्व क्षेत्रात डिजिटलचा वापर अनिवार्य ठरणार असेल तर डिजिटल सुविधेच्या उपलब्धतेचा प्रश्न आपल्याला अग्रक्रमाने हाती घ्यावाच लागेल. त्यासाठी सर्वांना डिजिटलदृष्ट्या आत्मनिर्भर बनवावे लागेल.

त्याचे महत्त्व लक्षात येण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर केला तर त्याची व्याप्ती व परिणाम किती वाढतो,

याची काही उदाहरणे मी देतो. मी पुणे इंटरनॅशनल सेंटर या थिंक टँकचा अध्यक्ष आहे. या संस्थेनेही कोविड काळात खूप काम केलं आहे. आमचे तिप्पट कार्यक्रम झाले आणि तेही आंतरराष्ट्रीय स्तरावर. मिरॅकल व्हिजन फाऊंडेशनच्या कार्यक्रमात एरवी तीन-चारशे लोकं उपस्थित असायची तर ह्यावेळी साडेतीन हजार लोक उपस्थित होते. त्यामुळे पुढच्या वर्षीचे लक्ष्य आम्ही दहा हजार ठरवलं आहे. आपल्यालाही अशा डिजिटल साधनांचा वापर करून आपली व्याप्ती आणि परिणाम कसा वाढवता येईल याचा विचार केला पाहिजे. म्हणून मला आपली ऑनलाईन शिबिर ही कल्पना खूपच आवडली.

**बाल व वृद्धांची सांगड**

आपले 'स्व'-रूपवर्धिनीचे काम शैक्षणिक क्षेत्रात जास्त प्रमाणात आहे. त्याचबरोबर आरोग्य ही महत्त्वाचं आहे. सर्वसामान्य लोकांपर्यंत 'चांगलं आरोग्य' हा विचार कसा पोहोचवता येईल यासाठी आपण प्रयत्न करूयात. यासाठी समाजातील वेगवेगळ्या तज्ज्ञांची, लोकांची मदत घेता येईल. मी अध्यक्ष असलेल्या इंटरनॅशनल लाँगिव्हिस्टिक सेंटर (इंडिया) या संस्थेने वृद्धांसाठी डिजिटल आणि मोबाईल साक्षरतेचे कार्यक्रम घेतले आणि ते लोकप्रियही झाले. बुद्धीसंवर्धन, व्यक्तीमत्त्वसंवर्धन, ज्ञानसंवर्धन, मूल्यसंवर्धन यासाठी आपण काम करतो. मला वाटते की मूल्यसंवर्धनासाठी ज्या अनुभवी आणि ज्ञानी व्यक्ती आहेत, अनुभवी आहेत त्यांना आपण छोट्या मुलांशी जोडून घेतलं तर ते काम आणखी वेगळ्या पद्धतीने व चांगले करता येईल.

यासंदर्भात मी एक नवीन कल्पना पाहिली की, वृद्धाश्रम आणि अनाथाश्रम एकाच जागेत आहेत. वृद्ध व्यक्तीने एका अनाथ मुलाला दत्तक घ्यायचं अशा प्रकारच्या आपुलकीतून नवी सामाजिक जवळीक निर्माण होऊन नवीन सामाजिक अभिसरण होऊ शकेल. याचा फायदा दोन्ही घटकांना होईल. वृद्धांना तरुण झाल्यासारखं वाटेल आणि मुलांना चांगली मूल्यं व विचार मिळतील.

कोरोनाचं संकट कधी दूर होईल हे आत्ताच सांगता येणार नाही. पण ते दूर करण्यासाठी 'सामाजिक शिस्त' अतिशय महत्त्वाची आहे. मला आठवतेय की त्यासंबंधी ज्ञानेशने २४ मुद्दे मला पाठवले होते. ते मी पुढे शासकीय अधिकाऱ्यांना, मुख्यमंत्र्यांना पण पाठवले. त्याची जर नीट अंमलबजावणी झाली असती तर आज पुण्याची परिस्थिती चांगली असती. कोविडचे संकट अजून संपलेले नाही हे लक्षात ठेवून दोन व्यक्तींमधील सुरक्षित अंतर, मास्क वापरणं ही शिस्त आपण प्रत्येकाने पाळली पाहिजे. आपल्या बालवाडीच्या ताईंचा घरगुती मास्क वापरण्याचा व्हिडिओ खूपच छान होता. असे मास्क बनवण्याचा व्यवसाय आपल्या महिला करू शकतात.

**भारतीयांचा प्रतिसाद**

कोरोनाची महासाथ सुरू झाली, तेव्हा आपल्याकडे त्यावर औषधोपचार उपलब्ध नव्हते. चीनकडून डायग्नोसिस कीट आयात केले. पण ते खराब निघाले म्हणून परत पाठवले आणि आता आपण भारतात हे कीट बनवत आहोत. कोरोनाच्या जलद निदानासाठी माय लॅब संस्थेने जिद्दीने सहा आठवड्यात आरटी-पीसीआरचे कीट तयार केले. यातही दुर्दम्य मानवी इच्छाशक्तीचा आदर्श मीनल कांबळे यांनी दाखवला. गर्भवती असलेल्या मीनलताई या कीटसाठी आवश्यक रेग्युलेटरसाठीचा डाटा देऊन झाल्यावरच रजेवर गेल्या. अशा प्रयत्नांमुळे सध्या आपण पर्सनल प्रोटेक्शन इक्विपमेंट पीपीई कीट, व्हेंटिलेटर्स व कोरोनावरील औषधे बनवत आहोत. पीपीई कीट आपण निर्यात करतो आहोत. कोरोना प्रतिबंधक लस बनवण्यातही आपली चांगली प्रगती आहे.

जनुकीय व एकात्मिक जीवशास्त्र संस्था (इन्स्टिट्यूट ऑफ जेनॉमिक्स अ‍ॅण्ड इंटिग्रेटेड बायोलॉजी) या राष्ट्रीय

 **सेवाकार्य करताना माणसं आणि साधनं यांचा योग्य तो उपयोग करून घेण्याचं तंत्रही तुम्हाला अवगत असलं पाहिजे.**

प्रयोगशाळेने कोरोनासाठीची पेपरस्ट्रीप टेस्ट विकसित केली आहे. गर्भधारणा ओळखण्यासाठी जशी पेपरस्ट्रीप वापरली जाते तितकी ही निदान चाचणी सोपी आहे. यामुळे एका तासात फक्त ५०० रुपयात ही चाचणी होऊ शकली. आपल्या संशोधकांनी जगाच्यापुढे जाऊन हे संशोधन केले आहे.

अशा अनेक गोष्टी या सहा महिन्यात झाल्या. फक्त आपल्यातली सुप्तशक्ती – हनुमान जागा व्हायला हवा आणि त्याने उड्डाण करायला पाहिजे. ही क्षमता आपल्या देशातील तरुण वर्गामध्ये आहेच. श्री. मिलिंद कांबळे यांनी सांगितलेल्या अनेक स्टार्टस्अपमधून हे दिसून येते. आम्ही नोकऱ्या मागायला जाणार नाही, तर इतरांना कामे देणारे होऊ. अशी बदललेली मानसिकताही यातून दिसून येते.

किशाभाऊंच्या जन्मशताब्दीनिमित्त आपण जी उद्दिष्टे मांडली होती, त्यांची सिद्धी कोरोनामुळे जरा हळूहळू होत आहे. पण या कोरोनानंतरच्या काळात 'अठरापगड आगे बढ' आणि 'प्रगतीपालक' हे संकल्प जास्त मोलाचे आहेत. कारण दारिद्र्यरेषेखाली गेलेल्या कुटुंबांची संख्या वाढली आहे आणि अशा कुटुंबातील मुलांचे शिक्षण थांबायची भीती जास्त आहे. या संकल्पाच्या पूर्ततेला वेग यावा म्हणून लागणारी आर्थिक मदत आपण सर्वांनीच मिळून उभी करायची आहे. कोरोनाच्या काळातही आपण डिजिटल संपर्काच्या माध्यमातून ४० लाख रु. उभे केले. याचे कारण म्हणजे मानवता अजूनही जिवंत आहे. केवळ ७७ सेकंदांमध्ये केलेल्या आवाहनामुळे 'गर्जेमराठी'ने मोठे काम उभे केले. तसेच 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे समाजात मोठ्या प्रमाणात आवाहन करून देणग्या मिळवण्याचे काम आपण केले पाहिजे. पुढचा प्रवास खडतर आहे याची मला कल्पना आहे पण खडतर प्रवासातही मजा आहे. यातूनही आपण पुढे जात आहोत. 'नवीन पर्व के लिए, नवीन प्राण चाहिए !' असे आपण म्हणतो त्याप्रमाणे 'स्व'–रूपवर्धिनीच्या कामातही आपण नवीन प्राण नक्कीच आणू !

❖ ❖ ❖



## आत्मनिर्भर भारत



**'भारताचिया महारथा ह्या सारे मिळूनी ओढूया ।'**

**एका गीताचे हे ध्रुपद ! आज सर्वांनी ही ओळ प्रत्यक्षात आणली. अभिनंदनीय आणि अभिमानास्पद असा हा आजचा दिवस ! १६ जानेवारी २०२१. सर्व संशोधक, शास्त्रज्ञ, इंडस्ट्रीज ह्यांनी अत्यंत कमी वेळात, कमी पैशात, मोठ्या प्रमाणात कोरोना लस तयार केली, आणि प्रशासन, डॉक्टर्स, स्वयंसेवक आदी सर्वांनी ही लस अक्षरशः कोट्यावधी लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू केले. आजचा दिवस सर्व भारतीयांचा अभिमानाने उर भरून येण्याचा ! अविस्मरणीय !**

**ह्या सर्वांना 'स्व'-रूपवर्धिनीच्या परिवाराचा कडक सलाम !**

**आम्ही आपले कृतज्ञ आहोत.**

सेवाकार्य करताना आपल्यात भावनाशीलता आणि भावनांचं नियंत्रण यांचा सुरेख संगम हवा.

# दोन शब्द... ...मुखपृष्ठ आणि तळटीपांसंबंधी

'ध्येयधुंद' हा स्व. किशाभाऊंना मनापासून भावलेला अत्यंत आवडलेला शब्द. आपलं स्वतःचं आयुष्यही ते याच ध्येयधुंद वृत्तीने जगले. बालपणापासून झालेल्या नित्य संस्कारातून मातृभूमीला सर्वस्व अर्पण करणं हे ध्येय त्यांनी डोळ्यासमोर ठेवलं. कार्यकर्त्यांनी उसळत्या रक्तानं, वादळाच्या वेगानं पण ध्येयभान कायम राखत कार्य करीत रहावं. ध्येयाची मशाल अखंड तेवत ठेवत सागराची विशालता डोळ्यांसमोर ठेवत सतत कार्यरत रहावं त्याचबरोबर वैभवाचं दान आणि वैष्णवाचं वाण यातील समतोल राखत पुढे जावं.

स्व. किशाभाऊ आणि ज्ञानेशसारखा वर्धक यांच्या स्मरणखुणा जपत वर्धकांनी, कार्यकर्त्यांनी मातृभूमीच्या सेवेचा वसा कायम हृदयी धरावा.

'सेवेतून सेवेकरी घडावेत' अशा उदात्त भावनेनं स्व. किशाभाऊ वर्धिनीच्या सेवाकार्याचं फलित नेहमी सर्वांसमोर मांडत असत. अचानक ओढवलेल्या 'कोरोना'च्या भयानक आपत्तीमुळे हे फलित सिद्ध करण्याचं आव्हान वर्धिनीला स्वीकारावं लागलं आणि वर्धकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून सेवा वस्त्यात जाऊन सेवाकार्यात समर्पण भावनेनं सहभाग घेतला. सेवाकार्यात सदैव प्रेरणा देत राहतील, अशा एकनाथजींसारख्या कर्मयोगी साधकाच्या मार्गदर्शक विचारशलाका तळटीपांतून समोर ठेवल्या आहेत.

**मनोगत**

ज्या ध्येयवेड्या तपस्व्याची आपण जन्मशताब्दी साजरी केली त्याचंच जणू मनोगत, 'घाई करू नकोस' या श्रीमती संजीवनी बोकील यांच्या कवितेतून प्रकट झालं आहे. त्याचंच जणू हे काव्य रुपांतर !

'पांढरे निशाण उभारायची
घाई करू नकोस
मुठभर हृदया
प्रयत्न कर
तगण्याचा-तरण्याचा
अवकाश भोवंडून टाकणाऱ्या
या प्रलयकारी वादळाचाही
एक अंत आहे
काळाच्या तर निर्णायक बिंदूपर्यंत
लढत रहा
तुझ्या नाजूक अस्तित्वा निशी....
वादळे यासाठीच वापरायची असतात
आपण काय आहोत
हे तपासण्यासाठी नव्हे
काय होऊ शकतो
ते आजमावण्यासाठी...'

प्रिय वर्धकांनो !

आज मी खरंच तृप्त आहे. गेले काही दिवस आपल्या सर्वांचे परीक्षेचे दिवस होते आणि अजूनही आहेत. त्यात आत्तापर्यंत तुम्ही जे यश मिळवलं आहात ते वर्धिनीच्या म्हणजेच तुम्हा सर्वांच्या प्रयत्नांचे फळ आहे. राहून राहून आठवण येते ती माझ्या ज्ञानेशची ! त्याच्यासारख्या व त्याला साथसंगत देणाऱ्या आपल्यासारख्या वर्धकांमुळेच आपला देश तगण्याचा आणि तरण्याचा प्रयत्न करणार आहे, लढत राहणार आहे. या वादळाकडे, आपण काय होऊ शकतो हे आजमावण्याची एक संधी म्हणून पहा.

– तुमच्याच मनोगतातला किशाभाऊ

(केवळ तुमच्यामुळे वर्धकांनो जो जन्मशताब्दी साजरी होण्याचं निमित्त बनला.)



सेवाकार्य करताना आपल्याला जीवनाभिमुखच असलं पाहिजे; जीवनपराङ्मुख असून चालणार नाही.

# ज्ञापु नावाचा परीस

– मंदार पोफळे

ज्ञानेश नारायण पुरंदरे (ज्ञापु) यांचा ज्यांना परीसस्पर्श झाला, त्यांचे आयुष्य सोन्याहून पिवळे झाले. ज्यांच्या आयुष्यात नैराश्य आहे, जे दुर्बल आहेत, परिस्थितीचा ताप आणि गरिबीचा शाप ज्यांच्या आयुष्याला पूजलेला आहे अशांच्या आयुष्यात आशेचा किरण म्हणून सदैव सकारात्मक प्रकाश देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे पूजनीय ज्ञापु. या धावपळीच्या जगात इतरांसाठी कोणाला वेळ आहे ? पण माझ्या आयुष्यातला प्रत्येक क्षण इतरांसाठीच आहे असे म्हणत वातीसारखे जळणारे आणि त्यांच्या जीवनातील अंधःकार दूर करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञापु.

**ओजस्वी वक्ते**

शिवचरित्र, ऐतिहासिक प्रसंग, युगपुरुषांच्या कथा ज्ञापु महाराष्ट्रभर आणि देशभर सांगत. शिवजयंती आली की, त्या दिवसांत ज्ञापुंचा अखंड प्रवास चाले. गावकरी असोत, शहरातील वस्त्यांमध्ये राहणारे अशिक्षित बांधव असोत की उच्चभ्रू वस्तीतील सुजाण, सुशिक्षित नागरिक या सर्वांनाच आपल्या ओघवत्या शैलीत तल्लीन करून सोडणारे आणि अंगावर शहारे येतील अशा पद्धतीने त्यांच्या पुढे इतिहास जिवंत करणारे ज्ञापु. प्रवास करताना अगदी दोनचाकी गाडी, बस, रेल्वे अशा जमेल त्या कमी खर्चाच्या वाहनाने ज्ञापु प्रवास करत. मला चारचाकी वातानुकूलित गाडी पाठवा असा अट्टाहास त्यांचा कधीच नव्हता. व्याख्यानानंतर आयोजक मानधन म्हणून पाकीट पुढे करत; पण ज्ञापु ते कधीच स्वीकारत नसत. 'हे समाजाचे काम आहे; याचे पैसे मी घेत नसतो', असे म्हणत हात जोडून ते सर्वांचा निरोप घेत. शाखेतल्या लहान वर्धक-वर्धिका असोत, विशीतले तरुण-तरुणी असोत अथवा ज्येष्ठ नागरिक-ज्ञापुंचे बोलणे म्हणजे सर्वांना पर्वणीच. फक्त ऐकत रहावे, अफाट उर्जा घ्यावी आणि कार्याला गती द्यावी इतकी ताकद ज्ञापुंच्या शब्दांत होती.

**दांडगा संपर्क**

संपर्क हा ज्ञापुंच्या दिनक्रमातला अविभाज्य भाग. 'स्व'-रूपवर्धिनीच्या शाखा वाढल्या, अंतरे वाढली, काम वाढले; पण ज्ञापुंचा संपर्क कधी कमी झाला नाही. प्रत्येक वर्धक-वर्धिकेच्या घरी ज्ञापुंचा वर्षातून एकदा तरी संपर्क व्हायचाच. ज्ञापु संपर्काला आले की, घरात एक चैतन्य निर्माण व्हायचे. 'साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' असे सणांचे, उत्साहाचे वातावरण घरात असायचे. घरातील लहानग्यांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांशी ज्ञापु मनसोक्त गप्पा मारत. वर्धक-वर्धिकांच्या आई-वडिलांना तर आपल्या पोरांकडे बघायला, त्यांच्यावर संस्कार करायला ज्ञापु हा विश्वासच पुरेसा असायचा. घरी आले की ज्ञापु मुलांचे कधी दोष काढत नसत; उलट सर्वांसमोर त्याच्या गुणांचे कौतुकच करत.

ज्ञापु एकदा एका वर्धकाच्या घरी गेले असता त्याला कमी टक्के मिळाले म्हणून घरच्यांनी मुलाला खूप सुनावले. याउलट त्याच्यातली चित्रकला, खेळ हे गुण कसे उत्तम आहेत, असे सांगत ज्ञापुंनी या मुलाला शंभर हत्तींचे बळ दिले आणि घरातून बाहेर आल्यावर त्या मुलाला सांगितले की, 'हे बघ बाळा, आईबाबा त्यांच्या जागी बरोबर आहेत. तुझ्या काळजीपोटी बोलतात रे ते. उद्यापासून दररोज वर्धिनीत सकाळी अभ्यासाला ये. मी घेईन तुझा अभ्यास.'

**संघविचार जपणारे ज्ञापु**

'स्व'-रूपवर्धिनी ही स्व. किशाभाऊ पटवर्धन व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरू केलेली संस्था. ती स्वतंत्र

सेवा करताना आध्यात्मिकता आणि व्यावहारिकता यांची नीट जाण कार्यकर्त्याला असली पाहिजे.

असली, तरी राष्ट्रीय विचारांशी बांधिलकी आणि डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची प्रेरणा तिने कधी नाकारली नाही. ज्ञापुंनी संघाच्या तृतीय वर्षाचे शिक्षण घेतले होते. ज्ञापु दरवर्षी न चुकता संघ शिक्षा वर्गात २१ दिवस शिक्षक म्हणून जात असत. ज्ञापुंमध्ये मूळ संघसंस्कार पुरता रुजलेला. वर्धिनीच्या युवकयुवतींना ते नेहमी संघातील प्रचारकांची उदाहरण देत. संघ कसा वाढला, अनेकांनी आपली आयुष्ये संघकामाला कशी समर्पित केली याची उदाहरणे देताना ज्ञापुंचे डोळे पाणावलेले असत. आपल्या युवक-युवतींनी विस्तारक-प्रचारक म्हणून काही महिने काही वर्षे समाजसेवेसाठी द्यावीत, यासाठी ज्ञापु कसून प्रयत्न करत. दसऱ्याचे पथसंचलन असले की युवकांची फौज घेऊन ज्ञापु तयार असत. आपल्या कार्यकर्त्यांनी संघ शिक्षा वर्ग करायलाच हवा हा त्यांचा अट्टाहास असे.

**प्रसिद्धीपराङ्मुख ज्ञापु –**

वर्धिनीचा कोणताही कार्यक्रम, उत्सव वा शिबीर असो, ज्ञापु ते यशस्वी करण्यासाठी दिवसरात्र एक करत. कार्यकर्त्यांची मूठ बांधून महाराष्ट्रातले गडकिल्ले पिंजून काढणे, शिवचरित्र सांगणे, शिबिरे घेणे हा ज्ञापुंचा नित्यक्रम; पण कोणत्याही कार्यक्रमाला ज्ञापु कधी व्यासपीठावर बसलेत असे दिसणार नाही. कार्यक्रमाच्या पत्रिकेतही त्यांच्या नावाचा उल्लेख त्यांना आवडत नसे. ते एकतर कार्यक्रमाच्या तयारीत असत किंवा मागे उभे राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेत असत. कोणी पाहुण्यांनी त्यांना व्यासपीठावर येण्याची विनंती केली, तरी ज्ञापु स्मितहास्य करून मुलांसोबत, कार्यकर्त्यांसोबत बसतो म्हणत विनम्रपणे त्याला नकार देत. गणेशोत्सव, शिबिरे, संक्रांत उत्सव वा सहली अशा कार्यक्रमांच्या शेवटी ते जबाबदारी घेतलेल्या युवक-युवतींना शाबासकी देत. त्यांना गुलाबपुष्प अथवा महापुरुषांचे शुभेच्छापत्र देऊन त्यांची मनसोक्त प्रशंसा करत. कालपरत्वे संस्थेच्या कामाची दखल प्रसारमाध्यमांनी घ्यावी व आपले काम सर्वांपर्यंत पोहचावे असा हेतू ठेवून कामाविषयीचे प्रसिद्धीपत्रक लिहिले, तरी ज्ञापु त्यात स्वतःचे नाव कधी येऊ देत नसत. कार्यकर्त्याने कार्यरत रहावे, प्रसिद्धीच्या मागे धावू नये, असे त्यांचे ठाम मत होते.

**बोले तैसा चाले...**

ज्ञापु शिवचरित्र फक्त सांगत नसत, तर त्याप्रमाणे जगण्याचा ते प्रयत्न करीत. ज्ञापुंचा दिवस सूर्योदयापूर्वीच सुरू होत असे व तो रात्री १२ वाजले तरी संपत नसे. बैठका, गप्पा, संपर्क, वाचन, नियोजन असे सतत चालूच असे. इतरांना सकाळी लवकर उठून व्यायाम करा सांगणारे ज्ञापु स्वतः लवकर उठून रोज एक तास जोर-बैठका, सूर्यनमस्कार, योगासने करत. त्यांना पाहून अनेक युवक सकाळी वर्धिनीत व्यायामाला येत असत. उत्तम शिक्षणावर भर देणारे, त्याचे महत्त्व सांगणारे ज्ञापु स्वतः उत्तम अभ्यास करून ऑटोमोबाईल डिप्लोमाला महाविद्यालयात पहिले आले होते. ज्ञापु कधीच उंटावरून शेळ्या हाकत नसत. कोणतीही गोष्ट ते स्वतः करत आणि वर्धक-वर्धिका त्यांचे आपसूकच अनुकरण करत. 'कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती' असेच ज्ञापुंचे जगणे होते.

**वर्धक-वर्धिकांवर जिवापाड प्रेम**

ज्ञापु शाखेत आले की मुले-मुली अक्षरशः त्यांना गराडा घालत व त्यांच्या अंगाखांद्यावर खेळत. प्रत्येक वर्धक-वर्धिका, युवक-युवती यांच्याशी ज्ञापु जिव्हाळ्याने बोलत. पाठीवर हात ठेवत. खेळ-अभ्यास-कला क्षेत्रांत उत्तम कामगिरी बजावली तर भरभरून कौतुक करत. आपल्या धाकट्या भावाला-बहिणीला जणू यश मिळाले आहे, असे समजून सर्वांना पेढे भरवत. शाखेत आलेत आणि ज्ञापु लांब थांबलेत असे होणे शक्यच



वास्तव आणि नाटक यांची आपण गल्लत करता कामा नये. आपण भूमिकेशी समरस झालं पाहिजे.

नाही. ते लगेच मुलांचे मंडल करणार आणि बेडुकउड्या, सापाची झोप, वाघ-बकरी, दंडगोल, माकड-मदारी, नौकायुद्ध असे खेळ घेऊन मुलांचे होऊन जाणार. प्रार्थना झाल्यावर ज्ञापु सर्वांसमोर आले की वाटे त्यांनी फक्त बोलत रहावे. गोष्टी सांगाव्यात आणि आपण ऐकत रहावे. ज्ञापु अभ्यासाचा तास घ्यायला लागले की गणित-विज्ञान असो की, इंग्रजी मुले भराभर शिकायची. अनेकदा ते आजारी असतानाही मुलांचा अभ्यास बुडायला नको म्हणून स्वतःच्या जखमा, आजारपण विसरून ते शिकवायला लागत. बहुतेक वेळेला वर्गातील हुशार विद्यार्थ्यांवर शिक्षकांचे जास्त लक्ष असते; पण ज्ञापुंचे प्रत्येक मुलावर सारखेच लक्ष असे. जो थोडा कच्चा आहे, त्याला ते जास्त वेळ देत असत. मुले जितकी खोडकर, तितकी ती ज्ञापुंच्या जवळ यायची अशी ताकद ज्ञापुंमध्ये होती. ते प्रत्येक वर्धक-वर्धिकेवर जीव ओवाळून टाकत, त्यांना आपलेसे करत. कोणाकडे शाळा-महाविद्यालयाची फी भरायला पैसे नाहीत, सायकल नाही, अभ्यासाला पुस्तके नाहीत, असे लक्षात आले की, ज्ञापु लगेच ती गोष्ट मिळवून देणार किंवा खिशातले पैसे काढून हातावर ठेवणार. परिस्थिती बेताची आहे म्हणून कोणाचे शिक्षण थांबले, असे ज्ञापु कधीच होऊ देत नसत.

**थेंबे थेंबे तळे साचे**

'स्व'-रूपवर्धिनी ही समाज करत असलेल्या मदतीवर, वैयक्तिक देणग्यांवर चालणारी संस्था आहे. त्यामुळे मिळालेल्या देणगीतली पै न् पै सत्कारणी लागली पाहिजे, वायफळ खर्च अजिबात नको, असे ज्ञापु कार्यकर्त्यांना आवर्जून सांगत. वर्धिनीचे कार्यक्रम, सहली, शिबिरे अत्यंत कमी खर्चात आणि उपलब्ध साधनसामुग्रीत होत असत. कार्यक्रमांसाठी सभागृह भाड्याने घेणे, शिबिरांसाठी धान्य विकत घेणे, हे त्यांना कधीच पटत नसे. 'आमची संस्था तळागाळातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करते; त्यामुळे तुम्ही आमच्याकडून भाडे घेऊ नये.' असे ज्ञापु नम्रपणे सांगत व त्याला प्रतिसाद मिळत असे. शिबिरासाठी समविचारी संस्थांकडून साहित्य घ्यायचे, अन्न-धान्यासाठी मार्केट यार्डमधील व्यापाऱ्यांना संस्थेची माहिती देऊन देणगी स्वरूपात धान्य घ्यायचे, हे ठरलेले असे. सायकल सहली, गडकिल्ल्यांची भटकंती अशा प्रसंगीही स्वतः पीठ, धान्य, कांदे-बटाटे आणा आणि स्वतः जेवण बनवा, असे ते युवकांना सांगत. यातून काही कार्यकर्ते पाककलेत निपुण झाले; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे बचतीचा व स्वावलंबनाचा संस्कार रुजला आणि खर्चही कमी झाला. शाखा चालवत असताना प्रत्येक शाखेला महिन्याला ५०० रुपये मिळायचे. त्यात ५० वर्धक-वर्धिकांचे खेळ-शैक्षणिक साहित्य, पूरक आहार सर्व काही बसवायचे. हिशेब देताना कोणी सामोसा किंवा अनावश्यक वस्तू खरेदी केल्या असतील तर ज्ञापु चिडायचे. 'मुलांना सामोसा काय देता ? केळी, बीट, गाजर, शेंगदाणा लाडू असे पौष्टिक अन्न द्या' म्हणायचे.

कमीत कमी खर्चात, उपलब्ध साधनसामुग्रीत उत्तम दर्जाचे कार्यक्रम घेण्याचा ज्ञापुंचा आग्रह असे. कार्यकर्त्यांना ते नेहमी म्हणत, 'आपल्यावर किशाभाऊंची नजर आहे आणि आपल्यामागे त्यांची पुण्याई आहे. त्यांनी डेक्कन क्वीनमधून प्रवास करत अनेक देणगीदार जोडले, परदेशांत जाऊन संस्थेसाठी पैसे उभारले, त्यांचा योग्य वापर करणे ही आपली जबाबदारी आहे.'

आलेल्या देणग्यांचा आदर कसा करावा व खर्चात काटकसर कशी करावी हे ज्ञापुंकडून शिकावे.

**वसुधैवकुटुंबकम्**

ज्ञापुंचा जनसंपर्क दांडगा होता. ते 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचे पूर्ण वेळ कार्यकर्ते होते, तरी फक्त वर्धिनीपुरता त्यांचा परीघ मर्यादित नव्हता. संघ, ज्ञानप्रबोधिनी, ओंकार ट्रस्ट, सेवासहयोग, यमगरवाडी प्रकल्प आणि इतरही

अनेक संस्था-संघटनांशी त्यांचा संपर्क होता. लातूर, मालवणसारख्या ठिकाणी शिबिरे घेणे, बोलावतील तिथे मार्गदर्शन करायला जाणे हा ज्ञापुंचा स्वभाव होता. महाराष्ट्रातील गावागावांत, तालुक्यांमध्ये ज्ञापुंचा प्रवास असे. मल्लखांबाची प्रात्यक्षिके व गणेशोत्सवातील वादन हे पुण्यापुरते मर्यादित न ठेवता मुंबई, नाशिक, गुजरात, दिल्ली अशा सर्व ठिकाणी वर्धिनीच्या पथकांचा डंका वाजत असे. अरुणाचल प्रदेशातील तवांग येथे मराठा बटालियनतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण झाले. तेव्हा शिवचरित्राची मांडणी करण्यासाठी ज्ञापुंना आमंत्रित करण्यात आले होते. तामिळनाडूत त्सुनामीच्या हाहाकारानंतर वर्धिनीच्या कार्यकर्त्यांची मोर्चेबांधणी करून ज्ञापु तत्काळ तेथे मदतीसाठी मार्गस्थ झाले. नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी देशभरातून जिथून कुठून आवाज येईल तिथे ज्ञापु जात असत. त्यांच्या कामाचा परीघ आणि आवाका मोठा होता.

**कार्यकर्त्यांची प्रेरणा**

ज्ञापु समोर दिसले की, मेलेल्या शरीरांमध्येही जिवंतपणा येईल, इतकी उर्जा त्यांच्यात होती. मेंगळट, ढेपाळलेले युवक-युवती, कार्यकर्ते ज्ञापुंना आवडायचे नाहीत. कार्यकर्त्यांनी कसे ताठ मानेने, करारी नजरेने आणि उत्साहाने सर्वत्र वावरले पाहिजे. कोणाचे खांदे पडलेले दिसले की, ज्ञापु त्याला लगेच सकाळी व्यायामाला बोलवत. ज्ञापुंच्या वागण्या-बोलण्यात विलक्षण ताकद होती. त्यामुळे कार्यकर्त्यांनाही स्फुरण चढे. ज्ञापु कोणाचीही साथ सोडत नसत. चुकीच्या मित्रांची संगत किंवा अन्य कारणांमुळे बिघडलेल्या कार्यकर्त्यांनाही ज्ञापु चांगल्या मार्गावर आणत, नवसंजीवनी देत. अशा काहींना ते वर्धिनीच्या पाचव्या मजल्यावरच्या खोलीत स्वतःबरोबर काही दिवस निवासाला ठेवत. सकाळची उपासना, व्यायाम, अभ्यास, भेटी-गाठी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ज्ञापुंचा सहवास यामुळे 'वाल्याचा वाल्मिकी' होऊन जाई. समाजाच्या दृष्टीने वाया गेलेल्या मुलांवर ज्ञापु विशेष लक्ष देत आणि त्यांना मार्गावर आणत. अनेक कार्यकर्त्यांचा दिवस ज्ञापुंसोबत सुरू होई आणि तो मावळेही ज्ञापुंसोबत. असे अनेक भाग्यवंत युवक-युवती कार्यकर्ते आज आपापल्या क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करत आहेत. कारण ज्ञापु हेच त्यांचे प्रेरणास्थान होते.

**विज्ञाननिष्ठ ज्ञापु**

विठोबा-रखुमाई, ज्ञानेश्वर माऊली व तुकोबारायांच्या भजनात तल्लीन होणारे ज्ञापु, गडकिल्ल्यांच्या सहवासात रममाण होणारे ज्ञापु विज्ञाननिष्ठ होते. देवावर त्यांची भक्ती होती; पण अंधश्रद्धा कधीच नव्हती. स्वतः अभियंते असल्यामुळे ज्ञापुंचा विज्ञानाचा गाढा अभ्यास होता. गडकिल्ल्यांवर गेले की, इतिहासाबरोबरच किल्ल्याच्या बांधकामातील तंत्रज्ञान, विज्ञान, भौगोलिक रचना, उंची यांची अभ्यासपूर्ण माहितीदेखील ते सांगत. वाहन तंत्रज्ञानातील स्वयंचलित गाड्यांचे इंजिन, वेग व इतर गोष्टींचे त्यांना ज्ञान होतेच; पण यांत्रिकीमधील फिटिंग-टर्निंग, यंत्रांचे आरेखन आदींचीही उत्तम माहिती त्यांना होती. वर्धिनीच्या युवक-युवतींनी शास्त्रज्ञ बनावे, संशोधन करावे आणि देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, अशी त्यांची इच्छा असे आणि त्यांच्या बोलण्यातून ही कळकळ व्यक्त होत असे. वार्षिक विज्ञानदिन चांगला झाला पाहिजे व त्यात जास्तीत जास्त जणांचा सहभाग असला पाहिजे, याबद्दल ते आग्रही होते. विज्ञानदिनाला वर्धिनीच्या वर्धक-वर्धिकांनी शास्त्रीय उपकरणे, मॉडेल्स बनवावीत आणि त्यांच्या मनात विज्ञानाबद्दलचे कुतूहल जागे व्हावे, यासाठी त्यांची धडपड होती.

**निर्भीड ज्ञापु**

कितीही कठीण प्रसंग असो ज्ञापु स्थितप्रज्ञासारखा त्याचा शांतपणे विचार करत व आवश्यक कृतीही. हिवाळी शिबिरात काही वेळा वादळी वाऱ्यांसह पाऊस येऊन तंबूसह सर्व काही उद्ध्वस्त झाले. गडकिल्ल्यांची भटकंती, सायकल सहलींमध्ये काही वेळा अपघातही झाले. याबरोबरच दैनंदिन कामात अनेकदा शाळांच्या वर्गखोल्या व मैदानांची परवानगी रद्द होणे, वस्तीतल्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी त्रास देणे असे प्रसंग नेहमीच उद्भवत. काही वर्धक-वर्धिकांच्या घरी व्यसनाच्या आहारी गेलेल्या पालकांनी गोंधळ घालणे व घरातल्या सर्वांना मारहाण करणे इथपासून ते मुसळधार पावसात वस्तीतल्या घरांमध्ये पुराचे पाणी शिरणे, कोविडच्या टाळेबंदीत अनेक घरांमध्ये खायला काही नसणे यासारख्या असंख्य प्रसंगांमध्ये ज्ञापु कधी डगमगले नाहीत. सारासार विचार करून धीराने या प्रसंगांचा सामना करत ते मार्गक्रमण करत राहिले व इतरांना मार्गदर्शन करत राहिले. 'कार्यकर्त्यांनी घाबरट असू नये; ते निर्भीड, पोलादी मनगट आणि निधड्या छातीचे असावेत', असे ते नेहमी म्हणत.

एकदा मंगळवार पेठेतील पारगे चौकात चहा पीत असताना बाजूला काही तरुण सिगारेट ओढत होते. त्या वासाचा त्रास होऊ लागल्यामुळे ज्ञापुंनी त्या तरुणांना सिगारेट न ओढण्याची विनंती केली. परंतु, त्या तरुणांनी ज्ञापुंचे बोलणे धुडकावून लावले, तेव्हा वाघाने झेप घ्यावी तशी ज्ञापुंनी एका पोराची गचांडी पकडली. तो तरुण प्रचंड घाबरला आणि ज्ञापुंचे रौद्ररूप बघून त्याचे मित्र पळून गेले. त्या तरुणाने ज्ञापुंची माफी मागितली आणि आपली सुटका करून घेतली. गडकिल्ल्यांवर व्यसन करणारे, दारू पिणारे तरुण दिसले की ज्ञापु भयंकर संतापायचे. त्यांना समजावून सांगायचे आणि प्रसंगी रुद्रावतार धारण करायचे. अन्याय, अत्याचार व वाईट गोष्टींच्या विरोधात ज्ञापु आक्रमक पवित्रा घ्यायचे. हाच संस्कार त्यांनी युवा कार्यकर्त्यांमध्ये रुजवला. कार्यकर्त्यांनी सामाजिक प्रश्नांना भिडले पाहिजे, त्यांना वाचा फोडली पाहिजे, असा ज्ञापुंचा आग्रह असे.

अनेक गुणांनी समृद्ध, अष्टपैलू व दृढनिश्चयी असे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञापु. त्यांनी ठरवले असते तर सुखसुविधा असलेले चैनीचे जीवन त्यांना जगता आले असते; पण तो सोपा मार्ग त्यांनी नाकारला. स्वतःचा संसार न मांडता त्यांनी समाजाचा संसार मांडला आणि तो सुखकर व समृद्ध केला. आज अनेक गोरगरीब कुटुंबांतील, उज्ज्वल भविष्याची स्वप्ने ही स्वप्नेच राहतील अशा अभावग्रस्त कुटुंबांतील चुणचुणीत, हुशार मुलांना गरुडाचे पंख देऊन उंच भरारी घेण्याचे बळ ज्ञापुंनी दिले. कधीही कोणाविषयी त्यांची वैयक्तिक तक्रार नसायची, राग नसायचा. एखाद्या बैठकीत रुसवे फुगवे झाले, तरी नंतर मिठी मारून, समोरील व्यक्ती वयाने लहान असली, तरी तिची माफी मागून ते नाते जपायचे. मतभेद झाले, तरी त्याचे रुपांतर कधी मनभेदात झाले नाही.

असे तुमचे, आमचे, सर्वांचे ज्ञापु एकमेवाद्वितीय होते. आपणही त्यांच्या गुणांचा आदर्श समोर ठेवुयात आणि 'स्व'-रूपवर्धिनी व समाजाच्या कामात कृतीरुपी गुरुदक्षिणा देऊन त्यांचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करूयात.

* * *

**सभोवतालच्या सर्व गोष्टींचा आपण जास्तीतजास्त चांगला उपयोग करून घेतला पाहिजे.**
**पण तो केवळ आपले उच्च हेतू पूर्ण करण्यासाठीच.**

**सन २०२० मध्ये कोरोनाच्या उद्‌भवलेल्या संकटाचा भारतीय समाजाने धीराने सामना केला. असा सामना करताना उर्वरीत जगापेक्षा आपले वेगळेपण काय आहे ? भारतातील पारंपारिक कुटुंबव्यवस्था परस्परांना आधार देण्यासाठी कशी उभी राहिली, नवे जीवनशिक्षण कसे हवे, आदीसंबंधी मांडणी करणारे समविचारी व्यक्तींचे व संस्थांचे लेख पुढे देत आहोत.**

## कोरोना – आपल्या कुटुंब व्यवस्थेसाठी आपत्ती का इष्टापत्ती ?

भारतीय समाजरचनेचा आपली कुटुंबपद्धती हा पाया आहे. हजारो वर्षांपासून व्यक्ती निर्माणाचे आणि व्यक्ती सुसंस्कारित करण्याचे अव्याहत कार्य, सध्याच्या प्रचलित भाषेत सांगायचे तर '24 x 7' संस्कार करणारी आपली कुटुंब व्यवस्था आहे.

२०२० च्या सुरुवातीला कोरोनामुळे अख्ख्या जगाला हादरा बसला, त्यामध्ये जगाचे नेतृत्व करणाऱ्या आणि अत्यंत आधुनिक जीवनशैली असणाऱ्या समृद्ध संपन्न देशांची शोककळा झाली. अद्ययावत उपचार पद्धती असलेल्या प्रगत राष्ट्रांमध्येसुद्धा या संकटाने लक्षावधी माणसांचे बळी घेतले. याच पार्श्वभूमीवर हे ध्यानात येते की आपण मात्र कोरोनाला अनिर्बंध होऊ दिले नाही. कोरोनाला नियंत्रणात ठेवण्यात महत्त्वाचा सहभाग जर कुठल्या व्यवस्थेचा असेल तर तो आपल्या 'कुटुंब व्यवस्थे'चा आहे. **पाश्चात्त्य देशांमध्ये 'शासन–प्रशासन आणि व्यक्ती' या क्रमाने कोरोनाच्या विरुद्ध रचना होती परंतु आपल्या देशात मात्र 'शासन–प्रशासन–समाज–कुटुंब आणि त्यानंतर व्यक्ती' अशी कोरोना विरुद्ध रचना असल्यामुळेच केवळ आपण त्यावर नियंत्रण ठेवू शकलो आहोत हेच वास्तव आहे.**

आता कोरोनाचे संकट नियंत्रणाच्या कक्षेत आल्यानंतर समाजामध्ये एक नवीन संकल्पना रूढ झालेली दिसते, त्यासाठी 'न्यू नॉर्मल' हा शब्द वापरला जातो. 'न्यू' म्हणजे 'पूर्वीपेक्षा वेगळा' आणि 'नॉर्मल' म्हणजे 'नेहमीचा, स्वाभाविक'. स्वाभाविक हा शब्द स्वभाव या शब्दावरून आला आणि स्वभाव म्हणजे स्व–भाव ! **आपला जो मूळ स्वभाव आहे, जी मूळ भारतीय जीवनशैली आहे ती पुन्हा एकदा कोरोनानंतर प्रस्थापित होऊ लागली आहे, हीच इष्टापत्ती आहे.**

कोरोना पूर्वीच्या काळात आपण आपल्या 'नॉर्मल' म्हणजे 'स्वाभाविक' जीवन पद्धतीपासून थोडेसे दूर गेलो होतो, उदाहरणार्थ आधुनिकतेच्या नादात, आनंदाच्या कल्पना बदलत चालल्या होत्या. साधनांमुळे सुविधा मिळते हे विसरून आपण साधनांमध्ये आनंद शोधू लागलो, त्यामुळे आनंदाच्या कल्पना बदलल्या होत्या. सन्मानाच्या, आदराच्या संकल्पना बदलल्या होत्या. एखाद्याजवळ जेवढी भारी गाडी, भारी बंगला तेवढा तो अधिक आदरास पात्र ठरत असे. दुसऱ्या बाजूला ''अभी मंगता है'' ही मानसिकता वाढत चालली होती, त्यामुळे 'Needs & Wants' यातील फरक ध्यानात न घेता आपण खरेदी करू लागलो होतो. 'क्रेडिट कार्ड' संस्कृती मूळ धरू लागली होती पण तो आपला नॉर्मल स्वभाव नव्हता. **'जे उद्या कमवायचे ते आजच खर्च करायचे' ही आपली स्वाभाविक कुटुंब व्यवस्था नाही.** आहार–विहार, आचार–विचार यामध्ये पाश्चात्त्यांचे अंधानुकरण सुरू झाले होते.

अशा परिस्थितीत २०२० च्या सुरुवातीला कोरोनाची आपत्ती आली. कोरोना ही आपत्ती तर आहेच.



कसं बोलावं, कधी बोलावं आणि कुणाशी बोलावं याबरोबरच योग्य मार्गदर्शन कुणाकडून मिळवावं हे ज्याला समजतं तोच खरा व्यवहारचतुर होय.

अनेकांचे व्यवसाय बंद झाले, पगार बंद झाले किंवा अनियमित आणि कमी झाले. आर्थिक समस्या भेडसावू लागल्या, आर्थिक ताण त्यामुळे बिघडलेले मानसिक संतुलन, अशा अनेक समस्यांनी समाज, कुटुंब त्रस्त झाली परंतु भारतीय जीवनशैलीचा विचार करताना काही प्रमाणात कोरोना ही 'इष्टापत्ती'सुद्धा जाणवली, कारण कोरोनानंतर पुन्हा एकदा आम्ही आमच्या मूळ स्वभावाप्रमाणे विचार करू लागलो. उदाहरणार्थ 'लॉकडाऊन'मुळे केवळ गरजेच्या वस्तू (Needs) आम्ही विकत घेतल्या. अनिर्बंध ऑनलाईन खरेदीवर (Wants) आपोआपच मर्यादा आल्या. पगारावर, उत्पन्नावर मर्यादा आल्यामुळे क्रेडिट कार्डचा अनिर्बंध वापर नाइलाजास्तव थांबला. 'Work from home' मुळे आणि कोरोनाच्या भीतीमुळे घरातील, कुटुंबातील सर्व सदस्य बहुतांश वेळ घरात राहू लागले. त्यामुळे प्रायव्हसी, माय स्पेस, स्वातंत्र्य या कल्पना आपोआपच बदलल्या.

कुटुंबातील कमी होत चाललेला संवाद पुन्हा वाढू लागला. नाईलाजाने का होईना पण आपण स्वावलंबनाकडे वळलो. जिवाच्या भीतीने स्वच्छतेची, पर्यावरणाची समज वाढली. ''घरी आल्यावर आधी हात-पाय धुतले पाहिजे'', हा वडिलधाऱ्यांचा दंडक मधल्या काळात जाचक वाटत असे, आता ते 'New Normal' झाले ! गमतीचा भाग म्हणजे, तरुण वर्गात, विशेषतः मुला-मुलींमध्ये परस्परांना ऊठसूठ मिठ्या मारण्याचे प्रमाण एकदम कमी झाले. सर्वजण 'नमस्ते' करू लागले !

कृतज्ञता हा आपला स्वभाव आहे. सजीवांविषयी, निर्जीवांविषयी, प्राणीमात्रांविषयी, झाडाझुडपांविषयी स्वाभाविक कृतज्ञतेचा भाव हा आपला मूळ स्वभाव आहे. **कोरोनामुळे पुन्हा एकदा समाजातील सर्व स्तरातील सेवाकर्मीयांविषयी मनामध्ये कृतज्ञतेचा भाव जागृत झाला आहे.** घरात कामाला येणारे गडी, बायका, दूधवाले काका, केर न्यायला येणाऱ्या मावशी, पोलिस, सफाई कामगार, दवाखान्यातील सेवक अशा सर्वांना आता आपण 'Corona Warriars' म्हणून सन्मानाची, कृतज्ञतापूर्वक वागणूक देऊ लागलो !

थोडक्यात, या इष्टापत्तीमुळे पुनः एकदा आपण आपल्या भारतीय संस्कृतीच्या मूळ स्वभावानुसार आपल्या कुटुंबाची, दिनचर्येची रचना करू लागलो आहोत. चला, आता आपल्या कुटुंब व्यवस्थेतील सण उत्सव दिन-विशेषांमधून, हेच संस्कार करण्याची जी अंगभूत रचना आहे ती पुनः प्रस्थापित करण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करू या !

**- श्री. संजय अनंत कुलकर्णी**
समुपदेशक
कुटुंब प्रबोधन संयोजक,
पुणे महानगर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
- मो. : ९७६६६ २६०४०

* * *

**बुद्धीहीन माणूस म्हणजे शुद्ध पशू होय ! पण ही बुद्धी दुधारी तलवारीसारखी आहे.**
**जर तिचा योग्य पद्धतीनं वापर केला तर ती माणसाला देवत्वाकडे पोचवते. अन्यथा ती त्याला पशूहून हीन बनवते.**

## नव्या पर्वातील नवे जीवनशिक्षण

गेल्या काही महिन्यांपासून आपल्या सर्वच व्यवस्था कोरोनाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. सुरुवातीचा अचानक मिळालेल्या सुट्टीचा मूड आता कंटाळा आणि नव्या तंत्रज्ञानाबरोबर जुळवून घेण्यासाठी चाललेल्या धडपडीचा वाढता ताण अशा कात्रीत सापडला आहे. पण खरंतर ही अवस्था फक्त कोरोनामुळेच आली आहे हे सत्य आहे का, कोरोनाचा प्रादुर्भाव नव्हता, तेव्हाही शिक्षण क्षेत्रापुढे अनेक गुंतागुंतीच्या समस्या होत्या आणि त्यातील महत्त्वाची समस्या म्हणजे शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षणाचा रोजच्या जगण्यासाठी आवश्यक असलेल्या गरजांची थेट संबंध न लावता येणे !!

कितीतरी वेळा मुलं उघडपणे किंवा मनातल्या मनात प्रश्न विचारत असतात, 'खरंच, हे सगळे विषय शिकून मी पुढे याचं काय करणार आहे?' अर्थात, त्यातील जे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे ते शिकवण्याबद्दल वादच नाही पण ठराविक गुणांचा आग्रह, ठराविक पद्धतीने शिकण्याच्या साचेबद्ध पद्धती आणि एक प्रकारची अटीतटीची स्पर्धा या सगळ्यामुळे दैनंदिन शिक्षण आनंददायी होण्याऐवजी वेदनादायी होताना जास्त दिसतं असं म्हणायला हरकत नाही. कितीतरी धडपडे शिक्षक सुटे सुटे प्रयोग करत शिक्षण प्रक्रिया समृद्ध व्हावी म्हणून प्रयत्न करत आहेत खरे; पण त्यांची आणि त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या मुख्याध्यापक किंवा संस्थाचालक किंवा शासन प्रतिनिधींची संख्या इतकी मोजकी आहे की त्याचा म्हणावा तसा प्रभाव शिक्षणाचा सार्वत्रिक रचनेवर पडत नाही असे वाटते. मुलांनी काय शिकायचे? तर 'पाठांतर करून विचारलेल्या प्रश्नांवर स्मरणशक्तीच्या आधाराने उत्तरे द्यायची' यापलीकडे अजूनही शिक्षणाचा प्रमुख प्रवाह गेलेला नाही... आणि त्याचसोबत जगण्याच्या लढाया मात्र तीव्र झालेल्या आहेत. समाजाच्या एका मोठ्या गटांमधील मुला-मुलींना किशोरावस्थेतमध्ये पोचल्यानंतर 'शिक्षण का रोजगार?' असा प्रश्न भेडसावतो आहे हेही दिसते. ग्रामीण भागातील मुलांपासून ते शहरी भागातील सामाजिक आर्थिकदृष्ट्या वंचित गटातील मुलापर्यंत कितीतरी जण जेमतेम प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर शाळेतून बाहेर पडत आहेत हे आजही सत्य आहे.

विशेषतः 'स्व'-रूपवर्धिनीसारख्या संस्थांचे काम ज्या प्रकारच्या समाजगटामध्ये चालते, तिथे तर क्षमता असलेल्या मुलांनासुद्धा कौटुंबिक आणि सामाजिक अडचणीमुळे दबावामुळे मनासारखे शिक्षण घेता येत नाही. याचे मुख्य कारण आतापर्यंतचे सर्व शिक्षण अतिशय अभ्यासक्रम केंद्रित झालेले आहे. ठराविक विषय शिकायचे-ठराविक पद्धतीने शिकायचे-ठराविक प्रकारे परीक्षा द्यायच्या आणि त्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झाले नाही, तर ते मूल प्रवाहाबाहेर फेकले जाते. 'नापास करायचे नाही' असे धोरण असले तरी वाचन-लेखन-आकलन कौशल्ये अपुरी राहिल्यामुळे नुसते आठवी-नववीपर्यंत पोहोचूनही प्रत्यक्षात उभं राहण्यासाठी त्या इयत्तांचा काहीच उपयोग होत नाही. त्यामुळे असे वाटते की कोरोनाच्या निमित्ताने या सर्व शिक्षणप्रक्रियेमधून बाहेर पडून काही वेगळा विचार करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे असे म्हणायचे का? नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही अभ्यासक्रम केंद्रित असलेल्या या व्यवस्थेचा विचार करण्यात आलेला आहे, ही सुखद गोष्ट आहे. त्यामुळे इथून पुढे शिक्षण हे साचेबद्ध आणि ठराविक वळणावळणातून जाणारे न राहता प्रत्येकाला शिकण्यासाठी आवश्यक असलेली किमान कौशल्य नक्की मिळतील अशी काही पायवाट निर्माण होण्याची शक्यता आहे.

आतापर्यंत जणू काही एखाद्या मोठ्या गिरणीमध्ये, 'एका टोकाला असलेल्या भागात घातलेल्या कच्च्या मालामधून शेवटच्या टोकाला असलेल्या भागातून एकसारखे उत्पादन बाहेर यावे', तसं शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप



**आपली बुद्धी आपल्या गरजा वाढवण्यासाठी वापरू नये. कारण या गरजा केवळ शारीरिक पातळीवर न राहता मानसिक पातळीवरही पोहोचतात आणि नाव, प्रसिद्धी, सत्ता, प्रतिष्ठा यांची लालसा निर्माण करतात.**

झालेलं आहे असं दिसतं. इंग्रजांना त्यांच्या कामासाठी लागणारे मनुष्यबळ तयार करण्यासाठी – म्हणजेच होयबा संस्कृती – असलेलं आणि अतिशय साचेबद्ध अशा प्रकारचं काम चौकटीत राहून करणार मनुष्यबळ घडवणं हो हेतू ठेवूनच आपल्या इथली शिक्षणपद्धती विकसित झाली होती. पण गेल्या पंचवीस–तीस वर्षांमध्ये जसजसं जागतिकीकरणाचं वारं हळूहळू भारतात येऊ लागलं, तसं अेनक क्षेत्रांमध्ये किती वेगवेगळ्या प्रकारच्या संधी उपलब्ध होऊ शकतात हे लक्षात यायला लागलं आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की ह्या संधी सर्वांसाठी सारख्याच आहेत. फक्त त्याची माहिती मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात सर्वदूर झालेली नसल्यामुळे अजूनही समाजातला मोठा विद्यार्थ्यांचा गट हा ज्याला व्हाईट कॉलर जॉब म्हणतात अशा ठराविक पद्धतीच्या रोजगारासाठी झगडताना दिसतो आहे. त्यातूनच मग सुखाची नोकरी आयुष्यभर करता यावी यासाठी ठराविक राजकीय पक्षांच्या आहारी जाऊन, आरक्षणासारख्या गोष्टींचाच फक्त सहारा आहे, असं गृहीत धरून मर्यादित महत्त्वाकांक्षा ठेवली गेलेली दिसते. पण यातच कोणीतरी हनुमंतराव गायकवाड यांच्यासारखा तरुण, ज्याला अगदी सामाजिकदृष्ट्या खूप कमी प्रतिष्ठा असलेलं काम मानलं जातं अशा ‘स्वच्छता’ या कामासाठी एक मोठं उद्योगविश्व उभं करू शकतो, याचं कारण त्या क्षेत्रामध्ये असलेल्या संधीची आणि त्यासाठी करायला लागणाऱ्या कष्ट आणि व्यवस्थापनाची त्यांना असलेली नेमकी कल्पना असा नक्कीच वाटते !

मुद्दा असा, की ठराविक साच्यातील नोकऱ्या आता उपलब्ध होणार नाहीत, हे लक्षात घेऊन स्वतः स्वयंरोजगाराकडे वळणे आणि असे स्वयंरोजगार अन्य लोकांच्यासाठी संधी म्हणून निर्माण करता येणे हे पुढच्या युवा पिढीसाठी एक महत्त्वाचं उद्दिष्ट असू शकतं. नुकतीच अमिता देशपांडे–परांजपे या तरुणीची यशोगाथा ऐकायला मिळाली. प्लास्टिकच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी ही उत्तम प्रकारे शिक्षण घेतलेली, इंजिनियर असलेली मुलगी ग्रामीण भागात जाऊन, स्वतःच्या तंत्रज्ञानातील विद्येचा वापर करून, प्लास्टिकपासून चांगल्या प्रकारचे कापड कसे बनवता येईल त्यावर काम करू लागली आणि प्रयत्नांनी तिला ते शक्यही झाले. त्या कापडापासून आता तेथील लोकांच्या मदतीने ती पिशव्यांचे उत्पादन करते आणि त्या शहरी भागामध्ये वितरीत करते. यातून तिने एका सामाजिक प्रश्नाला तंत्रज्ञानाने उत्तर देण्याचा प्रयत्न केलाच; पण त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये बारा आदिवासी कुटुंबांनासुद्धा एक भक्कम रोजगार उपलब्ध करून दिला. यासाठी अर्थातच तिच्याकडे प्रचंड भांडवल किंवा कोणत्याही सत्ताधारी पक्षाचे आशीर्वाद नव्हते; तर वेगळे काही करून बघण्याची जिद्द आणि त्यासाठी लागणारे प्रयत्न करण्याची इच्छा हे दोन्ही मात्र होते.

आज अशी कितीतरी क्षेत्रे पुढच्या करिअरच्या दृष्टीने चोखाळून बघता येण्याजोगी आहेत. इंटरनेटचे महाजाल अफाट पसरलेले आहे. यातून कधीही न कल्पना केलेल्या अनेक गोष्टी आपल्याला संधी म्हणून दिसू शकतात. कमीत कमी आर्थिक गुंतवणूक करूनही आपल्या क्षमता चांगल्या वापरता येऊन त्यातून ह्या संधी निर्माण करता येतात. कोरोनाच्या सगळ्या काळामध्ये अजून एक वेगळी गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे जर आपण एखाद्या विषयातली चांगली तज्ज्ञता मिळवली, तर अक्षरशः घरबसल्यासुद्धा आपण कामांमध्ये योगदान करू शकतो. उर्जा क्षेत्र, सेवा क्षेत्र आणि प्रत्यक्ष वस्तू निर्मिती क्षेत्र अशा तीनही क्षेत्रांमध्ये आज वेगळ्या वाटेवर चालणाऱ्या व्यक्तींसाठी चांगल्या प्रकारचे अर्थसहाय्य शासनाकडून आणि बँकिंग क्षेत्राकडून होताना दिसत आहे. याचा विचार नक्की करायला हवा. आपल्याकडे असलेल्या एका संस्कृत श्लोकानुसार ‘सर्व काही उपलब्ध असते पण योजक फक्त दुर्लभ असतो’ असे म्हटलेले आहे!! म्हणजे आपल्या अवतीभवती असलेल्या संधी हेरणारा आणि त्यांची योजना आपल्या उन्नतीसाठी करणारा दृष्टिकोन आपल्याला निर्माण करता यायला हवा. अक्षरशः

**अनेक वेळी बौद्धिक गरज शारीरिक गरजेपेक्षा जास्त प्रभावी ठरते. बौद्धिक आनंदापुढे भौतिक आनंद दुय्यम ठरतो.**

तळहातावर मावेल एवढे ऑफिस म्हणजेच मोबाईल वापरूनसुद्धा कितीतरी जण आपापले काम करताना दिसत आहेत. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एम के सी एल) ही संस्था आपल्यापैकी अनेकांना माहीत आहे. या संस्थेची महाराष्ट्रभरात किमान पाच हजार वेगवेगळी केंद्रे आहेत. या केंद्रांवर स्थानिक भागातील तरुण मुले-मुली येऊन संगणकाच्या मदतीने छोटे-छोटे अभ्यासक्रम पूर्ण करतात आणि त्यातून त्यांना रोजगार मिळण्याची शक्यता निर्माण होते. अशी केंद्रे चालवणारे हेसुद्धा तेथील स्थानिक युवकच आहेत, जे तिथल्या ह्या परिवर्तनामध्ये महत्त्वाचे योगदान करत आहेत.

इथून पुढच्या काळात शिक्षणाचा विचार करताना अभ्यासक्रमाच्या पलीकडचा जसा विचार करावा लागेल, **तसंच 'स्वावलंबनासाठी शिक्षण' हे सूत्र ही लक्षात ठेवावे लागेल असं वाटतं.** स्वावलंबन हे फक्त आर्थिक संदर्भात नसून एकूणच स्वतःच्या जबाबदाऱ्या ओळखता येणे, त्या पार पाडण्यासाठीची क्षमता आणि कौशल्य विकसित करता येणे, असं बहुअंगाने त्याकडे बघावे लागेल. छोट्या-मोठ्या कार्यानुभवाच्या मदतीने, विविध स्तरांवरील व्यक्तींच्या भेटीगाठी घेऊन, स्वतःचा उत्तम परिचय करून देत, वेगळ्या प्रकारच्या रूपात 'खरी कमाई' म्हणजे आर्थिक व्यवहारांचे योग्य शिक्षण आणि अंमलबजावणी करणे, कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये मुलगा किंवा मुलगी असण्याचा निरपेक्ष स्वतःचा वाटा स्वेच्छेने आणि समर्थपणे उचलता येणे अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे. छोटी छोटी तात्पुरती उद्दिष्टे बघायला मुलांना जशी शिक्षक किंवा युवक कार्यकर्ते मदत करतात, तसेच दूरची उद्दिष्टे किंवा ध्येय बघण्यासाठी प्रवृत्त करणं हासुद्धा औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाचा महत्त्वाचा भाग असला पाहिजे. **छोटे उद्दिष्ट 'काय करायचं' हे ठरवण्यासाठी असतात, तर लांबचे उद्दिष्ट 'आज आपण जे करतो आहोत ते कशासाठी करायचं?' हे स्पष्ट करणारी असतात.** त्यामुळे आज छोटा व्यापारी बनण्यासाठी धडपड करणारा एखादा युवक किंवा तंत्रज्ञ बनू इच्छिणारी एखादी युवती जेव्हा दूरच्या उद्दिष्टाचा विचार करेल, तेव्हा देशासाठी उत्तम आर्थिक आणि तंत्रज्ञानात्मक योगदान करण्याची इच्छा त्यांच्या मनात येऊ शकते. त्यांचे मार्ग वेगळे का असेनात !!

'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना ज्या उद्दिष्टाने झाली, ते म्हणजे समाजातील क्षमतावान, बुद्धिमान विद्यार्थ्यांना स्वार्थ आणि परमार्थ म्हणजेच राष्ट्रीय स्वार्थ हा कसा एकत्र करायला शिकवता येईल यासाठी!! त्यामुळेच वर्धिनीच्या अनौपचारिक शिक्षणप्रक्रियेमध्ये वरील सर्व गोष्टींचा समावेश असावा असे आग्रहाने वाटते. अभिक्षमता मोजता येते आणि त्यानुसार कुठला अभ्यासक्रम निवडावा याचे मार्गदर्शन नक्कीच देता येते. पण त्या अभ्यासक्रमाचा वापर नंतर किती विविधतापूर्ण पद्धतीने करता येऊ शकतो, ज्यातून आपले कुटुंब तर सावरेल; पण त्याचबरोबर आपल्या मनातील सामाजिक दायित्वाची भावनासुद्धा ठळकपणे व्यक्त होईल आणि इतरांनाही प्रेरणा देत राहील, हे मनामनांमध्ये रुजवणे वर्धिनीच्या शिक्षण प्रक्रियेत महत्त्वाचा गाभा असला पाहिजे. 'छोट्या-छोट्या बेडूक उड्या मारत बसण्यापेक्षा उंच बांबू हातात घेऊन उड्डाण करण्याची गरज आहे,' असे विख्यात शास्त्रज्ञ आणि 'स्व'-रूपवर्धिनीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी म्हटले आहे. **'स्व'-रूपवर्धिनीच्या अनौपचारिक शिक्षणातून विद्यार्थ्यांना - युवकांना आणि युवतींना जेव्हा असे जीवन कौशल्यांचे रोजगाराभिमुख पण त्या पलीकडे पाहणारे - राष्ट्रसेवेला जोडणारे शिक्षण देता येईल तेव्हा आत्मनिर्भर भारताकडे आपल्या सर्वांचे एक पाऊल पुढे पडेल, असे म्हणावेसे वाटते.**

**- डॉ. अनघा लवळेकर** (संचालक, ज्ञान प्रबोधिनी, प्रज्ञा मानस संशोधिका)

- मो. : ९८२२५०२९९२



इच्छा ही एक मोठी शक्ती आहे आणि तिला माणसाच्या आयुष्यात महत्त्वाचं स्थान आहे.

## स्क्रीनशिवाय अभ्यासाचा स्मार्ट स्वानंद

स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठानची सुरुवात २०१० मध्ये व्याख्यानमालेच्या उपक्रमातून झाली. त्यानंतर मुलांच्या निवासी 'गंमत शिबिरा'च्या संकल्पनेतून कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली. या कार्यकर्त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे एकत्रीकरण – 'दीपसंध्या', त्यांचा कौतुक सोहळा यातून अनेकजण कामात जोडले गेले. सिंहगड रस्त्यावरील मोठ्या सोसायट्यांमधून ई–कचरा संकलन, रद्दी संकलन, जुने कपडे संकलन ही कामे सर्वांच्या मदतीने सुरू झाली. हे साहित्य सेवा वस्त्यांमधून देताना तिथले काही प्रश्न, समस्या लक्षात आल्या. तेथील गरजू महिलांना कापडी पिशव्या शिवणे, कागदी पिशव्या बनवणे असे प्रशिक्षण देऊन महिला सक्षमीकरणाचे काम आणि ३ ते १२ वयोगटातील मुलांसाठी 'समृद्धी वर्ग' सुरू झाला. याला आरोग्य शिबिरे, स्वस्त दवाखाने, किशोरी मुलींसाठी 'किशोर दर्पण वर्ग' हे उपक्रम जोडले गेले.

पण २०२० च्या मार्च महिन्यात कुणीही घराबाहेर पडायचे नाही या कोरोनाच्या निर्बंधामुळे आता काय आणि कसं असा प्रश्न सगळ्यांना पडला. तरीसुद्धा वस्तीत दूरध्वनीवरील संपर्काने तेथील रहिवाशांच्या अडचणी सोडवणे, धान्य पुरवणे, औषधे पुरवणे ही कामे केली. कोरोनामुळे आरोग्यावर जसा आघात झाला तसा शिक्षणावरही खूप मोठा आघात झाला. वस्तीच्या सर्वेक्षणातून लक्षात आले की ५०% पेक्षा जास्त मुलांकडे संगणकाच्या माध्यमातून (ऑनलाईन) वा दूरध्वनीच्या माध्यमातून शिकण्याची व्यवस्था नाही. त्यांनी काय करायचे असा विचार समोर आला. यातून 'संगणकाच्या पडद्याशिवाय (स्क्रीन) शिक्षण घरच्या घरी' अशा उपक्रमाची सुरुवात झाली. संस्थेच्या समन्वयकांनी आंतरजाल (इंटरनेट) वरून काही उपक्रम शोधले. त्यातून अभ्यासाची पुस्तिका बनवली आणि घरातल्या वस्तू वापरून आणखी कोणते उपक्रम करता येतील, कोणत्या गोष्टींचा अभ्यास करता येईल, भाषा, गणित, इतिहास, पर्यावरण, परिसर अशा अनेक गोष्टींचा ज्यातून अभ्यास होईल अशा अभ्यासपूरक इयत्ताशः छोट्या पुस्तिका तयार झाल्या. मुलांच्या वयानुसार त्यांना उपक्रम व प्रकल्प या पुस्तिकांमधून देण्यात आले. या अनुषंगाने मुले परत पुस्तकांकडे वळली. लिहायला वाचायला लागली. कारण मधल्या चार–पाच महिन्यांच्या काळामध्ये याचा विसर पडला होता. फक्त दिसत होती आरोग्याची भीती. अजून एक अडचण अशी होती की, पुस्तिकेत दिलेल्या सगळ्या गोष्टी पालक त्यांना समजावून सांगू शकतील अशी परिस्थिती नव्हती. त्यामुळे समाजाला आवाहन केलं आणि 'विद्यार्थी मित्र'चा गट तयार झाला. जेव्हा वेळ उपलब्ध असेल त्यावेळी दूरध्वनीवरून वस्तीतल्या मुलांशी बोलणं, त्यांच्या पुस्तकातील उपक्रम सोडवतानाच्या अडचणी समजून घेणं आणि त्या निमित्ताने कुटुंबाची माहिती घेऊन कुटुंबाच्या अडचणींवर सहज संवाद साधणं अशी चांगली कौटुंबिक जोडणी साधली गेली. म्हणजे अभ्यास पुस्तिकेबरोबर 'विद्यार्थी मित्र' आणि 'कुटुंब मित्रही' तयार झाले.

याच्या पुढचा टप्पा लक्षात आला. फक्त अभ्यासपूरक नाही तर जेव्हा प्रत्यक्ष अभ्यास करावा लागेल तेव्हा काय आणि मग 'स्मार्ट अभ्यासिका' असा प्रकल्प समोर आला. चैतन्य सॉफ्टवेअर लिमिटेड या कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या मंडळाचा पहिली ते दहावीचा अभ्यासक्रम चैतन्यदायी चलत्‌चित्र (ॲनिमेशन)च्या माध्यमातून, गोष्टी किंवा गाणी यांच्या माध्यमातून संगणकावर तयार केला आहे. अभ्यासक्रम बघणे, तो विषय समजून घेणे, पाठाखालचा सारांश टिपून घेणे, प्रश्नोत्तरे सोडवणे असा पूर्ण अभ्यास उपलब्ध आहे. त्याचे छोटे संच (किट) घेऊन ज्यांना साधारणपणे संगणक हाताळता येतो म्हणजे की–बोर्ड, माऊस, बटण, चालू करणं,

आवश्यकतेप्रमाणे पुढे मागे करणे हे जुजबी ज्ञान असणाऱ्या व्यक्ती याचा उपयोग करू शकतात. अशा प्रकारच्या स्मार्ट अभ्यासिका साधारणपणे १५० सेवावस्त्यांमध्ये स्वानंदच्या माध्यमातून सुरू झाल्या. या अभ्यासिकांमध्ये ४ थी ते ८ वी या वयोगटातील मुलं रोज ८ ते १० गटांमध्ये शारीरिक अंतर पाळून, सॅनिटायझरचा वापर करून मास्क घालून एकत्र येतात. त्या त्या वयोगटातला अभ्यासक्रम निवडून त्यांची अभ्यासाची योजना केली जाते. याचा चांगला उपयोग मुलांना पुन्हा एकदा अभ्यासाकडे घेऊन जाण्यासाठी होत आहे. सिंहगड रस्त्यावरील १४२ वस्त्यांमधून साधारणपणे १२०० ते १५०० विद्यार्थी या प्रकारच्या शिक्षणाचा लाभ घेत आहेत. ज्यांच्याकडे संगणक माध्यमातून (ऑनलाईन) शिक्षणाची सोय नाही अशांना या प्रकारे शिक्षणाची सोय करून देता आली.

**कोरोनाच्या काळामध्ये 'स्क्रीनशिवाय शिक्षण' आणि 'अभ्यास पुस्तिका' या उपक्रमांचा पुणे शहरातील सेवावस्त्यांमधील अनेक विद्यार्थी लाभ घेत आहेत.** या प्रकारचे दोन चांगले उपक्रम राबवण्यामध्ये स्वानंदचा पुढाकार आहे. सर्व स्वानंदच्या कार्यकर्त्यांना याचा अभिमान आहे आणि या बरोबरीने अनेक 'स्व'-रूपवर्धिनीसारख्या समविचारी संस्थांबरोबर हा उपक्रम राबवून पुणे महानगरामधील मुलांच्या शिक्षणाची समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना करता आली, त्यात खारीचा वाटा उचलता आला याचा आनंद सर्व कार्यकर्त्यांच्या मनात आहे.

**– श्री. रविंद्र शिंगणापूरकर**
(सचिव, स्वानंद प्रतिष्ठान,
सहसंपर्कप्रमुख, पुणे महानगर
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ)
– मो. : ९८२२८४७२३७

❖ ❖ ❖



आकाशातून पडणारा पाण्याचा प्रत्येक थेंब शेवटी या ना त्या मार्गानं सागरालाच जाऊन मिळतो.
त्याचप्रमाणे मानवालाही मोक्षाकडेच जावं लागतं. त्यात कसलीही तडजोड नाही.

**वर्षारंभ उपासना :**

गुढीपाडवा – चैत्र शुद्ध प्रतिपदा यानिमित्त बुधवार दि. २५ मार्च २०२० रोजी सकाळी ६.०० ते ७.१५ या वेळेत सद्यस्थितीमुळे एकत्र न येता आपापल्या घरी वर्षारंभ उपासना घेण्यात आली. हा कार्यक्रम फेसबुक लाईव्ह घेण्यात आला. वर्धिनीतील अनेक युवक, युवती व कार्यकर्त्यांना घरबसल्या या कार्यक्रमात सहभागी होता आले. नेहमीप्रमाणे ओंकारेश्वराच्या देवळात न जाता बदलत्या परिस्थितीत ऑनलाईन उपासना आणि मा.रामभाऊ डिंबळे सरांचे मार्गदर्शन झाले.

उपासना कशासाठी हे सांगताना मा. रामभाऊ म्हणाले, ''प्रार्थनेने स्वत:मध्ये बदल होतात आणि यामुळे संपर्कात येणाऱ्या व्यक्तींमध्ये, परिणामी समाजामध्ये उत्कर्षाचे सुखासमाधानाचे बदल आपण घडवू शकतो. उपासनेत म्हटल्याप्रमाणे आपण परमात्म्याचे घटक आहोत म्हणून आपल्यात चांगले गुण असले पाहिजेत. आपल्यातील तमोगुण आपण दूर सारले पाहिजेत. आपण प्रत्येक जण ज्योतीची, तेजाची प्रतिमा आहोत. त्यावर येणारी काजळी झटकली पाहिजे. नकळतपणे प्रसिद्धीच्या मोहात अडकू नये, अंगी येणाऱ्या तमोगुणांना झटकण्याची शक्ती मिळण्यासाठी ही उपासना आवश्यक आहे. उपासनेत सांगितलेला स्वाहाकार कै. किशाभाऊंनी स्वतः कृतीत आणून आपणा सर्वांमध्ये संकल्पाची ज्योत तेवत ठेवली आहे. त्यांच्या प्रत्येक कृतीतून, निष्काम कर्मयोगातून आपल्याला मार्गदर्शन होत असते. किशाभाऊंच्या जन्मशताब्दी वर्षात ठरवलेले पाच संकल्प मोठ्या जिद्दीने, आत्मविश्वासाने आपण पूर्णत्वास नेऊ.''

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधायक जयंती :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९ व्या जयंती निमित्त यंदा आपण घरात राहून, विचारांची जयंती साजरी केली. यात खालील उपक्रम घेण्यात आले...

✻ संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकांना काही मूलभूत हक्क दिले आहेत; पण बहुतांश लोकांना ते माहितीच नाहीत. म्हणून यंदा कलम १४ ते कलम १९ यांची माहिती पोस्टरद्वारे सर्व युवकांना देण्यात आली.

✻ लोकशाही जागर मंचातर्फे व्हिडिओ वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. ह्या कार्यक्रमाला संपूर्ण महाराष्ट्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाद्वारे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे विचारधन' या विषयाचे ५० हून अधिक व्हिडिओ आपणास प्राप्त झाले.

✻ विशेष फेसबुक व्याख्यानमाला घेण्यात आली.

विषय आणि वक्ते खालीलप्रमाणे –

✻ विषय – डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक समता व जातींचे निर्मूलन. वक्ते – डॉ. संजय तांबट

✻ विषय – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनसंघर्ष. वक्ते – सुरेश गोविंद पवार

**रक्तदान मोहिम –** कोरोनाचे संकट आले आणि सगळे काही ठप्प झाले. पण युवा विभागाने पुढचे कार्यक्रम डोळ्यासमोर ठेवून नियोजन चालूच ठेवले. त्यात सगळ्यात महत्त्वाचे होते ते दरवर्षी १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या जन्म दिनी होणारे रक्तदान शिबिर. सध्याच्या परिस्थितीत त्याचे महत्त्व अजून वाढले आहे. म्हणून आपण एक दिवस रक्तदान शिबिर घेण्यापेक्षा **रक्तदान सप्ताह** साजरा करून बोधिसत्व बाबासाहेबांना आदरांजली वाहण्याचे ठरवले. सरकारने सांगितलेल्या सर्व आवश्यक गोष्टींची काळजी घेऊन जनकल्याण रक्तपेढी, दीनानाथ रुग्णालय, ओम ब्लड बँक, के. ई. एम. हॉस्पिटल अशा चार ठिकाणी आपल्या २२० कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. रक्तपेढीच्या सूचनेनुसार काही जणांनी तातडीच्या गरजेसाठी नोंदणी केली.

**जीवनाचं ध्येय उमगलं की 'स्व'चा अर्थ बदलतो. हा 'स्व' केवळ स्वत:च्या शरीर–मनापुरता मर्यादित राहत नाही तर त्याचं क्षेत्र स्वत:पासून कुटुंबापर्यंत पुढे समाजापर्यंत राष्ट्रापर्यंत अखेर अखिल जगतापर्यंत विस्तारत जातं.**

**वर्धापन दिन –**

१३ मे १९७९ ते १३ मे २०२०, वर्धिनीच्या मनुष्यनिर्मिती कार्यास ४१ वर्ष पूर्ण झाली. यंदाचे वर्ष हे संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. वर्धापनदिनानिमित्त वर्धिनीचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर सरांनी ऑनलाईन स्वरूपात मार्गदर्शन केले. यातून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढण्यास निश्चितच मदत झाली.

**'प्रवास जडणघडणीचा'**

या उपक्रमातून चार दशकांच्या या टप्प्यात मा. किशाभाऊ यांनी बसवून दिलेल्या तंत्र आणि मंत्रातून सामान्य वर्धक–वर्धिका ते कर्तृत्ववान युवक युवती असा जडघडणीचा प्रवास कसा झाला याचे अनुभव कथन व्हिडीओच्या माध्यमातून करण्यात आले. त्यात पुढील व्यक्तींचा समावेश होता –

श्री. उदय गुजर – 'स्व'–रूपवर्धिनीचे उपाध्यक्ष, प्रथितयश चार्टर्ड अकौंटंट.

सौ. भाग्यश्री बोरा – महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना वर्धिनीच्या 'आजोळ' प्रकल्पाच्या कार्यकर्त्या होत्या. शिरूरच्या सामाजिक वर्तुळात त्या सक्रीय असतात.

श्री. अमोल उंदरे – वर्धिनीच्या कर्वेनगर भागातील स्वामी सुबोधानंद शाखेच्या उभारणीत सहभाग, वर्धिनीचे सहकार्यवाह. पर्सिस्टंट कंपनीत अधिकारी.

श्री. गिरीश अडके – वर्धिनीत विविध स्तरांवरील जबाबदाऱ्यांचे कौशल्याने निर्वहन. अर्थशास्त्र विषयातील उच्च शिक्षणानंतर सध्या अमेरिकेत वास्तव्य.

सौ. मेघना देशपांडे – पूर्वाश्रमीच्या मंगल कुडलिंगार. पदवी घेतल्यानंतर आसाममध्ये तीन वर्षे पूर्णकालीन कार्यकर्त्या. सध्या गरवारे प्रशालेत अध्यापिका.

डॉ. प्रदीप आगाशे – ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ – अवघड विषय सोपे करून शिकवण्याची विशेष हातोटी. कीर्तनाच्या माध्यमातून पर्यावरण–विज्ञान यांचा प्रसार. महाराष्ट्रभर शिक्षक प्रशिक्षणासाठी अखंड प्रवास.

याशिवाय सौ. उर्मिला गुजर, श्री. सुमित डोळे, श्री. राहुल लाळे, श्री. विलास कुलकर्णी, सौ. लता पुरंदरे, मा. पुष्पाताई नडे, श्री. अरविंद केळकर, श्री. विजय पाटील यांनी मांडलेले अनुभव अतिशय प्रेरणादायी झाले.

**आंतरराष्ट्रीय योग दिवस –**

२१ जून हा दिवस जगभरात योग दिवस म्हणून साजरा केला जातो. या वर्षी त्यानिमित्त सर्व शाखांवर विविध उपक्रम झाले. त्यामध्ये विविध शारीरीक हलचालींचा वापर करून आपल्या शाखेचे नाव तयार करणे अशी स्पर्धा घेण्यात आली. तसेच एक बैठे, एक उभे राहून आणि एक झोपून अशा तीनही स्थितीतील आसनांचे फोटो वर्धकांनी गटावर पाठवले. यामध्ये विजेत्या ठरलेल्या शाखा –

१) भगिनी निवेदिता शाखा २) स्वामी दयानंद शाखा ३) समर्थ रामकृष्ण शाखा

**सूर्यग्रहण –**

कंकणाकृती सूर्यग्रहण २१ जून २०२० रोजी झाले. भारताच्या काही भागांतून ते दिसले. पुण्यातून खंडग्रास सूर्यग्रहण दिसणार होते. आधीच पावसाळा, त्यात लॉकडाऊन. त्यामुळे आपापल्या घरातूनच हे ग्रहण पहावे लागणार होते. खगोलप्रेमी आणि शिक्षकांसाठी ही नामी संधी होती. समाजातील अंधश्रद्धा दूर सारून सर्वांनी सूर्यग्रहण पहावे आणि काही सोपे प्रयोग या निमित्ताने करावेत यासाठी मार्गदर्शन करण्याची संधी वर्धिनीच्या फिरत्या प्रयोगशाळेचे श्री. सुनील कुलकर्णी सरांनी उपलब्ध करून दिली. त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत ग्रहण कसे

होते, सूर्यग्रहण पाहताना घ्यावयाची काळजी तसेच काही प्रयोग यांची प्रात्यक्षिके व्हिडिओच्या माध्यमातून दाखवली. या व्हिडिओला इतकी प्रसिद्धी मिळाली की राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यामार्फत दररोज अभ्यासाच्या लिंक्स दिल्या जातात त्यात सरांच्या या लिंकचा समावेश केला. जास्तीत जास्त विद्यार्थी आणि पालकांपर्यंत हा व्हिडिओ पोहोचला.

केंद्रीय तासिका समूहात आदल्या दिवशी हा व्हिडिओ आणि सूर्यग्रहण संबंधित वेळांचे तपशील आणि आकृतीसहीत माहिती प्रत्येक शाखेच्या गटांवर पोस्ट झाली. अनेक वर्धक, वर्धिका, युवक आणि युवतींनी ग्रहण पाहण्याचा आनंद लुटला. संध्याकाळी ग्रहणाचे फोटो पोस्ट व्हायला लागले. कुलकर्णी सरांनी मार्गदर्शन केल्यानुसार योग्य काळजी घेऊन वर्धकांनी ग्रहण पाहिले.

**प्रतिसाद –** या आधी मी चंद्रग्रहण पाहिलं होतं. ते पाहण्यासाठी शाळेने सहल नेली होती; पण यावेळचे सूर्यग्रहण मी कुटुंबासोबत पाहिलं आणि माझ्यासाठी सर्वात मोठा आनंद म्हणजे हे ग्रहण मी माझ्या लहान भावंडांनाही दाखवलं कारण त्यांनी अंधश्रद्धांवर विश्वास ठेऊ नये म्हणून. हे ग्रहण अविस्मरणीय यासाठी की त्याचे फोटो काढण्यासाठी मी तीन तास उभा होतो.

**– निखिल साबळे** (स्वामी ब्रह्मानंद शाखा)

**७३ वा स्वातंत्र्यदिन विशेष –**

१५ ऑगस्ट ध्वजारोहणाचा कार्यक्रम शासकीय नियमांचे पालन करून निवडक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडला. वर्धिनीच्या सर्व विभागातील कार्यकर्त्यांसाठी संध्याकाळी ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

विषय – चीनचे वाढते वर्चस्व आणि भारतापुढील आव्हाने. वक्ते : डॉ. श्रीकांत परांजपे

पुढच्या काळात आपल्या देशासमोर सर्वांत मोठे आव्हान चीनचे असणार आहे. ते आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, सामरिक असे सर्वच पातळ्यांवर असणार आहे. त्याला सामोरे जाण्यासाठी भारताचे कोणकोणत्या पातळीवर प्रयत्न असावे लागतील यावरील आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. श्रीकांत परांजपे यांनी अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी केली.

**गणेशोत्सवातील विशेष उपक्रम – रक्तदान –**

पुण्यातील गणेशोत्सव म्हणजे उत्साह, जोश, उर्जा यांचे भांडार. या वर्षी कोरोनासारख्या महाभयंकर आजाराला सामोरे जात गणेशोत्सव निर्विघ्नपणे आणि संयमित वातावरणात पार पडला.

'स्व'–रूपवर्धिनी गणेशोत्सवात दरवर्षी ढोल–ताशे पथक, पथनाट्य अशा अनेक पद्धतीने सहभागी होते. परंतु या वर्षी नव्याने आणि वेगळ्या पद्धतीने आपण गणेशोत्सव कार्यात सहभागी झालो. यामध्ये पुणे शहरातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन कला स्पर्धा, युवा गटासाठी गुगल मिटद्वारे बौद्धिक व्याख्याने, पुणे महानगरपालिकेसोबत मूर्ती संकलन केंद्रात सहभाग, गणेश मंडळासोबत रक्तदान शिबीराचे आयोजन अशी चार प्रकारची कामे आपण केली.

कोरोना पार्श्वभूमीवर रक्तदान शिबीर घेण्यावर मर्यादा आली आहे. प्रत्येक रुग्णालयात रक्ताचा तुटवडा भासत आहे. ही गरज लक्षात घेता संस्थेने गणेश मंडळांना सोबत घेत रक्तदान शिबिरांचे आयोजन केले. गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या कालावधीत एकूण १२ मंडळांसोबत १२ वेगवेगळ्या ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. एकूण ७ रक्तपेढ्यांचे सहकार्य उपक्रमासाठी झाले. तर आयोजन करताना ५० नवीन कार्यकर्ते

संस्थेशी जोडले गेले. या रक्तदान मोहिमेत एकूण ४९९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. समाजहिताचे कार्य पार पडण्यासाठी अशा अनोख्या पद्धतीने संस्थेने पाऊल उचलले आणि त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. यातील अनेक गणेश मंडळांनी पुढील वर्षीदेखील असेच उपक्रम घेण्याचा संकल्प केला. रक्तदान शिबिरात एकूण १२ युवक-युवतींनी केंद्र प्रमुख म्हणून काम केले तर उपक्रम प्रमुख म्हणून श्री. राहुल शिळीमकर हा युवक कार्यकर्ता होता.

गणेश मंडळापैकी एका अध्यक्षाचे मनोगत पुढीलप्रमाणे -

'आमच्या लोहियानगर वस्तीमधील गणेश मंडळाने प्रथमच असा रक्तदान शिबिराचा उपक्रम आयोजित केला. याचा फार आनंद होत आहे. दर वर्षापासून असे शिबीर घेण्याचा संकल्प आहे.'

- श्री. रोहित भोंडे (अध्यक्ष - छत्रपती शिवाजी महाराज मंडळ)

**गणेशोत्सव व्याख्यानमाला -**

वर्धिनी गेली चार दशके पुण्यातील गणेशोत्सवामध्ये हिरीरीने सहभागी होत आहे. ढोल-ताशा पथक, पथनाट्य, ध्वजपथक, लेझिम पथक इत्यादी माध्यमातून पुण्यातील अनेक नामांकित गणेश मंडळांसमोर आपली सेवा वर्धिनीने रुजू केली आहे. यंदाच्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर समाजप्रबोधनासाठी वर्धिनीने ऑनलाइन व्याख्यानमालेचे आयोजन केले. पूर्वी लोकमान्य टिळकांच्या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे व्याख्याने, तो एक प्रकारचा ज्ञानयज्ञ असायचा. संघटन आणि समाज प्रबोधन हा त्यामागचा मुख्य उद्देश असे. या हेतूने यंदा आपल्या कार्यकर्त्यांचे प्रबोधन व्हावे यासाठी तीन सत्रे झाली.

**✻ मा. श्री. दिग्पाल लांजेकर यांची मुलाखत** विषय - 'प्रवास कलाकारातील कार्यकर्त्याचा'

प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक (फर्जंद, फत्तेशिकस्त, जंगजौहर) लेखक, अभिनेता दिग्पाल लांजेकर यांची प्रवीण पासलकर या युवा कार्यकर्त्याने घेतलेली मुलाखत उद्बोधक झाली. त्यातील काही ठळक मुद्दे -

- लहानपणी झालेले कसबा पेठेच्या वातावरणात, संघ शाखेतील स्वयंसेवक म्हणून, वर्धिनीत वर्धक म्हणून झालेले संस्कार; तसेच प्रसिद्ध इतिहासकार निनाद बेडेकर, राजन जोशी, ज्ञानेश पुरंदरे यांच्याकडून ऐकलेल्या शिवाजी महाराजांच्या व इतर ऐतिहासिक गोष्टी या सर्वांतून मला इतिहासाची गोडी लागली.
- वाचाल तर वाचाल - आयुष्यातील तणावपूर्ण प्रसंगात मला पुस्तकांनी हात दिला. गो. नी. दांडेकर यांची 'मोगरा फुलला' कादंबरी , स्वा. सावरकर यांचे 'माझी जन्मठेप' हे चरित्र अशा अनेक पुस्तकातून, संतांच्या चरित्रातून त्यांनी भोगलेल्या कष्टदायी दुःखकारक प्रसंगापुढे, स्वातंत्र्यचळवळीत भोगलेल्या अपार वेदना, हाल-अपेष्टा यांच्यापुढे आपली संकटे खूप फिकी आहेत हे जाणवले आणि हार न मानता मी पुढे जात राहिलो.
- दिग्दर्शक झाल्यावर सिनेमा क्षेत्रातील प्रत्येक विभागात काम करता येते. दिग्दर्शक हा सिनेमाच्या माध्यमातून कथाकथन करत असतो आणि गोष्ट सांगायला मला मनापासून आवडते म्हणून मी दिग्दर्शक झालो.
- चित्रपट निर्मिती म्हणजे विषय - संकल्पना - कथा - पटकथा - संवाद हा पूर्व निर्मितीतील टप्पा; तसेच कास्टिंग, प्रॉडक्शन, एडिटिंग इत्यादी विभागांचे एकत्रित काम. हे एक मोठे गटकार्यच असते.
- दादा पासलकर हे माझे पहिले गुरू. नंतर या क्षेत्रातील अनेक दिग्गज लोकांकडून वेगवेगळ्या गोष्टी शिकायला मिळाल्या. मी प्रा. शामराव जोशी यांच्याकडे अजूनही या क्षेत्रासाठी अभ्यास करत आहे. यामुळे माझ्यातला विद्यार्थी आणि वर्धक सदैव जागा राहातो.
- युवकांसाठी विशेष - तुम्ही निवडलेल्या क्षेत्रात तुमचा स्वतःचा नियमित रियाज, स्वाध्याय व्हायला हवा.

अनेक लोकांना भेटून त्यांच्या अनुभवातून आपल्या जाणिवा समृद्ध केल्या पाहिजेत. सिंहगड परिसरात झालेली रेव्ह पार्टी परत कोठेही होऊ नये, यासाठी माझ्याकडून ज्ञापुंनी पथनाट्याचे रेकॉर्डिंग करून घेतले. तेव्हा असे लक्षात आले की तुमच्याकडे जे साधन उपलब्ध असेल त्याचा वापर करून तुम्ही चांगल्या गोष्टी समाजात रुजण्यासाठी काम केले पाहिजे.

**मा. ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त)** विषय – चीन व पाकिस्तानचे भारताविरुद्ध हायब्रीड वॉर आणि भारताचे प्रत्युत्तर.

मा. ब्रिगेडिअर महाजन ७ लाइफ मराठा इन्फंट्री तुकडी मध्ये कार्यरत होते. तसेच ऑपरेशन रक्षकमध्ये त्यांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. 'युद्ध सेवा' मेडलने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या भाषणातून मांडले गेलेले ठळक मुद्दे –

● सर्वप्रथम चीन, पाकिस्तान या दोन्ही देशांना लागून असलेला भारताचा भौगोलिक प्रदेश आणि त्यांच्या सीमा याची ओळख त्यांनी करून दिली.

● सध्या सुरू असलेल्या भारत–चीन सीमा वादाची पार्श्वभूमी व पेंगोंग सरोवराचा दोन तृतियांश भाग चीनने कसा बळकावला याची माहिती सांगितली.

● गलवान खोऱ्याचे महत्त्व – ते म्हणाले की चीनला वाटते की गलवान खोरे वापरून भारत अक्साई चीनवर आक्रमण करेल. भारताने दौलत बेग ओल्डी रस्ता बांधला आहे. हा रस्ता २५५ किलोमीटर लांब असून रसद पुरवठयाच्या दृष्टीने, व्यूहरचनात्मक तसेच सैन्याच्या बदलाकरिता खूप महत्त्वाचा आहे. यामुळे उत्तम निगराणी करून आक्रमणास चोख उत्तर दिले जात आहे.

● देशाची सुरक्षा आणि सन्मान हा सर्वप्रथम प्रत्येकाने जपायला हवा. जेव्हा राष्ट्रावर चहूबाजूंनी संकटं येतात, आशेचा दीप दुरूनही दिसत नाही तेव्हा देशाची परीक्षा म्हणजेच सर्व नागरिकांची परीक्षा असते. प्रत्येकाने आपले नागरिकत्व जागे ठेऊन वागले पाहीजे. कोरोना काळातही 'converting crisis into opportunity' हे लक्षात ठेवून आपली कृती असली पाहिजे.

**डॉ. भूषण केळकर** विषय – इंडस्ट्री ४.० आणि कोरोनोत्तर जगातील संधी

त्यांच्या मार्गदर्शनातील काही विशेष मुद्दे –

● इंडस्ट्री ४.० म्हणजे नक्की काय, त्याचा इतिहास, आधीच्या इंडस्ट्रीज आणि यामधील फरक, तसेच ह्या संकल्पनेची सुरवात कशी झाली या मूलभूत गोष्टी त्यांनी स्पष्ट केल्या.

● ही इंडस्ट्री पूर्णपणे इंटरनेट वर आधारित आहे. सायबर सिक्युरिटी, आर्टिफिशल इंटेलिजन्स हे सर्व इंडस्ट्री ४.० चा एक भाग आहे. भविष्यात अशी अनेक क्षेत्र यात सामावली जातील.

● या संकल्पनेचा सध्याच्या कोरोना काळात खूप उपयोग झाला. जसे की रुग्णालयात रुग्णांची सेवा करण्यासाठी, कोरोना संसर्गातून वाचण्यासाठी रोबोटचा वापर करण्यात आला. तसेच थ्रीडी प्रिंटिंगद्वारे अँटी व्हायरल मास्क आणि इतर वैद्यकीय साधने बनवण्यात आली.

● इंडस्ट्री ४.० मुळे आधुनिक आणि डिजिटल कार्यपद्धती अस्तित्वात आली. त्यामुळे कामात सुसंगती वाढली आणि वेळेची बचत झाली. आपण सर्वांनी होणाऱ्या बदलांमुळे आपले ज्ञान वाढवले पाहिजे.

● पुढील काळातील करियरची पंचसूत्री –
१) विश्लेषणातून आपण संश्लेषणाकडे जायला हवे.
२) भावनिक बुद्धिमत्ता व परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमतांकडे वळायला हवे.
३) निरंतर शिक्षणाकडे वळायला हवे.
४) नवनिर्मितीकडे जाणारा रस्ता धरायला हवा.
५) आंतरविद्या शाखेच्या शिक्षणावर भर द्यायला हवा.

● सरांनी मार्गदर्शनात १२ सुक्ष्म प्रणालींवर भर दिला. त्या म्हणजे कमीत कमी २ वेगवेगळ्या विषयात पदवी शिक्षण घ्या, आपली कौशल्ये विकसित करा, डिजिटल प्रेझेन्स वाढवा, संवादकौशल्य वाढवा, नवीन भाषा शिका, सामान्य ज्ञान वाढवा, स्वतःची ओळख लक्षात ठेवा, समाजासाठी आपण काम केले पाहिजे हे ही लक्षात ठेवा.

**गणेश मूर्ती संकलन –**

गेल्या काही महिन्यांपासून कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गामुळे निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीत 'स्व'–रूपवर्धिनीच्या युवांनी अभिमानास्पद काम केले. याचाच पुढचा टप्पा म्हणून पुणे महानगरपालिकेने कोरोनाच्या पार्श्र्वभूमीवर आयोजित केलेल्या पर्यावरण अनुकूल गणेश विसर्जन अभियानात कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. कोरोनामुळे अनंत चतुर्दशीला मिरवणुका नव्हत्या, ढोल–ताशा पथके नव्हती. पण सामाजिक जबाबदारीने ढोल पथकातील तरुणाईने 'स्व'–रुपवर्धिनीच्या माध्यमातून कोरोनाचा जास्त संसर्ग असलेल्या प्रभागात वस्तीत जाऊन योग्य सुरक्षा घेत पर्यावरण अनुकूल गणेश विसर्जन अभियानात काम केले.
या अभियानात ६०० युवा कार्यकर्ते सहभागी झाले. पुणे महानगरपालिका हद्दीतील ७ क्षेत्रीय कार्यालयातील ७२ मूर्ती संकलन केंद्रांवर आणि ८ फिरत्या हौदांवर गणेश मूर्ती विसर्जन, मूर्ती संकलन, अमोनियम बायकार्बोनेट पावडर वाटप, निर्माल्य गोळा करणे, भक्तांना शिस्तीने विसर्जन करण्यास सांगणे, त्यांची नावनोंदणी करणे, परिसरातील मूर्ती संकलन केंद्रावर आणणे, नदी पात्रातील विसर्जन थांबवणे अशी अनेक कामे या स्वयंसेवकांनी केली आणि हजारो मूर्तींचे संकलन केले.
या अभियानात 'स्व'–रुपवर्धिनीसह पुण्यातील रमणबाग, श्रीराम, ज्ञान प्रबोधिनी व अन्य १२ पथकांचादेखील उत्स्फूर्त सहभाग होता. क्षेत्रीय आरोग्य अधिकारी आणि मुकादम यांनी युवा स्वयंसेवकांचे खूप खूप कौतुक केले व अत्यंत कठीण काळात मोलाची मदत केली म्हणून आभार व्यक्त केले.
युवा कार्यकर्तेअशोक इंगवले, प्रशांत तांबे, अमोल शेलार, राहुल पायगुडे यांनी या अभियानाचे नियोजन व अंमलबजावणी केली.

**उपक्रमात सहभागी झालेल्या युवतींचे अनुभव :**

● यंदाचा गणेशोत्सव हा पर्यावरणपूरक, वेगळा आणि शिस्तबद्ध असा होता. 'स्व'–रूपवर्धिनीने विसर्जन अभियानात महानगरपालिकेच्या कामात हातभार लावण्याचा प्रयत्न केला. वर्धिनीत आपण आहोत म्हणून आपल्याला आज मूर्ती संकलन उपक्रमात भाग घेता आला याचा सार्थ अभिमान आहे.

– सोनाली यादव

● नागरिक विविध भागातून मूर्ती विसर्जन आणि दान करण्यासाठी येत होते. आपल्या युवक युवतींचा गट शिस्तबद्ध पद्धतीने काम करत होता. प्रत्येकजण आपली कामगिरी पार पाडत होता. अनेक नागरिकांना आपलं

काम खूप आवडलं आणि तसे अभिप्राय पण त्यांनी दिले. यातून आपल्या युवक-युवतींशी संवाद साधला गेला.

– मृणाल सुतार

• काही व्यक्तींना विसर्जनाची नवीन पद्धत पटत नव्हती तरीही आपण वाद न घालता त्यांच्याशी सुसंवाद साधून आपलं काम सोपं कसं करता येईल हे पाहिलं आणि अनेक नागरिक पर्यावरण पूरक विसर्जनात सहभागी झाले.

– पूर्वा निनाल

• पर्यावरण पूरक गणेशोत्सव कसा असावा तर तो असा असावा. लहान मुलांना विसर्जनासाठी सोडत नव्हते तर काही मुले बाप्पा चालले म्हणून रडताना दिसली. एकाने तर चिठ्ठी लिहून गणपती बाप्पा सोबत पाठवली होती. अशा संमिश्र अनुभवातून मला काम करताना आनंद वाटला.

– धनश्री शिंदे

• नेहमी गणपतीत ढोल पथक, ध्वज पथक, मल्लखांब, पथनाटय असतातच पण मूर्ती संकलनाचा हा अनुभवही वेगळा आणि पहिलाच होता. लोकांनी सहकार्य केलं. गर्दी होऊ न देता, लोकांच्या श्रद्धेला धक्का न लागता तसेच स्वत:ची काळजी घेत सर्व कार्यकर्त्यांनी आपापली जबाबदारी उत्तम रितीने पार पाडली.

– पूर्वा भिडे

**सांस्कृतिक विभाग –**

यंदाच्या वर्षी सांस्कृतिक विभागांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये पुणे शहरातील ५ ते २५ वर्षे वयोगटातील एकूण २०९ स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यात वैयक्तिक व कौटुंबिक व कौटुंबिक अशा दोन स्पर्धांचा समावेश होता. निबंध, कविता, नृत्य, चित्रकला, गायन, संगीत व अशा अनेक प्रकारांमध्ये स्पर्धकांनी आपली कला सादर केली. आयोजनाचे काम वैदेही बेहेरे, हेमंत शिर्के व हनुमान मेकडे यांनी पाहिले. स्पर्धेचे परीक्षण हर्षदा शिंदे, तेजश्री शिंदे, मंदार पोफळे, सुरेश पवार यांनी केले. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट सहभागाचा फिरता चषक भगिनी निवेदिता शाखेने पटकावला.

**सेवेचे ठायी तत्पर –**

फोनची रिंग वाजली. समोरून आवाज, ‘‘दादा आमच्या वस्तीत २० कुटुंबांना धान्याची गरज आहे’’. लगेच दुसरा फोन, ‘दादा धान्याची गाडी कुठपर्यंत पोहोचली आहे ?’ तेवढ्यात मागून कुणीतरी हाक देत ‘‘दादा इथलं वाटप झालं आहे, आता काय करू ?’’ या सादेला दादाचा प्रतिसाद ‘‘चला कार्यकर्तेहो मोहीम फत्ते झाली. आता पुढची वाटचाल सुरू’’. असा दमदार प्रतिसाद देणारा वर्धिनीचा युवा कार्यकर्ता राज जाधव वर्धिनीच्या बालवाडीचा विद्यार्थी, समर्थ रामकृष्ण शाखेचा वर्धक आणि आता शहर भागाचा युवा विभाग प्रमुख. सतत हसतमुख आणि उत्साही व्यक्तिमत्त्व. युवा गटात आल्यावर तासिका प्रमुख, कार्यक्रम प्रमुख, शाखा प्रमुख, शिबिरात भोजन प्रमुख, भांडार प्रमुख, वर्धिनीच्या गणेशोत्सवामध्ये वादन प्रमुख अशा अनेक जबाबदाऱ्या राजने पार पाडल्या. राज दादाचे पूर्ण कुटुंब म्हणजे वर्धिनीचं हक्काचं घर. कोरोनाच्या या संकटकाळात वर्धिनीच्या धान्य वाटप केंद्राचा प्रमुख म्हणून अतिशय जबाबदारीने राजने काम पूर्ण केले. जवळपास १५०० गरजू कुटुंबांची माहिती शाखा युवांच्या मदतीने एकत्रित करणे, त्यानुसार वाटपाच्या रचना लावणे, कोणत्याही नियमाचे उल्लंघन न होता योग्य त्या व्यक्तीपर्यंत मदत पोहोचवणे यात वर्धिनीला यश मिळाले. या सर्व मोहिमेत राजसोबत रामकृष्ण शाखेच्या युवकांनी उत्तम कामगिरी बजावली.

**मकर संक्रमण उत्सव –**

वर्धिनीचे संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन यांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांचे चरित्र, विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने संक्रांत उत्सव शाखाशः घेण्यात आले. सर्व ठिकाणी पालक, शाखेतील शिक्षक, शाळेतील शिक्षक व माजी वर्धक यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

स्वामी दयानंद सरस्वती शाखेतील वर्धकांनी नाट्य सादरीकरणातून 'वर्धिनी १९७९ ते २०२०' सर्वांसमोर मांडली. यात नाटक, मनोरे, मैदानी खेळ, शारीरिक तसेच चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. पालकांसाठी किशाभाऊंच्या छायाचित्रांची प्रदर्शनी मांडण्यात आली होती.

राजर्षी शाहू शाखेत अरविंद केळकर सरांनी किशाभाऊंची जीवनगाथा मांडली. वर्धकांनी पद्य व मनोगतातून 'मी व माझी शाखा' हा विषय सर्वांपर्यंत सहज सोप्या पद्धतीने पोचविला.

धर्मवीर शंभूराजे शाखेने 'सुंदर माझी शाखा' या नाट्य सादरीकरणाने 'स्व'–रूपवर्धिनीचे काम सर्वांपर्यंत पोचले. प्रत्येक प्रसंगाला उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त पावती दिली.

काही निवडक प्रतिक्रिया –

सौ. कुमुदिनी मांडवकर – शाखेतल्या चिमुकल्या वर्धक, वर्धिकांनी अतिशय सुंदर प्रात्यक्षिके व कौशल्यपूर्ण कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन उत्तमरीतीने करणाऱ्या अकरावीतल्या कुपाटे व ननावरे या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक.

सौ. सुनंदा महाडिक – नाट्य सादरीकरणातून शाखेची सखोल माहिती मिळाली. विद्यार्थी मित्रांवर संस्कार घडवून समाजाचा विकास करणारी संस्था म्हणजे 'स्व'–रूपवर्धिनी.

**उडान २०२० – विज्ञान दिन आढावा**

'स्व'–रूपवर्धिनी आयोजित 'उडान २०२० – विज्ञान दिन' उद्याच्या सक्षम भारताच्या वैज्ञानिकांचा मेळावा जगताप विद्यालय, हिंगणे खुर्द, पुणे येथे पार पडला. सिंहगड रोड, कर्वेनगर भागातील २० शाळांचा सहभाग होता. यामध्ये २०० पेक्षा अधिक प्रयोग, प्रतिकृती व ७०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एवढ्या लहान वयात लोकांना आश्चर्यचकीत करतील असे प्रयोग त्यांनी सादर केले. पालक, शिक्षक व परिसरातील स्थानिक नागरिक यांनी मोठ्या संख्येने विज्ञान दिनास भेट दिली. या विज्ञान दिनास प्रमुख वक्ते मा. सुहास काणे (निवृत्त उपसंचालक, संरक्षण अनुसंधान संस्था) व प्रमुख पाहुणे डॉ. जालिंदर आंबेकर हे उपस्थित होते. या मेळाव्यात इयत्ता ५ वी व ६ वी साठी स्वच्छता, टाकाऊपासून टिकाऊ, पर्यावरण व हवा, पाणी हे चार विषय विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. इयत्ता ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना, जलसंवर्धन, शहरातील समस्या व उपाय, टेक्नॉलॉजी व उपकरणे हे चार विषय दिले होते. यामध्ये वाहतूक, कचऱ्याचे व्यवस्थापन, तंत्रज्ञान या पद्धतीचे विविध प्रयोग मुलांनी सादर केले. समारोप सत्रामध्ये प्रमुख पाहुणे डॉ. जालिंदर आंबेकर सरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचे कौतुक केले. आपल्या शहरातील समस्यांवर चर्चा करण्यात आली. त्यांवर विद्यार्थ्यांनीच उपाय सुचवले. प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन झाल्यानंतर बक्षिस वितरण करण्यात आले. स्वामी दयानंद सरस्वती शाखेतली इ. ७ वीमधील वर्धक आदित्य गिरमे व रोहित गिरमे यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. भगिनी निवेदिता शाखेतील इ. ६ वीच्या गटातील 'नैसर्गिक रंगद्रव्य' ह्या प्रयोगाला तिसरा क्रमांक मिळाला.

**शाखा विभाग व्यवस्थाशः प्रशिक्षण**

'स्व'–रूपवर्धिनी शाखा विभागाची नव्या जोमाने सुरुवात होते ती जून– जुलै महिन्यात. दरवर्षी या काळात

होणाऱ्या युवा शिबीरात नव्या व्यवस्था प्रमुखांच्या प्रशिक्षणाने आपल्या कामाचा श्रीगणेशा होतो. या वर्षी प्रत्यक्ष एकत्रीकरण आणि शिबीर घेणे शक्य नव्हते. पण यात खंड पडू न देता शाखा विभागाने सर्व शाखांच्या व्यवस्था प्रमुखांची ऑनलाईन प्रशिक्षणे घेतली. यात सर्व शाखा उत्साहाने सहभागी झाल्या. सदर प्रशिक्षणात प्रत्येक शाखा व्यवस्था प्रमुखाला विषय वाटून दिले होते. त्या विषयाचा अभ्यास करून त्याची मांडणी प्रमुखांनी केली. व्यवस्थेचे महत्त्व, प्रमुखाची भूमिका, आगामी काळातील नियोजनाचे टप्पे आणि एकूणच शाखा विकासासाठी सर्व व्यवस्थांचे एकत्रित प्रयत्न या विषयांवर चर्चा झाली. सर्व प्रशिक्षणांना उत्तम प्रतिसाद मिळाला.

**तासिका व्यवस्था**

दि. ६ ऑगस्ट २०२० रोजी तासिका विभागाचे प्रशिक्षण पार पडले. यात तासिका व्यवस्था प्रमुखांना मार्गदर्शन करताना शुभांगी तांबट ताईंनी अनेक महत्त्वाच्या मुद्यांची मांडणी केली. 'स्व'-रूपवर्धिनीचे मनुष्य निर्मितीचे शिक्षण मुलांपर्यंत पोहोचवून त्यांचात नेतृत्व विकास घडवायचा आहे. त्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमातून मुलांच्या बौद्धिक आणि शैक्षणिक विकासासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत असे ताईंनी सांगितले.

**कार्यक्रम व्यवस्था**

कार्यक्रम व्यवस्था ही एक अशी रचना आहे ज्यातून वर्धिनीला अपेक्षित अनेक विषय मुलांपर्यंत पोहोचवता येतात. सदर प्रशिक्षणाच्या माध्यमातून कार्यक्रम व्यवस्थेचे महत्त्व आणि गरज सर्व कार्यक्रम प्रमुखांना समजावून सांगण्यात आली. यामध्ये श्री. संदीप मोरे, मंदार पोफळे, हर्षल सोनार, रोहित धायरकर यांनी मार्गदर्शन केले.

**संपर्क व्यवस्था**

संपर्क हा वर्धिनीच्या कामाचा आत्मा आहे हे सूत्र अनेक वर्ष आपण जपत आहोत. नव्या पिढीला संपर्क या विषयातले मर्म कळावे आणि आजही उत्तम संपर्काच्या जोरावर वर्धिनीशी अनेकजण कायमस्वरूपी जोडले जावेत हा विचार प्रशिक्षणाच्या माध्यमातून पोहोचवण्यात आला. सदर प्रशिक्षणात युवांना विविध प्रसंग सांगण्यात आले आणि तुम्ही त्या प्रसंगात कशा पद्धतीने संपर्क कराल याविषयी प्रात्यक्षिक देण्यास सांगितले. समारोप श्री. निलेश धायरकर यांच्या मार्गदर्शनाने झाला.

**मैदान व्यवस्था**

दिनांक ५ ऑगस्ट २०२० रोजी ऑनलाईन पद्धतीने केंद्रीय मैदानप्रमुख बैठक घेण्यात आली. शाखा विभागप्रमुख शुभम जगताप, डॉ. विनेश नगरे, विश्वास कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. बैठकीच्या आधी सर्व मैदान प्रमुखांना काही विषय अभ्यासासाठी दिले होते, त्यांनी त्यांची मांडणी केली. शाखेच्या मैदानाचा उद्देश आणि त्यातून वर्धिनीला काय अपेक्षित आहे याबाबत चर्चा झाली. विनेश सरांनी मैदानाचे महत्त्व व मैदानाचे नियोजन या संदर्भात मार्गदर्शन केले.

**दि. ५ सप्टेंबर – शिक्षक दिन विशेष कार्यक्रम**

आपल्या जीवनात शिक्षकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, शिक्षक हा फक्त विद्यार्थी घडवत नसतो तर तो समाजपण घडवत असतो. उदा. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सर्वपल्ली राधाकृष्णन, कृ. ल. पटवर्धन सर इ. हे सर्व हाडाचे शिक्षक होते. यांनी समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काय करता येईल यावर काम केले. समाजातील सर्वांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची

जबाबदारी शिक्षकांमध्ये असते. म्हणून ह्या दिवशी सर्व गुरुजनांना वंदन करून 'स्व'–रूपवर्धिनीने **'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२०'** या विषयावर **ऑनलाईन चर्चासत्र** आयोजित केले होते.

या चर्चासत्रात प्रथम **डॉ. चित्रा सोहोनी** यांनी माध्यमिक शिक्षणाच्या नवीन धोरणात काय आहे याविषयी मांडणी केली. स्वयं अध्ययन, वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यातील वास्तव व उपाययोजना, ५+३+३+४ हे धोरण म्हणजे काय? आवडीचे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य, मातृभाषेतून शिक्षण, सातत्यपूर्ण मूल्यमापन, बहुआयामी शाळा आदी मुद्दे त्यांनी मांडले. शेवटी त्या म्हणाल्या, 'नवीन शिक्षणपद्धती हे एक सुंदर स्वप्न आहे. ते प्रत्यक्षात उतरवणे आव्हानात्मक आहे.'

**प्रा. अनिरुद्ध देशपांडे** यांनी या नवीन शिक्षण पद्धतीत वंचित उपेक्षित घटकांसाठी काय आहे याची मांडणी केली. शिक्षण हा परिवर्तनातील 'मैलाचा दगड' असल्याने गतिमान ज्ञानसमाजाचे भान ठेवणे आव्हानात्मक आहे. समाजातील वंचितांना सहज उपलब्ध होणारे सर्वसमावेशक व योग्य शिक्षण हवे, वंचितांमधील गळतीचा विचार करून १० वर्षांमध्ये तो शून्यावर आणण्याचे लक्ष्य, मातृशक्तीच्या शिक्षण आणि आरोग्यावर भर आदी मुद्दे मांडून ते म्हणाले, ''भाषेची निवड हा व्यक्तीचा अधिकार आहे ह्या न्यायालयीन निर्णयाचा विचार करून मातृभाषेतून शिक्षण ह्याचा आग्रह व पारंपारिक उद्योगांना नवीन ऊर्जा देण्याचा प्रयत्न या शैक्षणिक धोरणात केला आहे. काही संस्थांनी सृजनशीलतेने यातील काही बाबींचा उपयोग शाळेत केला आहे. त्याचा फायदा मुलांना होत आहे. त्यामुळे सर्वांनीच या नवीन पद्धतीचा लाभ घ्यायला हवा असे वाटते.''

**वर्धिनी घराघरांत –**

**'स्व'–रूपवर्धिनी हे ३६५ दिवस चालणारं आनंदालय आहे.** सर्वत्र पसरलेल्या कोरोनाचे संक्रमण भारतातही झाल्यामुळे याला आटोक्यात आणण्यासाठी सर्व जनमानसावर एकत्र न येण्याचे, घरीच राहण्याचे बंधन आले. हे बंधन आपल्या प्रत्येकाच्या हिताचे आहे हे ओळखून ते वर्धिनीच्या सर्व उपक्रमांनी आनंदाने स्वीकारले आणि मग सर्वांनी आपली वर्धिनी, आपली शाखा, आपली अभ्यासिका, आपली बालवाडी प्रत्येक घरात घेऊन जाण्याचा संकल्प केला. आता आपल्या केवळ १७ शाखा नसतील तर जेवढे वर्धक–वर्धिका, जेवढे युवा तेवढ्या शाखा भरवण्याचा. वर्धिनीशी आपल्या घरांची जोडणी पक्की करण्याचा आणि वर्धिनी घराघरात रुजवण्याचा विचार झाला. मग सगळे कार्यकर्ते पूर्ण उत्साहाने तयारीला लागले. तंत्रज्ञानाने दिलेली देणगी पुरेपूर वापरून वर्धिनी घराघरांत नेण्याचा प्रवास सुरू झाला. विभागश: ऑनलाईन बैठका पार पडल्या. पालकांचे व्हॉटस्‌ॲप समूह तयार झाले. रोज घरोघरी जाऊन केला जाणारा संपर्क आता फोन, व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून सुरू झाला. मात्र, यातील प्रेम अन्‌ आपुलकी आटली नाही.

नियोजनबद्ध काम हे आपल्या कामाचे वैशिष्ट्य. त्यानुसार एक १५ कलमी कार्यक्रम आखला. त्यात व्यायाम खेळ, योगासने, ध्यान, पुस्तक वाचन व परिचय, शालेय अभ्यास नियोजन, कात्रण वही प्रकल्प, शैक्षणिक ॲप्सची माहिती, विज्ञान प्रयोग, घरगुती स्वछता व घरकामात मदत, प्रार्थना व परिपाठ, पद्य, बुद्धवंदना, तुकोबांचे अभंग, किशाभाऊंची पत्र ऑडिओ–व्हिडीओ माध्यमातून, भाषिक विकास उपक्रम, प्रज्ञा विकास, प्रेरणा जागरण व मूल्यवर्धन यातून सुरू झाला एक आनंदी प्रवास.

❋ मुलाखत आई – बाबांची : वर्धक–वर्धिकांनी या बंदीच्या काळात आपल्या घरच्यांना अधिकाधिक जाणून घेऊन त्यांच्याशी त्यांचं नातं अजून घट्ट व्हावं या हेतूने हा उपक्रम घेण्यात आला.

# क्षणचित्रे २०१९-२०




रक्तदान मोहिम



कोरोना स्वयंसेवक




गणेशोत्सव मुर्ती संकलन



प्लाझ्मा दान शिबीर




वर्धन कृती पुस्तिका उपक्रम




व्हॉलिबॉल स्पर्धा



ऑनलाईन रुग्णसहाय्यक वर्ग



व्यवसाय बचत गट



प्रशस्तीपत्रक वितरण - रुग्णसहाय्यक वर्ग



शिवण वर्ग




फिरती प्रयोगशाळा




फिरती प्रयोगशाळा




शिष्यवृत्ती वर्ग उद्घाटन



राळेगणसिद्धी ग्राम भेट



कारगिल विजय दिन- ले. ज. राजेंद्र निंभोरकर




समुपदेशन -संयम कार्यशाळा सहभाग



समुपदेशन - पालक कार्यशाळा



समुपदेशन - कळी उमलताना - प्रसंग नाट्य



उत्कर्षा अभ्यासिका काशेवाडी वस्ती



शैक्षणिक साहित्य वाटप



मकरसंक्रमण उत्सव



गोकुळाष्टमी



संभाजी उद्यान सहल



शाखा विभाग - ऑनलाईन पाककला स्पर्धा

❊ वस्तू संकलन : एका ठराविक अक्षरावरून सुरू होणाऱ्या वस्तूंचा संग्रह करणे असा हा उपक्रम. यात वर्धकांचे निरीक्षण आणि भाषिक कौशल्य वाढवणे हा उद्देश होता.

**❊ घरोघरी वर्धिनी स्पर्धा –**

शाखा विभागाने १ ते १० मे २०२० या कालावधीत शाखाश: स्पर्धांचे आयोजन केले. या दहा दिवसांत सर्व शाखांनी आपल्या शाखेत (मैदान, तासिका, कार्यक्रम, संपर्क यातील) कोणतेही किमान चार उपक्रम घ्यावेत असे सांगितले होते. या उपक्रमामध्ये शाखेतील सर्व वर्धक–वर्धिका, सर्व युवा आणि या सर्वांचे पालक या सर्वांना सहभागी करून या उपक्रमाचा आढावा खालील स्वरूपात सादर केला.

एकूण २ स्पर्धा : १) प्रभावी व्हिडिओ २) सर्वोत्तम ग्राफिक्स इमेज

स्पर्धा विजेते –

प्रथम क्रमांक – भगिनी निवेदिता शाखा

द्वितीय क्रमांक – स्वामी दयानंद सरस्वती शाखा

तृतीय क्रमांक (विभागून) – स्वामी सुबोधानंद शाखा व नरवीर तानाजी मालुसरे शाखा

उत्तेजनार्थ – समर्थ रामकृष्ण शाखा

**वर्धिनीच्या इतिहासातील पहिले ऑनलाईन शिबीर**

कोरोनामुळे या वर्षी उन्हाळी शिबीरे घेता आली नाही म्हणून बाल शाखेने ऑनलाईन शिबीर आयोजित करून शिबीर यशस्वी केले. यामुळे वर्धिनीचे सहवासातून शिक्षण आणि संस्काराचे काम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पाहिल्यांदाच राबविण्यात आले. या यशानंतर १५ ते ३१ मे या कालावधीत शाखाशः ऑनलाईन शिबिराचे आयोजन करण्यात आले. याचे संपूर्ण नियोजन शाखेने केले आणि व्यवस्था वाटप करून कामाची आखणी केली. या शिबिरांचे वेळापत्रक आणि पोस्टर सर्वत्र फिरू लागले. या शिबिरात पुण्यातून आणि पुण्या बाहेरून सुमारे १३०० ते १४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण १५ व्हॉटस्अ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून १५ शिबीर गट तयार केले गेले. प्रत्येक शिबिराचा प्रमुख, व्यवस्था प्रमुख हे त्या शाखेतील युवा होते. प्रत्येक शिबीराच्या वेळापत्रकानुसार गटांवर उपक्रम पाठविण्यात आले. प्रत्येक शिबिरात कथाकथन, प्रेरणासत्रे, मैदान, कृतीसत्रे आणि कार्यक्रम असे उपक्रम आयोजित केले गेले. शिबीर झाल्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली आणि शाखेजवळील विद्यार्थ्यांना शाखेबाबत आणखी माहिती देऊन त्यांचा स्वतंत्र गट तयार केला गेला आणि सध्या त्यांनादेखील नियमित शाखेतील उपक्रमांमध्ये सहभागी केले जाते.

टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, ओरिगामी म्हणजे कागदापासून वस्तू बनवणे, जादूचे खेळ, स्प्रे पेंटिंग, डाळींपासून चित्र तयार करणे, धान्यांपासून कलाकृती, फेस पेंटिंग, वेशभूषा स्पर्धा, परिसर स्वच्छता, पद्यसत्र, जादूचे प्रयोग, टॅटू व मेहंदी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, हॅंगिंग क्राफ्ट, थ्रेड पेंटिंग आदी उपक्रमांचा समावेश होता. शिवचरित्र, छ. संभाजी महाराज, माझे स्वप्न, माझी आई, पाककला, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, लघुपट दाखवणे, एरोबिक्स करून घेणे, डान्स करणे, अक्षरांची गंमतजंमत, निरीक्षण क्षमता वाढवण्यासाठी चित्र निरीक्षण, माझ्या कल्पनेतील स्मार्ट सिटी स्पर्धा, फॅमिली कट्टा या विषयांवर उपक्रम घेण्यात आले. या आपत्कालीन परिस्थितीमध्ये स्वतःचा जीव धोक्यात घालून आपल्यासाठी लढणारे पोलिस, डॉक्टर, सफाई कामगार, सरकारी कर्मचारी, शेतकरी अशा अनेक जणांना चित्राच्या रुपात मानवंदना अशा विविध विषयांवर

सध्याचा जन्म आपण अशा तऱ्हेनं जगला पाहिजे की त्यातून पुढच्या अधिक चांगल्या उन्नत अशा जन्माची वाट मोकळी व्हावी.

सादरीकरणाचे व्हिडिओ मुलांनी शिबीर गटावर पाठवले.
सर्व कृतिसत्रांमधून मुलांची कल्पकता आणि नाविन्य दिसून आले. शाखेतील युवकांनी 'स्व'-रूपवर्धिनी आणि शाखा याविषयीची माहिती पालकांना दिली. ऑनलाईन शिबिराच्या माध्यमातून मुलांना दैनंदिनीचे व व्यायामाचे महत्त्व सांगून त्यांनी नियमित व्यायाम करावा यासाठी आग्रह धरण्यात आला. ऑनलाईन शिबिरामध्ये मुलांसोबतच पालकांचा सहभागसुध्दा चांगला होता. हे चार दिवसांचे शिबीर पूर्ण झाले तरीही पालक आणि मुलांच्या आग्रहाखातर रोज विविध उपक्रम जसे कथा, पद्य, कला मुलांपर्यंत पोहोचवले जातात. यातूनच हे शिबिर यशस्वी झाल्याची पावती मिळते.

**विशेष अनुभव आणि प्रतिसाद –**

शिबिर संपर्कासाठी शाळासंपर्कसुद्धा झाला होता. शिबीर संपल्यानंतर रेणुका स्वरूप शाळेच्या शिक्षकांनी मुलींच्या आणि पालकांच्या प्रतिक्रिया कळवण्याकरिता फोन केला होता. त्यांच्या शाळेच्या गटावर आपल्या शिबिराबद्दल चर्चा झाली.
आपण हे शिबीर आयोजित करून आमच्या मुलांमध्ये असलेल्या कलागुणांना वाव दिलात व नवनवीन गोष्टी, खेळाचे प्रकार, व्यायाम याबाबत मार्गदर्शन केले, त्याबद्दल ताई दादांचे खूप खूप आभार. तसेच आपण समाजासाठी जे योगदान देत आहात ते अत्यंत पुरस्करणीय आहे.

– शेखर ना. पोटफोडे

'स्व'-रुपवर्धीनीच्या शिबिरात माझी मुलगी शांभवी सहभागी झाली होती. शिबिराचे स्वरूप व कार्यक्रम अतिशय छान होते. मी एक आई म्हणून तिला नोकरीमुळे वेळ देऊ शकत नव्हते परंतु लॉकडाऊनच्या काळात या शिबिरामुळे आम्ही मायलेकी फार जवळ आलो. रोजची योगासने, प्रार्थना, बोधकथा, चित्रकला, अभिनय या सर्वांना तिने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबीर ऑनलाईन असूनही सर्व दादा मुलांना प्रोत्साहन देत होते. तिचा आत्मविश्वास वाढताना पाहता आला याचा मला आनंद आहे. या शिबिरातून खऱ्या अर्थाने मुलांचे 'स्व'-रूपवर्धन झाले असे मला वाटते.

– प्रा. दीपाली जंगम

आपण नेहमी निवासी शिबीर घेतो. जेवढे कष्ट त्या शिबिरात लागतात तेवढेच याही शिबिरात घ्यावे लागले. सर्वात मोठं आव्हान होतं संपर्काचं. आम्ही ते पूर्ण करू शकलो याचा आनंद वाटला. सगळी सत्रे उत्तम रीतीने घेण्याचा आम्ही पूर्णतः प्रयत्न केला. ही सत्रे मुलांना आवडली. या शिबिरामुळे आम्ही पण तंत्रज्ञानाच्या नवीन गोष्टी शिकलो. वर्धिनीच्या इतिहासातील हे ऑनलाईन शिबीर अविस्मरणीय ठरले.

– सहभागी कार्यकर्ते

**१० वी पूर्वपीठिका ऑनलाईन शिबिर व ऑनलाईन तासिका**

लॉकडाऊनमुळे या वर्षी १० वी पूर्वपीठिका शिबिर ऑनलाईन घेण्यात आले. वर्धिनीतील आणि बाहेरील एकूण ९० विद्यार्थी शिबिरात सहभागी झाले. शनिवार, ६ जून आणि रविवार, ७ जून २०२० या दोन दिवसात हे शिबिर झाले. मनीषा पाठक आणि विजय पाटील यांनी समन्वयाची जबाबदारी घेतली. या शिबिरात लताताई, छाया पोळ, रोहिणीताई यांनी विज्ञान, मेघनाताईनी गणित, मेघा नगरे ताईनी समुपदेशन, उर्मिलाताई गुजर यांनी अभ्यासाचे नियोजन या विषयांची सत्रे घेतली.



**ईश्वरानं प्रदान केलेल्या सर्व शक्ती पणाला लावल्या पाहिजेत. कमीतकमी वेळेत जास्तीतजास्त कौशल्य दिसून आलं पाहिजे. वेळ आणि शक्ती याचा अपव्यय होता कामा नये.**

त्यानंतर वर्धिनीतील इ. १० च्या विद्यार्थ्यांसाठी 'तयारी १० वी ची' असा गट तयार करण्यात आला. शिक्षकांनी गणित, विज्ञान, इंग्रजी विषयांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक विषयातील महत्त्वाच्या संकल्पना आणि मुद्दे गटावर पाठविले गेले. सकाळी ९ च्या दरम्यान एका विषयावर आधारित माहिती पाठविली आणि सोबत गृहपाठ दिला गेला. विद्यार्थ्यांनी दिलेला गृहपाठ त्याच दिवशी चार वाजेपर्यंत पूर्ण करून तो गटात पाठविला. आलेल्या गृहपाठाची सातत्याने तपासणी करून त्यांना त्या संकल्पना आणखी विस्तृत समजावून सांगितल्या गेल्या. काही दिवसांनी अनेक पालक पुन्हा कामावर जाऊ लागल्याने विद्यार्थ्यांकडे फोन उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण झाल्या. तरीदेखील विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या वेळेत अभ्यास पूर्ण करून अनेक चर्चा, प्रश्नोत्तरात सहभाग घेतला.

**वर्धन कृती पुस्तिका उपक्रम**

शाखा विभागातर्फे वर्धक वर्धिका यांच्या सर्वांगीण विकासासाठी, अनौपचारिक शिक्षणासाठी निश्चित केलेल्या ८ विषयांचे प्रशिक्षण घेऊन अभ्यासक्रम निश्चिती करून शाखांवर याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या अनौपचारिक शिक्षणामध्ये जीवन कौशल्ये, शारीरिक विकास, स्व-अभ्यास कौशल्ये व तंत्रे, शालेय अभ्यास विषयांचे संकल्पनात्मक शिक्षण, भाषा विकास, भाषा समृद्धी, प्रज्ञा विकास, प्रेरणा जागरण, स्वयंप्रेरणा जागरण, मूल्यवर्धन, आधुनिक तंत्रज्ञान शिक्षण अशा अनेक विषयांचा समावेश होतो. वर्धिनीमध्ये नेहमीच विविध कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला जातो. या अनुषंगाने उपक्रमांच्या माध्यमातून विविध कौशल्ये नकळतपणे आत्मसात करण्याची संधी शिबिरे, सहली, व्याख्याने, मैदानावरील खेळ, परिपाठ यातून मिळत असते. लॉकडाऊन काळात 'विधायक बंदी' नावाने एक गट तयार केला. शाखेतील वर्धक-वर्धिका यांच्या अनौपचारिक शिक्षणासाठी या गटात अनेक चर्चा झाल्या व ते उपक्रम शाखेवर घेण्यात आले. या गटाने गेले ३ महिने अविरत काम केले. हे काम आता एका महत्त्वपूर्ण टप्प्यात आले आहे, तो टप्पा म्हणजे 'वर्धन कृतीपुस्तिका उपक्रम'. गेल्या काही महिन्यात असे जाणवले की बऱ्याच मुलांकडे फोनच्या माध्यमातून पोहोचणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांच्या हाती प्रत्यक्ष कृती पुस्तिका मिळाली तर याचा मुलांना फायदा होईल.
'मैत्री' या संकल्पनेवर आधारित कृती पुस्तिका योग्य ती खबरदारी घेऊन मुलांपर्यंत पोहोचविण्यात आली. जिथे सुखांची बेरीज होते, दुःख-संकटांची वजाबाकी होते अशा मैत्री या नात्याविषयी व्यक्त होण्याची संधी वर्धकांना उपलब्ध करून दिली. मैत्री समवयस्कांशी, आपल्या वयापेक्षा लहान-मोठ्या आणि दिव्यांग व्यक्तींशी, आपल्या सभोवतालच्या समाजाशी, निसर्गाशी आणि आपल्या शरीराशी अशा अनेक पैलूंनी विद्यार्थ्यांचा वरील आयामांनुसार सर्वांगीण विकास घडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांचे गट (३ री ते ५ वी, ६ वी ते ८ वी, ९ वी ते बारावी) केले गेले. या गटांच्या गरजा आणि आवश्यकतेनुसार पुस्तिकेचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला. सदर पुस्तिका तयार करण्यामध्ये वर्धिनीतील वरिष्ठ शिक्षक, शिक्षण विषयातील अभ्यासू कार्यकर्ते, शाखेवरील युवा गट आणि विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. सध्या या पुस्तिकेच्या ३ आवृत्ती तयार झाल्या आहेत. विशेष म्हणजे या उपक्रमाची आवश्यकता आणि गुणवत्ता पाहून वर्धिनीतील अनेक युवांनी आर्थिक योगदान दिले आहे. तसेच प्रगतीपालक यांचा पाठपुरावा घेण्यासाठी देखील मदत करत आहेत.

**वर्धापन दिन**

प्रयत्न करा, आपल्या भविष्याला आकार द्या आणि ध्येय प्राप्त करा.
त्यासाठी लागणाऱ्या सर्व क्षमता आपल्यात आहेतच.

● समर्थ रामकृष्ण शाखा –

१३ मे २०२० रोजी शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त फेसबुक लाइव्ह माध्यमातून व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सौरभ वाठारे दादांचा 'इंजिनियर ते कंपनी CEO पर्यंतचा प्रवास' सर्वांनी अनुभवला. आपल्या सर्वांचे लाडके श्री. ज्ञानेश पुरंदरे (ज्ञापू) यांच्या विशेष प्रेरणा सत्राचे आयोजन करण्यात आले. ६ ते १३ मे या काळात वर्धापन दिन सप्ताह साजरा करण्यात आला. यामध्ये शाखा प्रमुख म्हणून यापूर्वी ज्यांनी उत्तम काम उभे केले अशा काही निवडक शाखा प्रमुखांचे अनुभव व्हिडिओच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचवले. डॉ. संजय तांबट, श्री. पराग लकडे, श्री. प्रशांत वेदपाठक, श्री. रवी चव्हाण, श्री. मंदार पोफळे, कु. राधेशाम महाडिक

● भगिनी निवेदिता शाखा –

१ जून २०२० हा निवेदिता शाखेचा ३२ वा वर्धापन दिन ऑनलाईन साजरा झाला. वर्धिकांसाठी विशेष निबंध स्पर्धा आयोजित केली होती, 'भगिनी निवेदितांचे चरित्र मांडणी' या स्पर्धेला वर्धिकांचा खूप छान प्रतिसाद मिळाला. श्री ज्ञानेश पुरंदरे यांच्या प्रेरणादायी व्याख्यानातून मुलींच्या शाखेची गरज युवतींच्या लक्षात आली. पालकांसाठी श्रीमती बागेश्री पोंक्षे यांच्या अनुभव कथनाचे आयोजन करण्यात आले.

● स्वामी विवेकानंद शाखा –

शाखेचा ४ जुलै हा वर्धापन दिन. सध्याच्या परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून साजरा झाला. मोठ्या गटातील वर्धकांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रेरणादायी गोष्टी फेसबुक माध्यमातून सांगितल्या. यात १५ वर्धक सहभागी झाले होते.

● स्वामी अखंडानंद शाखा –

कोरोना पार्श्वभूमीवर शाखेने वर्धापनदिन प्रत्यक्ष एकत्र न येता फोनच्या माध्यमातून ऑनलाईन साजरा करण्याचे ठरवले. शाखेतील प्रत्येक वर्धक, युवक, पालक आणि शिक्षकांच्या आयुष्यात शाखेचे एक वेगळे आणि महत्त्वाचे स्थान आहे. त्या सर्वांच्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देण्यासाठी वर्धापन दिनानिमित्त शाखेच्या प्रतिनिधींचे मनोगत, अनुभव कथन आणि आठवणी संकलित करून त्याचा एक सुंदर कार्यक्रम झाला. शाखेचे पहिले शाखा प्रमुख श्री. संजय तांबट सर यांनी शाखेच्या आठवणींना उजाळा देत पूर्वीचा काळ, सध्याचा काळ, बदलत्या काळानुसार शाखेचा होत गेलेला विस्तार, वर्धिनीच्या एकूणच विस्तारामध्ये अखंडानंद शाखेचा असलेला सिंहाचा वाटा त्याबद्दल महत्त्वपूर्ण आठवणी सांगितल्या.

● स्वामी श्रद्धानंद शाखा –

शाखेचा वर्धापन दिन मुख्य कार्यक्रम शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२० रोजी संपन्न झाला. मा. श्री. शिरीष पटवर्धन हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा. श्री. मकरंद ढवळे (रा. स्व. संघ समरसता गतिविधी संयोजक) यांनी 'स्वयंपूर्ण आणि परोपकारी पिढी तयार करण्याचे काम 'स्व'–रूपवर्धिनी करत आहे' अशा शब्दात संस्थेचा गौरव केला. तसेच मुलांसाठी 'मस्ती की पाठशाला' या कार्यशाळेमध्ये सिद्धेश बलवार दादाने घरात उपलब्ध साहित्यापासून मास्क बनविण्याचे प्रशिक्षण, प्रफुल्ल कांबळे दादाने योगसनांची प्रात्यक्षिके आणि त्यांचे महत्त्व आणि उज्ज्वल वाघुले दादाने वैज्ञानिक प्रयोग असे उपक्रम घेतले. याच कार्यक्रमात 'Work Book' या तासिका विभागाच्या उपक्रमाचे उद्‌घाटन झाले.



**जगाच्या विकासाला आपला हातभार कसा लागू शकेल याचा विचार आपण सदोदित केला पाहिजे.**

## विशेष कार्यक्रम

**राजर्षी शाहू शाखा –**

जानेवारी महिन्यात गटशः ‘शाहू करंडक’ या स्पर्धेला सुरुवात झाली. गट नामकरण, वस्तू संचयन, आदर्श गाव मॉडेल, जाहिरात स्पर्धा, मैदानी खेळ अशा स्पर्धा झाल्या. यात ‘ध्यास’ गटाने विशेष कौशल्य दाखवले. त्यामुळे सिंहगड रोडवर भरलेल्या शस्त्रास्त्र प्रदर्शनाला भेटीचे नियोजनाची जबाबदारी त्यांना दिली व त्यांनी ती उत्तमरीतीने पार पाडली. या प्रदर्शनातून जुन्या शस्त्रांची ओळख मुलांना झाली. ‘ध्यास’ गटाने शाखेत आनंद मेळा आयोजित केला. सर्व खेळांतून मुलांची कल्पकता दिसून आली. दि. २५ जानेवारीला ‘शिवरायांचा अपरिचित इतिहास आणि युद्ध कौशल्य’ या विषयावर शिवशाहीर श्रीकांत शिर्के यांचे व्याख्यान झाले. पाठ्यपुस्तकाबाहेरील काही मोहिमांची माहिती यातून मिळाली.

त्यातील विशेष उपक्रम –

✻ एक किस्सा असाही – या उपक्रमात मुलांनी शाखेत, शिबिरात, सहलीत अनुभवलेला किस्सा जो त्यांच्यासाठी अविस्मणीय आहे त्याचे अनुभव कथन केले.

✻ माझा शाखेचा पहिला दिवस – यामध्ये मुलांनी आपण पहिल्यांदा शाखेत आल्यावर काय काय घडलं होतं, पहिला दिवस कसा होता याविषयी लेखन केले.

**क्रांतीज्योती सावित्री शाखा –**

दि. ३ जानेवारीला सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने शाखेची महात्मा फुले वाड्यात स्थळ भेट झाली.

दि. २३ जानेवारीला बालगंधर्व रंगमंदिरात भरलेल्या कापडी बाहुल्यांच्या प्रदर्शनास शाखेने भेट दिली. जुन्या पिढीच्या आठवणींना उजाळा देणारे व नव्या पिढीला महाराष्ट्राची ग्रामीण व शहरी जीवनशैली, लोककला, सण, वेशभूषा दर्शवणारे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील काही प्रसंग व हलते देखावे मुलींना बघायला मिळाले. प्रदर्शनाच्या आयोजक श्रीमती सविताताईंशी सर्वांनी संवाद साधला.

दि. २५ जाने.ला श्रीमती रमाबाई रानडे यांच्या १५८ व्या जयंतीनिमित्ताने शाखेच्या कार्यकर्त्या मनिषाताई पाठक यांनी त्यांचे जीवनचरित्र मुलींना सांगितले. सावित्रीबाईंप्रमाणेच मुलींच्या शिक्षणासाठी तळमळीने काम करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची ओळख मुलींना झाली.

दि. २३ फेब्रुवारीला संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त शाखेत तसेच शाखेच्या जवळील घोरपडे उद्यानात स्वच्छता अभियान झाले. रविवारी उद्यानातील सफाई कामगारांना सुट्टी असते. त्यामुळे हे अभियान परिणामकारक झाले. बागेतील सुरक्षारक्षकांच्या परवानगीने तेथील स्वच्छता साहित्य वापरून सर्व वर्धिकांनी बागेची स्वच्छता केली. काही साहित्य प्रथमच वापरत होतो. त्याचीही माहिती काकांनी दिली. त्यामुळे काम खूपच सोपे आणि नियोजित वेळेत झाले. या श्रमदानाने सगळ्यांना सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व समजले. या उपक्रमानंतर शाखेतल्या ताईने संत गाडगेबाबांची माहिती सांगितली.

१६ ऑगस्ट – ऑनलाईन शाखेत स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने सौ. छाया ताई सकटे ह्यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची गोष्ट सांगितली.

आजकालच्या काळात सोशल मीडियामुळे व मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे आपण काही जुन्या गोष्टी विसरत चाललो आहोत. त्यातलाच एक प्रकार म्हणजे ‘पत्रलेखन’. याला उजाळा मिळावा या हेतूने वर्धिकांसाठी पत्रलेखन उपक्रम घेण्यात आला.

मासिक वर्धन पुस्तिकेतील एक उपक्रम म्हणजे प्रज्ञा विकास. एखाद्या गोष्टीबाबत विचार, चिंतन करण्याची सवय लागावी म्हणून आपण मुलांना एखादी घटना देऊन त्यावर विविध प्रकारे विचार करण्यास प्रवृत्त करतो. याच पद्धतीने शाखेने एक उपक्रम घेतला. हल्ली वाढदिवस म्हटलं की काही चित्रं डोळ्यासमोर उभी राहतात. केक, मेणबत्त्या, मेजवानी, आणि बरंच काही. पण शाखेतील वर्धिका या नात्याने आपण आपला वाढदिवस इतरांपेक्षा कसा वेगळा साजरा करू शकतो. याबाबत मुलींना कल्पना मांडण्यास सांगितले. अनाथाश्रमात, वृद्धाश्रमात जाऊन सेवा करणे, रक्तदान करणे, संकल्प करणे, उत्तम वाचन करणे इ. कल्पना त्यांनी मांडल्या.

**भगिनी निवेदिता शाखा –**

इ. ८ वी व ६ वीच्या वर्धिकांच्या प्रयोगाची विज्ञान दिनासाठी निवड झाली. इ. ६ वीच्या गटाने ''नैसर्गिक रंगद्रव्य'' व ''पर्यावरणपूरक शीतपेटी'' हे दोन प्रयोग मांडले.

२५ जानेवारी – शाखा कामाचे अनुभव – बागेश्री पोंक्षे यांचे व्याख्यान झाले.

१० मे : मातृदिवस – वर्धिनी म्हणजे एक कुटुंब आणि म्हणूनच मातृदिनानिमित्त महिला पालकांशी खास संवादाचे आयोजन करण्यात आले. प्रथम सर्व युवतींनी पालकांना मातृदिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्याशी कोरोनाच्या काळात वर्धिनी करत असणाऱ्या धान्यवाटप मोहिम, आरोग्य तपासणी, रक्तदान तसेच शाखा उपक्रम, अनेक विभागात वर्धिनीच्या मुशीतून तयार झालेल्या कार्यकर्त्यांचे कार्य अशा अनेक विषयांवर गप्पा झाल्या.

दि. २ ऑगस्ट : कथाकथन – जयश्रीताई येमूल

दि.९ ऑगस्ट : अनुभव कथन – प्रियंकाताई घारे : मेळघाट (मैत्री संस्था)

दिव्याताई घारे : मध्यप्रदेश (नर्मदालय) समृद्धीताई यादव : केरळ (पूरग्रस्त मदत कार्य)

दि. १६ ऑगस्ट : कल्पनेतून गोष्टनिर्मिती – कोमल धायरकर

दि. ३० ऑगस्ट : वर्धिनीची शाखा आणि आपण – श्री. मंदार पोफळे

दि. ५ सप्टेंबर – शिक्षक दिन मुलाखत – लताताई पुरंदरे

दि. २० सप्टेंबर – कृतीसत्र – सायली गुरव

दि. २७ सप्टेंबर – नियोजनाचे महत्त्व – श्री. अरविंद केळकर

दि. १७ ऑक्टोबर – स्त्री–पुरुष समानता – श्री. संदीप मोरे.

दि. २० ऑक्टोबर – पालक कट्टा – सौ. शुभांगीताई तांबट व श्रीमंती आणि समृद्धी – श्री. आकाश चौकसे

आठवणी ज्ञापूंच्या – डॉ. संजय तांबट यांनी ज्ञानेश पुरंदरे सरांबद्दल लिहिलेला लेख मुलींना वाचून दाखवला. यातून श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांची कामाबद्दलची तळमळ, त्यांचे वर्धिनीबद्दलचे प्रेम, ज्ञापुंचे लहानपण, मुलींच्या लक्षात आले.

उत्सव नवरात्रीचा–जागर स्त्रीशक्तीचा –

कर्तृत्व, धैर्य, आत्मविश्वास, संवेदनशीलता, सहनशीलता, ममत्व, धाडस, उत्साह, नावीन्य, कणखरता, जिद्द अशा अनेक गुणांचे एकत्रित दर्शन म्हणजे स्त्रीशक्ती. आज असे एकही क्षेत्र नाही की जिथे स्त्रियांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली नाही. अशा विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा परिचय मुलींना व्हावा या उद्देशाने 'उत्सव नवरात्रीचा–जागर स्त्रीशक्तीचा' असा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये मोठ्या गटातील मुलींनी रोज एका कर्तृत्ववान महिलेची ओळख करून दिली.



**आपण आपलं ध्येय डोळ्यासमोर ठेवून आपल्या शक्तीचा, सामर्थ्याचा अंदाज घ्या म्हणजे आपलं जीवीतकार्य आपल्याला बरोबर सापडेल.**

**स्वामी विवेकानंद शाखा –**

शाखेत वर्षभर झालेली व्याख्याने –

| वक्ते | विषय |
|---|---|
| १) सुरेश पवार | नेतृत्व |
| २) अक्षय कदम | तर्कशुद्ध चिंतन (लॉजिकल थिंकिंग) |
| ३) मंदार पोफळे | कामातील संघभावना (टीम वर्क) |
| ४) सचिन सनगरे | माझी वर्धिनी |
| ५) सुरेश पवार | कला म्हणजे काय ? |
| ६) चेतन कुसाळकर | गुरुपौर्णिमा |
| ७) अभिजीत दोडके | मी आणि माझा ऑनलाईन अभ्यास |
| ८) हर्षल सोनार | पर्यावरण आणि त्याचे महत्त्व |
| ९) सुरेश पवार | अंदाज बांधणी व अक्षर गंमत |

दि. १४ फेबुवारीला शाखेत मातृ–पितृ पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. पालकांचा उत्तम प्रतिसाद होता. काही पालकांनी मुलांसाठी शाखा का महत्त्वाची हे आपल्या मनोगतातून मांडले. प्रश्नमंजुषेच्या आधारे मुलांना आपल्या पालकांबद्दलची किती माहिती आहे हे जाणून घेतले. युवकांनी व मुलांनी या दिनासाठी स्वतः रचलेल्या कविता सादर केल्या.

आपके जमाने में – आजच्या काळात आपल्या घरातील संवाद हरवत चालला आहे. कोरोना बंदीच्या काळात आपल्या घरातील ज्येष्ठ व्यक्तींशी किंवा आपल्या आई–वडिलांशी मनसोक्त गप्पा व्हाव्यात, त्यांचे अनुभव मुलांना समजावेत आणि या गप्पांमधून ही नाती अजून घट्ट व्हावीत यासाठी सदर उपक्रमाचे आयोजन केले होते. यात शाखेतील पालक आणि वर्धकांनी उत्तम सहभाग नोंदवला. वरिष्ठांशी बोलताना लहान असताना त्यांनी केलेल्या गमती जमती, चुका, शाळा–कॉलेजचे अनुभव, मित्र परिवार, त्यांच्या काळातील नाणी, व्यवहार, त्यावेळची गावं, वस्ती, दिव्याखालच्या गोष्टी, आयुष्यातील चढ–उतार अशा अनेक विषयांतील गप्पा आणि आठवणीत मंडळी रमून गेली.

वर्धकांसाठी विशेष 'ज्ञानांकुर', रक्षाबंधन विशेष, दैनंदिन प्रश्नमंजुषा, चला बोधकथा सांगूया, पेपर आर्ट, गोकुळाष्टमी विशेष, माझे छंद, गणेशोत्सव विशेष असे उपक्रम घेण्यात आले.

कुतूहल जागवू या – भारत देश, भारतीय नद्या, भारताचा स्वातंत्र्यलढा, विज्ञान आणि तंत्रज्ञान यावर आधारित सामान्यज्ञानाचे प्रश्न गटावर पाठवले. दर शुक्रवारी भारताचा नकाशा काढणे, रोमन अंकांच्या साहाय्याने घड्याळाची प्रतिकृती काढणे, चवी ओळखणे असे विविध उपक्रम घेण्यात आले.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा –**

जालियानवाला बाग हत्याकांडाला जानेवारी २०२० मध्ये १०० वर्षेपूर्ण झाली. त्या विषयावर शाखेचे युवा कार्यकर्ते श्री. मयुर शेडगे यांचे व्याख्यान झाले.

दि. २७ फेब्रुवारीला शाखेमध्ये 'शोध कल्पनांचा' या विषयावर वर्धकांचे चर्चासत्र झाले. 'वडील रात्री उशीरापर्यंत घरी आले नाहीत तर, आजूबाजूची मुले व्यसनाधीन झाली तर, १० दिवसांपासून परिसरात पाणीपुरवठा नीट झाला नाही तर, शाखेला शाळेने परवानगी नाकारली तर' अशा काही समस्यांवर चर्चासत्रे घेण्यात आली.

याशिवाय ५ जुलै रोजी लेखन कौशल्य – ओम इजंतकर, १२ जुलै रोजी कृतीसत्र – निखिल साबळे, ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिनाचे महत्त्व – कु. वैभव ही विशेष व्याख्याने झाली.

२३ ऑगस्ट गणेशोत्सव विशेष : नेहमीप्रमाणे शाखा मैदानाने सुरु झाली. यामध्ये नववीतील वेदांत मंचेकर याने सूर्यनमस्कार, जोर, बैठका असे व्यायाम घेतले. गणेशोत्सव असल्याने प्रत्येकाने फोनच्या माध्यमातून घरातील बाप्पाची आरास सगळ्यांना दाखवली. प्रत्यक्ष भेट होत नसली तरी घरातल्या बाप्पाचे दर्शन घेता आले. संपूर्ण महिनाभर रोज दिनविशेष स्वरुपात व्यक्तीची, प्रसंगाची किंवा घटनेची माहिती पालक गटात पाठवण्यात आली.

असे आमचे वंशज – या उपक्रमात घरच्यांची मदत घेऊन जास्तीत जास्त पिढ्यांची माहिती एकत्र करण्यास सांगितली होती. त्यातून आपल्या कुटुंबाचा एक Tree diagram तयार करण्यास सांगितले. एक आठवण म्हणून हा उपक्रम सर्वांच्या नक्कीच लक्षात राहील.

**समर्थ रामकृष्ण शाखा –**

शाखेत झालेले विशेष उपक्रम –

बोधकथा लेखन – मुलांनी नवीन बोधकथा तात्पर्यासहित लिहिल्या. काही पालकांनी पण यात भाग घेतला आणि नवीन बोधकथांचे संकलन झाले.

जागतिक मल्लखांब दिन – या निमित्त मल्लखांब या खेळाची माहिती व वैशिष्ट्ये शाखेच्या आधी झालेल्या सादरीकरणाच्या फोटोतून सांगितली.

कथाकथन – श्री दिगपाल लांजेकर यांच्या अनुभव कथनाचा व्हिडिओ मुलांनी ऐकला.

ऑस्कर पुरस्कार – आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑस्कर या पुरस्काराची ऑस्कर म्हणजे काय, तो कशासाठी दिला जातो, आत्तापर्यंत कोणाला हा पुरस्कार मिळाला आहे, या संदर्भाने माहिती दिली.

दर महिन्याच्या सोमवारी गुगल फॉर्मच्या स्वरूपात इतिहास, भूगोल, सामान्यज्ञान, खेळ या विषयावर प्रश्नोत्तरे घेण्यात आली. पुण्यातील ऐतिहासिक स्थळे, बोधकथा, दिनविशेष इत्यादी गोष्टींची माहिती पालक गटावर पाठवण्यात आली.

२७ सप्टेंबर 'जागतिक पर्यटन दिना'च्या निमित्ताने या आठवड्यात मुलांना पुण्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळाविषयी माहिती देण्यात आली. (शनिवारवाडा, लाल महाल, पर्वती, लोणावळा–खंडाळा, सिंहगड, शिवनेरी किल्ला).

१३ सप्टेंबर रोजी या वर्षातील पहिलीच ऑनलाईन पालकसभा घेण्यात आली. ऑनलाईन शाखा, ऑनलाईन तास, त्यामधील उपस्थिती, इतर स्पर्धा आणि उपक्रम याविषयी माहिती देण्यात आली.

सप्टेंबर महिन्यात शाखेने 'रामकृष्ण केबल नेटवर्क चॅनेल' या नवीन उपक्रमाची सुरुवात केली. यामध्ये वेगवेगळे विषय व्याख्याने, मुलाखती, चर्चासत्रे अशा विविध माध्यमातून वर्धकांपुढे मांडण्यात आले. रामकृष्ण केबल नेटवर्कचे ५ भाग प्रदर्शित करण्यात आले. यामध्ये लोकशाहीर आण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त श्री. तुषार नांगुर्डे यांनी चरित्र मांडणी केली. क्रांतीदिनानिमित्त रोहित धायरकर दादाने जगात झालेल्या अनेक क्रांतींची माहिती मुलांना सांगितली. तसेच १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त सचिन सनगरे यांचे व्याख्यान झाले.

**स्वामी अभेदानंद शाखा –**

वर्तमानपत्र तयार करणे :– या सत्रामध्ये मुलांनी स्वतःचे वृत्तपत्र तयार केले.

कौटुंबिक समन्वय :– या सत्रामध्ये कुटुंबातील सदस्यांना एका मागे एक उभे राहून समोरच्याच्या पाठीवर कागद ठेवून चित्र काढण्यास सांगितले होते. पहिल्या सदस्यापासून शेवटच्या सदस्यापर्यंत काढलेल्या चित्रात किती

समानता दिसते यावर विजेत्यांची घोषणा झाली.

2D to 3D :- या कृतीसत्रामध्ये मुलांनी एखादे चित्र काढून त्याचीच प्रतिकृती बनवायची होती.

टाकाऊ पासून टिकाऊ, मुखवटा तयार करणे, मुकुट बनवणे, रुमालाला बटण लावणे अशा उपक्रमांच्या माध्यमातून मुलांना विविध कौशल्य शिकवण्याचा प्रयत्न केला.

**स्वामी दयानंद सरस्वती शाखा –**

दि. ७ फेब्रुवारीला शाखेत 'तयारी शिकण्याची' या विषयावर युवक कार्यकर्ते श्री. शुभम जगताप सरांनी सत्र घेतले. शिक्षण कोणासाठी, कशासाठी, कुठपर्यंत, केव्हा, कसे आणि काय शिकायचे असे अनेक मुद्दे दृकश्राव्य (PPT) माध्यमातून वर्धकांसमोर मांडण्यात आले. यामुळे शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षण क्षेत्रातील विविध शाखा, सुविधा यांची माहिती मिळाली.

महाराष्ट्र दिनानिमित्त वर्धकांनी आपल्या कल्पनेतील smart city model बनवले.

छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त गुरुवार, दिनांक १४ मे २०२० रोजी शाखेने श्री. निलेश रमेश भिसे (हिंदू जागरण मंच, पुणे महानगर प्रमुख आणि शिव शंभू इतिहास अभ्यासक) यांचे छत्रपती संभाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू या विषयावर फेसबुक लाईव्ह व्याख्यान आयोजित केले.

शंभूराजे स्वराज्याचे उत्तराधिकारी व्हावेत यासाठी त्यांना लहानपणापासूनच शिवरायांनी दिलेले विशेष प्रशिक्षण, शंभूराजे ८ वर्षांचे असताना मिर्झाराजांसोबत झालेला तह, आग्र्याहून सुटका, वयाच्या १७ व्या वर्षी स्वराज्याचे युवराजपद, छत्रपतींच्या निधनानंतर शंभूराजांचे मंचकारोहण अशा अनेक मुद्यांवर व्याख्यानात मार्गदर्शन झाले.

शाखेत जून महिन्यात विविध स्पर्धा घेण्यात आल्या –

१. दयानंद उत्तम वक्ता, २. Shadow Act स्पर्धा, ३. दोरीच्या उड्या मारणे, ४. टॅटू काढणे, ५. ऑनलाईन सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा, ६. योगासन स्पर्धा, ७. शोधा अर्थ आपल्या नावाचा, ८. लोगो बनवणे, ९. पाककला, १०. क्रीडा प्रकल्प स्पर्धा ११. वेशभूषा स्पर्धा १२. गणेशोत्सवानिमित्त विशेष सजावट व छायाचित्र स्पर्धा.

कंपनी इन्फो स्पर्धा – या स्पर्धेत स्पर्धकांना १० कंपन्यांची नावे देऊन त्यांच्या CEO ची नावे शोधण्यास सांगितली. यातून मुलांना कंपनी व CEO दोघांची माहिती मिळाली.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त श्री. सौरभ महेश करडे यांचे फेसबुक लाईव्ह व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी शिवरायांच्या पराक्रमाचा इतिहास आणि प्रत्येक लढाईची दूरदृष्टीने केलेली आखणी याची माहिती सांगितली. तसेच जमीन मोजायची जुनी बिगा पद्धत, कर्जाची जिन्नस पद्धत समजावून सांगितली. बत्तीस मण सुवर्ण सिंहासन व राज्याभिषेक दिन याचे महत्त्व सांगितले. त्यांनी व्याख्यानाची सांगता 'रणफंदीची जात आमची' या शौर्यगीताने केली.

शाखेतील इ. १० वीच्या वर्धकांची बैठक घेऊन त्यांचा सध्याचा दिनक्रम, दैनंदिन नियोजन येणाऱ्या अडचणी, फोनचा वापर या गोष्टींबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर ८ वी, ९ वी, १० वीच्या वर्धकांचे गुगल फॉर्मद्वारे पेपर घेण्यात आले.

**स्वामी सुबोधानंद शाखा –**

फेस पेंटिंग स्पर्धेमध्ये मुलांनी आपले चेहरे वेगवेगळ्या पद्धतीने रंगवून आपली कला सादर केली. याशिवाय बोधचिन्ह स्पर्धा घेण्यात आली. यात घरातल्या वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करून मुलांनी ताट, वाटी, कडधान्य, काठी, कपडे याचा वापर करून बोधचिन्ह तयार केले.

शाखेचे पालक ही आपली ताकद आहे. या काळात आपल्या पालकांच्या संपर्कात राहण्यासाठी दर रविवारी खास पालकांसाठी काही उपक्रम घेण्यात येतात. उदा. – महिला पालकांनी उखाणे म्हटले व ते मुद्रित करून गटावर पाठवले.

**स्वामी योगानंद शाखा –**

‘एक बंगला बने न्यारा’ या स्पर्धेत पत्ते, प्लास्टिक ग्लास, कागद आणि तत्सम वस्तूंपासून वर्धकांनी बंगला बनवला. त्या बंगल्याचा फोटो आपल्या कुटुंबियांसोबत आपल्या ग्रुपवर पाठवला. उत्कृष्ट कलाकृतीस बक्षीस दिले गेले.

**नरवीर तानाजी मालुसरे शाखा –**

वृक्षारोपण – सध्याच्या काळात आपल्या सर्वाना जो निवांत वेळ मिळत आहे त्याचा सदुपयोग करून घेण्याच्या दृष्टीने शाखेने एक उपक्रम घेतला. प्रत्येक वर्धकाला घरासमोर, सोसायटीमध्ये किंवा जिथे शक्य आहे तिथे एक झाड लावून महिनाभर त्याची काळजी घेऊन ते रोप वाढवण्याचे आवाहन करण्यात आले. एकदा पावसाळा सुरु झाला की हे झाड छान तग धरेल आणि एक आठवण नेहमी सोबत राहील.

सन्मान माझ्या आईचा – आपण प्रत्येक वेळी आपल्या नावाबरोबर वडिलांचे नाव लावतो. आपण आपले नाव आपल्या आईच्या नावासहीत पाठवण्यास सांगितले. वडिलांच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करणाऱ्या, जबाबदारी घेणाऱ्या आईचा सन्मान करण्याचा हा छोटासा प्रयत्न.

‘आठवण आपल्या पूर्वजांची’ – आंतरराष्ट्रीय कुटुंबदिनानिमित्त हा उपक्रम घेतला. बहुतेकदा आपल्याला फक्त वडिलांचे आणि आजोबांचे नाव आणि आठवणी लक्षात असतात. या उपक्रमातून आपल्या जुन्या आप्तेष्टांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला. याशिवाय वर्धिनी म्हणजे आपले एक कुटुंबच. या परिवाराच्या जुन्या आठवणी फोटोच्या माध्यमातून ताज्या केल्या. नरवीर शाखेच्या प्रवासातील अनेक उत्तम फोटोंचा संग्रह या निमित्ताने झाला.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –**

कौशल्य विषयक व्याख्याने –

| | |
|---|---|
| विषय : वक्तृत्व कौशल्य | मार्गदर्शक : मा. सृष्टी कार्ला (दिल्ली) |
| आर्थिक साक्षरता | श्री. मंदार पोफळे (पुणे) |
| सादरीकरण कौशल्याचे महत्व आणि गरज. | श्री. संतोष परंडवाल (मुंबई) |

शाखेत वर्धकांना वेगवेगळ्या पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू असतो. ‘आजचे विज्ञान हे उद्याचे भविष्य आहे’ – 'Todays Science is future of tomorrow' म्हणून दर गुरुवारी व शुक्रवारी अत्याधुनिक तंत्रज्ञानांची (Advanced Technology) व रोबोटिक्स या विषयांवर माहिती देऊन कृतीसत्रेही घेण्यात आली. यातून शास्त्र विषयाचा अभ्यासही खूप महत्त्वाचा आहे हे सगळ्यांच्या लक्षात आले.

**स्वामी शिवानंद शाखा –**

दि. ७ मार्चला शाखेत ‘परीक्षेची पूर्वतयारी’ व पालकांची भूमिका’ या विषयावर सौ. मेघा ताईंनी पालकांशी संवाद साधला. अभ्यासाचे नियोजन, घरातील मुलांशी संवाद इ. विषयांवर मुक्तपणे चर्चा झाली. पालकांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना शाखेत घेता येतील अशा नवीन कल्पना सुचवल्या.

**धर्मवीर शंभूराजे शाखा –**

शाखेत झालेली व्याख्याने

| वक्ते | विषय |
|---|---|
| १) अजय रायकर | लघुपट (शेतकरी) |
| २) अजय रायकर, अभय पोते | युवकांचे अनुभव |
| ३) सुरेश पवार, अजय रायकर | दैनंदिन नियोजन |
| ४) कोमल कुलकर्णी | लॉकडाऊनमध्ये घरचे वातावरण आनंदी कसे ठेवावे ? |
| ५) नकुल पोळेकर सर | वेळेचे महत्त्व व नियोजन |

* * *

**तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला**

रात्री ११.३० वाजता पूजा ताईला फोन येतो. 'ताई मी शाखेतली करिष्मा थापा बोलतेय, आत्ता माझ्या घरी अडचण झाली आहे. मला मदत करता का ?' 'बाळा काय झाले ? मी काय करू शकते सांग.' पूजा ताईचा आश्वासक आवाज येतो. 'ताई आज रात्री १२ ला लॉकडाऊन होणार आहे, आणि घरमालक आत्ता ११.३० वाजता आम्हाला घराबाहेर काढत आहे. आम्ही काय करू ताई ? आमच्याकडे पैसे नाहीत, गाडी नाही, घरात आम्ही बहिणी आणि आई एवढेच आहोत.' यानंतर पूजा ताईने पुढच्या एक तासात वर्धिनीच्या व वस्तीमधील कार्यकर्त्यांच्या मदतीने करिष्माच्या घरची समस्या सोडवली.

शाखाप्रमुख प्राजक्ता कांबळे व भागप्रमुख कोमल कुलकर्णी यांनी घरमालकाला समजावले आणि त्यांची त्याच घरात राहण्याची सोय लावली. दुसऱ्या दिवशी लॉकडाऊन असताना गाडी व पोलिसांची सोय केली व त्यांना दुसऱ्या घरी सुखरूप पोहोचवले. अशी क्रांतिज्योती सावित्री शाखेची दमदार कार्यकर्ती पूजाताई बत्तीन, युवती विभाग प्रमुख असून आत्ता कोरोनाच्या संकटात धान्य वाटप मोहिमेचे देखील नेतृत्व करत होती.

* * *

**चरैवेति चरैवेति यही तो मंत्र ही अपना !**

संघटनेत असे काही हाडाचे कार्यकर्ते असतात ज्यांना आपण एक फोन करावा, काही काम सांगावे आणि त्याने लगेच हो म्हणावे. यापैकीच एक अशोक इंगवले. ब्रह्मानंद शाखेतली ही जबाबदारी घेणार का ? नवीन शाखा सुरू करतोय शाखाप्रमुख होणार का ? भागप्रमुख पदावर संघटनेचे काम करणार का ? या सगळ्यांना हो असे उत्तर देणे आणि कार्यास तत्पर राहणे हे अशोकचे वैशिष्ट्य. केंद्रीय संक्रांत उत्सव प्रमुख असताना अशोकची आई रुग्णालयात उपचारासाठी दाखल होती. परंतु ही गोष्ट कोणालाही कळू न देता अशोकने संपूर्ण उत्सव व्यवस्थित पार पडला. यंदा देखील गणेशोत्सवाचा उत्सव प्रमुख म्हणून जबाबदारी घेताना कोणतेही आढेवेढे न घेता, अतिशय आनंदाने त्याने ही जबाबदारी स्वीकारली. यंदाचा उत्सव साजरा करताना आपल्यावर कोरोनाचे सावट होते आणि प्रत्यक्ष भेटी आणि बैठका घेणे शक्य नव्हते. पण तरीही व्याख्यानमाला, सांस्कृतिक स्पर्धा, रक्तदान शिबिरे आणि गणेशमूर्ती संकलन अभियान असे अनेक उपक्रम अशोकने लीलया पेलले. स्वतःचा व्यवसाय आणि कुटुंब सांभाळत रोजचे दोन-तीन तास उत्सवाच्या कामासाठी देताना अशोकने कधी तक्रार केली नाही. प्रत्येक कामासाठी व्यक्ती प्रत्येक व्यक्तीसाठी काम हे सूत्र डोक्यात ठेवत अशोकने उत्सव यशस्वी केला. कार्यकर्ता हा संघटनेचा मुख्य आधार असतो हे अशोकच्या उदाहरणावरून पुन्हा एकदा सिद्ध झाले.

## मन की बात

''ओळखलं नाही का मला ? –

अरे, असं काय करता मुलांनो मी तुम्हा सर्वांची लाडकी शाखा बोलते आहे. तुमचंही बरोबरच आहे म्हणा, गेले ४ महिने आपणं भेटलो नाही ना, म्हणून तुम्हाला लगेच ओळखता आलं नसेल. पण मला खात्री आहे की तुमच्यातील कोणी मला विसरले नसेल. अहो, आपल्यातलं नातंच आहे ना तसं, कधीही न तुटणारं. कारण ज्या दिवशी तुम्ही वर्धकांनी शाखेत पहिलं पाऊल टाकलंत तेव्हा आपली जी नाळ जोडली गेली आहे ना, ती आयुष्यभर जोडलेलीच राहील. शाखेत खेळताना झालेल्या जखमांनी, युवक दादांच्या आदरयुक्त भीतीने, सहली शिबिरे यात केलेल्या दंगामस्तीने आणि युवक दादांच्या निर्मळ प्रेमाने त्या नाळेला कोणीही तोडू शकणार नाही...

असो हे सर्व झालं आपल्या नात्यासंदर्भात पण, मी आज तुमच्या सोबत का बोलते आहे ? याचं कारण माहिती आहे का तुम्हाला. नाही काय म्हणताय ? अरे आजची तारीख बघा जरा कॅलेंडरमध्ये. अरे आज १३ जुलै २०२०, आता आलं ना लक्षात !

आज आहे आपल्या दयानंद शाखेचा १७ वा वर्धापन दिन ! गेली १६ वर्षे माझे कार्य अविरतपणे सुरू आहे. कारण तुमच्यासारखे अनेक वर्धक व युवकांनी माझ्यावर अपार प्रेम केले. गेल्या ४ महिन्यात मला याच प्रेमाची कमी जाणवत आहे. कारण माझ्या अंगा-खांद्यावर खेळणारे वर्धक आणि मला शिस्तीच्या चौकटीत एकवटून ठेवणारे युवक यांच्याशी माझा संपर्क तुटला आहे.

आज कोरोना नसता तर संध्याकाळी आपण सर्वजण भव्यदिव्य वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाची तयारी करत असतो. असो, आता विचार करण्यात काही अर्थ नाही. आता गरज आहे ती सर्वांनी आपापली काळजी घेण्याची. कारण जेवढी जास्त आपण स्वतःची काळजी घेऊ तितक्या लवकर आपली भेट होईल हे निश्चित. त्यामुळे तुम्ही सर्वजण घरी राहा ! सुरक्षित राहा ! आणि दादांनी दिलेले उपक्रम करत राहा...बाकी आता आपल्या शाखेचे १८ वे वर्ष सुरू होत आहे. १८ व्या वर्षाला भारतीय संविधानात अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यामुळे आपण हे १८ वे वर्ष मोठ्या उत्साहाने साजरे करू याची खात्री आहे. जाता जाता आपल्या सर्वांना पद्याच्या दोन ओळी सांगते आणि आपली रजा घेते.

भारताचिया महारथा या, सारे मिळूनी ओढूया । पायी गती अन् हाती शक्ती, हृदयी भक्ती जोडूया ।।

भारतमाता की जय...!''

## अभिनंदन

१५० ते २०० जणांमध्ये फक्त ५-६ जणांची निवड. यातून स्वामी योगानंद शाखेचा वर्धक **चिन्मय कुलकर्णी** याची मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रीकल्चर (MCCIA) तर्फे शिष्यवृत्तीसाठी (युथ फेलोशिप) निवड झाली आहे.

स्वामी योगानंद शाखेचा वर्धक **लेफ्टनंट अक्षय गायकवाड** याला कॅप्टन पदासाठी बढती मिळाली. सप्टेंबरमध्ये ट्रेनिंग पूर्ण करून त्याचे पहिले पोस्टिंग लेह लडाख, चीन बॉर्डरवर झाले. कार्यक्षम आणि कार्यतत्पर अक्षयने अवघ्या ११ महिन्यात कॅप्टन हे पद वयाच्या २३ व्या वर्षी प्राप्त केले आहे. तुझ्या ह्या बढतीला वर्धिनीच्या परिवाराकडून खूप खूप शुभेच्छा आणि आम्हा सर्वांना तुझा खूप खूप अभिमान आहे.



योगशास्त्रात सांगितलेले यम, नियम यापैकी प्राधान्य कशाला द्यायचे हे ज्याच्या त्याच्या जीवीतकार्यानुसार ठरतं.

**कार्यकर्तापण काय असतं ? –**

✻ सळसळणारं चैतन्य म्हणजे कार्यकर्तापण ।

✻ अमाप, अपूर्व उत्साह म्हणजे कार्यकर्तापण । कामाची प्रचंड ओढ म्हणजे कार्यकर्तापण ।

✻ स्वतःपेक्षा कामाचाच अधिक विचार म्हणजे कार्यकर्तापण ।

✻ वेळ पडली तर तानाजीसारखं घरचं लग्न सोडून कोंढाण्याकडे धावणं म्हणजे कार्यकर्तापण ।

✻ संघटनेसाठी सर्वस्व अर्पण म्हणजे कार्यकर्तापण

शिवरायांविषयी समर्थ म्हणतात – सकल सुखाचा केला त्याग । म्हणोनि साधिजे तो योग ।। राज्यसाधनेची लगबग । कैसी केली ।। अशी लगबग करतात ते कार्यकर्ते.

वर्धिनीत असं कायकर्तेपण जोपासलं जावं यासाठी यत्न करूयात. वयाच्या साठीनंतर ज्यांनी आपल्यासाठी अपार कष्ट घेऊन वर्धिनी वाढवली, शेकडो गरीब मुला–मुलींच्या शिक्षणाची सोय केली, त्यांच्या हृदयात राष्ट्रभक्ती प्रज्वलित केली. कणाकणाने झिजून वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षी ही वर्धिनी आपल्या हातात देऊन अखेरचा श्वास सोडला, त्या ऋषितुल्य किशाभाऊंचे वारस होऊयात.

**– ज्ञानेश पुरंदरे**

ज्ञापुंच्या अशा मार्गदर्शनातून केंद्रीय युवा समितीचे

✻ निर्माण शाखा (११ वी–१२ वी)

✻ युवा नेतृत्व केंद्र (U-LEAD)

✻ व्यावसायिक युवा समिती हे विभाग कार्यरत आहेत.

**निर्माण शाखा (११ वी, १२ वी) –**

**विषय : सामाजिक दृष्टिकोन – संविधानाच्या माध्यमातून**

दि. १२ फेब्रुवारीला निर्माण शाखेत संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. ह्यात प्रामुख्याने उद्देशिकेतील सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय ह्या विषयात शासनाची जबाबदारी आणि नागरिकाचे कर्तव्य ह्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर संविधान अनुरुप सामाजिक, आर्थिक समानता आली आहे की नाही हे समजण्याकरिता युवकांनी १० सामाजिक प्रश्नांची यादी केली आणि पुणे स्टेशनजवळच्या पारधी समाजातील बांधवांची भेट घेतली. ह्या भेटीत युवकांनी दोन गट करून तेथील नागरिकांना शिक्षण, नोकरी, व्यवसाय, वैयक्तिक स्वच्छता आणि सुरक्षा यासंबंधी प्रश्न विचारत सामाजिक विषमतेचा अंदाज घेतला. संविधानने सुचवलेली सामाजिक आणि आर्थिक समानता येण्याकरिता आपण सर्व कटिबद्ध आहोत ह्याची जाणीव निर्माण करण्याचा हा प्रयत्न होता. भेटीच्या शेवटी युवकांनी वर्धिनीच्या पार्थनेच्या दुसऱ्या चरणाचे स्मरण केले आणि त्याचा अर्थ उलगडत सर्व पारधी आणि इतर समाजातील पिढ्या आपल्या शेजारी नांदतात. आपण त्याच्यापासून काही वेगळे नाही. त्यांची दुःख आपल्याला समजायला हवीत आणि सर्वांच्या सुखासाठी प्रयत्न करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे हे विचार घेऊन भेटीची सांगता झाली.

**१० वी, १२ वी शुभेच्छा समारंभ –**

दि. १३ फेब्रुवारीला इयत्ता १० वी व १२ वी चा शुभेच्छा समारंभ 'प्रबोध सभागृहा'मध्ये घेण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दिलीप राठोड (C.A.), श्रीमती मनीषाताई पाठक व श्री. अरविंद केळकर उपस्थित होते. इयत्ता १० वी तील निवेदिता शाखेतील वर्धिका गायत्री मोरे हिने व १२ वी तील राजर्षी शाहू

शाखेतील वर्धक पुष्कर सागडे यांनी त्यांचे मनोगत मांडले. गायत्रीने सांगितले, '१० वी च्या सुरुवातीस मनावर अभ्यासाचे खूप दडपण होते, पण शाखेतील ताईंनी व्यवस्थितरित्या अभ्यासाचे नियोजन करून घेतले व माझ्या मनातील भीती नाहीशी केली.' पुष्करने सांगितले, 'माझ्याकडे शाखेतील संपर्क व्यवस्था होती. ती व्यवस्था पार पाडत मी व्यवस्थित नियोजन करत अभ्यास केला व आता बारावीच्या परिक्षेसाठी उत्तम तयारी झाली आहे.'

श्री. दिलीप राठोड यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांचा लहानपणापासून ते लेखा परीक्षक (C.A.) पदवी घेण्यापर्यंतचा सगळा प्रवास सांगितला. त्यांनी परिश्रमपूर्वक १० वी पर्यंतचं शिक्षण घेतलं व त्यानंतरचं महाविद्यालयीन शिक्षण काम करून व घरची जबाबदारी पार पाडत पूर्ण केले. आज ते यशस्वीरीत्या लेखा परीक्षक (C.A.) झाले आहेत. उपेक्षित वस्ती व वंचित कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या दिलीप राठोड यांनी अतिशय कमी वयात स्वयंप्रेरणेच्या बळावर हे यश मिळविले. त्यांच्या मार्गदर्शनातून हे स्पष्ट झाले की कुठलीही गोष्ट मिळविण्यासाठी, परिक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी चिकाटीची गरज असते.

**कोरोना काळातील सामाजिक भान जपताना –**

संस्कृती पली यहा, पुण्यभूमि जो प्यारी हे ! जननी वीरों की – अनेको की, भरत भू हमारी हैं !
ऐसा अब युवक कहा, दिल मे जिसके राम ना ! हम युवा हैं हम करे, मुश्किलो से सामना !!

**आपदा मदत केंद्र –**

समाज आहे बांधव अपुला या भूमिकेतून 'स्व'–रूपवर्धिनी सततच आपल्या सर्व बांधवासाठी कार्यरत असते. कोरोना संकटात ज्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. अशा बांधवांना अन्नधान्य स्वरूपात मदत करावी असे 'स्व'–रूपवर्धिनीने ठरवले. वर्धिनीने साधारण १५०० कुटुंबांना म्हणजेच प्रत्येक कुटुंबात साधारण ५ सदस्य असतील तर अशा ७००० लोकांना महिनाभर पुरेल असे गहू, तांदूळ, तेल, डाळ, मसाले, साखर, शेंगदाणे, मीठ आणि विशेष म्हणजे सॅनिटायझरच्या दोन बाटल्याही या साहित्यासोबत दिल्या. १ एप्रिलपासून २५ एप्रिलपर्यंत वस्तीतील १५०० कुटुंबांना धान्य साहित्याचे वाटप केले. निरनिराळ्या २५ ते ३० वस्त्यांमध्ये अभ्यासिका, शाखा, बालवाडी, मदत गट, संस्कार वर्ग घेणाऱ्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून अगदी गरजू असणाऱ्या कुटुंबापर्यंत हे साहित्य पोहोचविण्यात आले. यासाठी वर्धिनीच्या अनेक देणगीदार व हितचिंतकांचा मदतीचा हात पुढे आला.

**'स्व'–रुपवर्धिनी आणि सदानंद नगर – नातं ४० वर्षांच्या सहवासाचं.**

सदानंदनगर म्हणजे वर्धिनीच्या इमारतीच्या समोरची वस्ती. तिथे आता वस्तीचा पुनर्विकास होऊन ११ मजली इमारत उभी आहे. पण प्रश्न मात्र तेच आहेत. लहान खोल्या, त्यात राहणारी माणसांची संख्या अधिक, आणखीनही खूप सारे. कोरोनाच्या जनजागरणाच्या हेतूने तेथे राहणाऱ्या आपल्या युवा कार्यकर्त्यांनी सर्व आवश्यक गोष्टींची पुरेपूर काळजी घेऊन डॉक्टरांच्या मदतीने तपासणी केली. एकूण ४७० घरांमधून १५८० जण राहतात. त्या सर्वांची आरोग्य तपासणी अतिशय शिस्तीत, सुरक्षित अंतर पाळून विक्रमी ३ दिवसात पूर्ण केली. तसेच तपासणी झालेल्या प्रत्येकाला मास्क वाटले, आणि घरटी १ सॅनिटायझर दिले. तसेच ज्या कुटुंबातील शिधा संपला आहे आणि आणायला पैसे देखील नाहीत अशा ५५ कुटुंबाना वर्धिनीच्या माध्यमातून शिधा पोचवला. पूर्ण वस्तीने दारात रंगीबेरंगी रांगोळी काढून वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना व डॉक्टरांना धन्यवाद दिले. मात्र **त्यावेळी कार्यकर्त्यांच्या व डॉक्टरांच्या मनात भाव होते, 'सेवा धर्म महान खरोखर सेवा धर्म महान, वैभव शिखरी राष्ट्र न्यावया प्रशस्त हा सोपान.'**

**माणुसकीचा दीपस्तंभ**

नायडू हॉस्पिटल येथे कोरोना संसर्गाच्या तपासणीसाठी पेशंटची रांग लागलेली असते. समोरासमोर पेशंटला बसवून त्यांच्या घशातील नमुना घेताना खोकला आल्यामुळे छोटे कण तपासणी करणाऱ्याच्या अंगावर पडल्यामुळे त्यालाही विषाणू संसर्गाचा फार धोका उदभवू शकतो. हे लक्षात घेऊन तपासणीसाठी अत्यंत सुलभ पद्धतीचा **आयसोलेशन बूथ** असावा ही कल्पना मनात घेऊन आपल्या युवती कार्यकर्त्या मंगलताईंचे यजमान **श्री. मंदार देशपांडे** यांनी स्वयंस्फूर्तीने आपल्या कारखान्यात हा बूथ तयार केला व तत्काळ तो नायडू हॉस्पिटलला नेऊन दिला. या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि निरपेक्ष सहकार्याबद्दल तेथील डॉक्टर्स, अधिकारी व स्टाफ यांनी सद्‌गतीत होऊन मंदारजींचे आभार मानले.

**कोरोना स्वयंसेवक मोहिम**

देश हमे देता है सबकुछ, हम भी तो कुछ देना सिखे ।

अशी प्रेरणादायी पद्ये गात मोठे होत जाणारे वर्धिनीचे युवक-युवती. शिबिरातून, शाखेतून संस्काररूपी शिदोरी सोबत घेऊन जगताना, आपली ओंजळ समृद्ध करत असताना वेळ आली होती आपली ओंजळ अर्पण करण्याची, नवीन अनुभव व सेवाभावाने ओंजळ पुन्हा भरून घेण्याची. कै. किशाभाऊंच्या स्वप्नातील सेवेकरी निर्माण होण्याची प्रक्रिया होत असताना किशाभाऊंची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवते आहे. निमित्त होते, गरवारे कोविड केअर सेंटरमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करण्याचे. कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांमध्ये जाऊन प्रत्यक्ष त्यांची सेवा करण्यासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता आहे हे समजल्यावर वर्धिनीत कार्यकर्त्यांची फळी उभी करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. कोरोना उपचार केंद्रामध्ये स्वयंसेवक म्हणून जाऊन आलेल्या श्रुती शिधये हिच्या अनुभव कथनाने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला.

पहिल्या गटामध्ये ७ कार्यकर्ते स्वयंसेवक म्हणून गेले. याआधी क्रांतिज्योती सावित्री शाखेची युवती कार्यकर्ती पौर्णिमा कांबळे हिने स्वयंसेवक म्हणून कामाचा श्रीगणेशा केला होताच. पहिल्या गटातील कार्यकर्त्यांनी व्हिडिओद्वारे तेथील कामाचे स्वरूप सर्वांपर्यंत पोहोचवले. फोटो, व्हिडिओ घेत असताना तेथील रुग्ण त्यात येणार नाहीत याची दक्षता घेतली जायची. तिथे तसा नियमच होता. फोटो आणि व्हिडिओच्या माध्यमातून, तेथे स्वयंसेवकांची घेतली जाणारी काळजी, तेथील मैत्रीपूर्ण वातावरण याबाबत इतका परिणामकारक संदेश इतर कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचला की पुढील बॅचमध्ये ९ जण स्वयंसेवक म्हणून गेले. शाखेत असताना आपल्यापेक्षा वयाने लहान वर्धकांसोबत काम करण्याचा अनुभव असणारे सर्व युवा आता आपल्यापेक्षा वयाने मोठे असणाऱ्या आणि कोरोना पॉझिटिव्ह असणाऱ्या रुग्णांबरोबर संवाद साधणार होते. त्यांच्याकडे रुग्ण म्हणून न पाहता, माणूस म्हणून पाहणार होते.

रुग्ण तिथे आला की, आधीच निराश झालेला असू शकतो. अशा वेळी त्यांची मानसिक अवस्था समजावून घेण्याचे काम वयाने लहान असूनही आपले कार्यकर्ते मोठेपणाच्या भावनेतून करत होते. रुग्णांना आधार, दिलासा देणे, त्यांच्या तक्रारी ऐकून घेणे, त्यावर काही उपाय सुचवणे, तो उपाय सहज शक्य असेल तर अंमलात आणणे हे काम स्वयंसेवक करत होते. रुग्णांनाच नाही तर सोबतच्या कार्यकर्त्यांना चहा, काढा, नाष्टा, भोजन मिळाले की नाही याची काळजी घेत होते. तेथील प्रवेशद्वारापाशी काम करत असलेल्या कार्यकर्त्यांपर्यंत देखील




हे सर्व नीट पोहोचते आहे ना ? याचीही काळजी करत होते. कोणा स्वयंसेवकाला काही त्रास होत नाहीयेना ? कोणाला मदतीची आवश्यकता आहे ? हे सर्व अगदी मायेने पहात होते, एकमेकांना सांभाळून घेत होते. कोणत्याही बॅचमध्ये फक्त वर्धिनीचेच कार्यकर्ते असतील असे नाही तर इतरही अनेक युवक युवती होते. त्या सर्वांबरोबर मैत्री करून घेऊन तीही अशा प्रकारे की जणू काही अनेक वर्षे एकमेकांना ओळखतो, विविध स्वभाव, सवयी असलेल्या स्वयंसेवकांबरोबर एका गटात काम करणे म्हणजे आपोआपच अनेक कौशल्ये विकसित करून घेण्याची संधी. या संधीचा योग्य असा उपयोग आपल्या विकासासाठी होणार आहे आणि तोही नकळतपणे, सहजतेने.

दररोज घेतल्या जाणाऱ्या बैठकांमधून घेतला जाणारा कामाचा आढावा, त्यातील शक्य असतील तेवढ्या सुधारणा, नवीन उपक्रम यासाठी पुरेपूर संधी होती. संवादिनी उत्तम वाजवू शकणारी आणि कीर्तन करणारी अहिल्या धायगुडे या युवतीला वाद्यासहित गाणे सादर करण्याची संधी मिळाली. आपल्या नादमधुर आवाजात माईकवर सूचना देण्याची संधी ऋतुजा नराल हिला मिळाली. रेडिओलॉजी तंत्रज्ञान शिकणाऱ्या पायलला तेथील डॉक्टरांसमवेत एक्स-रे कसा पाहायचा असतो ? याचे अनुभव मिळाले. पीपीई कीट घालून पाण्याने भरलेले जड जार दुसऱ्या-तिसऱ्या मजल्यावर चढवणे हे काम रात्रीची ड्युटी करणाऱ्या अक्षय, सतीश आणि पुष्करने न कंटाळता आनंदाने पार पाडले.

तेथे स्वयंसेवकांची खूप काळजी घेतली जात होती. दररोज ऑक्सिजनची पातळी, नाडीचे ठोके (पल्स रेट), शरीराचे तापमान मोजले जाते. बैठकीच्या वेळी सर्वांना काढा दिला जातो. दिवसभराचा आढावा घेतल्यानंतर एक खेळ खेळला जातो, ज्यातून समुपदेशन कसे करावे, समूहात सर्वांना सांभाळून काम कसे करावे, संघभावना कशी विकसित करावी, याचे प्रशिक्षण आपोआप होते. संघाचे प्रचारक श्री. सुनीलजी साठे, श्री. युवराजजी,

तेथील व्यवस्थापक श्री. दीपकजी हे बैठकीस उपस्थित असत. गरवारे सेंटर जसे सुरू झाले आहे त्या पहिल्या दिवसापासून तेथे स्वयंसेवकांना सूचना देणारी, त्यांच्याकडून योग्य प्रकारे काम करवून घेणारी वीणाताई म्हणजे उत्साहाचा झराच आहे. वीणाताईवर कोणीही राग धरूच शकत नाही. कारण ती ज्या पद्धतीने सर्वांना आपल्या मायेच्या पंखाखाली घेते तेही सामाजिक अंतराचा नियम पाळून, ते पाहिले की तिच्याबद्दलची आपुलकी आणि आदर शतगुणित होतो. वीणाताईने यापूर्वी मणिपूर येथे शिक्षण क्षेत्रात भरपूर काम केले आहे. तिचे अनुभव कथन हाही बैठकीचा एक भाग असायचा. आपली युवती कार्यकर्ती दिव्या दररोज जेवत नाही हे कळल्यापासून वीणाताई दररोज भोजनाच्या वेळेत तिला फोन करून ''जेवलीस का ?'' अशी चौकशी करणारच. आमच्या आधीच्या गटातील सानिया नावाच्या एका मुलीला ताप आला होता. लगेचच तिचा बेड वेगळा ठेवला. तिला जेवण जात नव्हते तर तिच्यासाठी सुक्या मेव्याचा खाऊ दिपकजींनी आणून दिला. निवासी डॉक्टरांचे पथक तिथे आहेच. त्यांच्याबरोबर सर्वांचीच मैत्री चटकन होते. सगळे अगदी मनमिळावू, आपल्या ज्ञानाचा अहंकार नसलेले असल्याने त्यांचा आधार वाटायचा आणि मोकळेपणी त्यांच्याशी गप्पाही व्हायच्या. सतीशला तर त्याच्या अभियांत्रिकी क्षेत्रात नोकरी करणारा दादा तिथे भेटला. त्या दादाने सतीशला आणि अनेकांना करिअरबाबत मार्गदर्शन केले.

एक वेगळेपण असे जाणवले की, जे स्वतः रुग्ण म्हणून तेथे आधी होते त्यातील अनेकजण योग्य कालावधीची विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा येत होते, पण स्वयंसेवक म्हणून. तेथील वास्तव्याचा कालावधी संपल्यानंतर रुग्ण घरी जातात. स्वाभाविकच घराची ओढ असणारच. त्यामुळे चेहऱ्यावर हसू असायचे. एकदा सहज म्हटले की, ''आज चेहरा खुललाय. घरी जाणार याचा आनंद चेहऱ्यावर दिसतोय.'' तर लगेच प्रतिक्रिया आली की, ''येथून खरंतर जावेसेच वाटत नाहीये कारण तुम्ही इतकी छान बडदास्त ठेवता.'' अर्थात हा अनुभव एका महिलेचा होता. माहेरपण अनुभवल्याचे सुख आपण या निमित्ताने देऊ शकलो याचे समाधान आपल्याला मिळणार असतेच. एकाच कुटुंबातील तीन ते चारजण, महिला आणि पुरुषही तिथे रुग्ण म्हणून यायचे. महिला आणि पुरुषांची व्यवस्था वेगवेगळ्या इमारतींमध्ये केलेली होती. एका कुटुंबातील एका महिलेने प्रश्न केला की, आमच्या यजमानांचे कपडे धुवायला मी घेऊ शकते का. कारण त्यांना स्वतःचे कपडे धुण्याची सवय नाहीये. मनात विचार आला की, याही परिस्थितीत पुरुषी मानसिकता बदलू शकत नाही ?

पीपीई कीट घालून डॉक्टरांसमवेत किंवा त्यांच्याशिवाय रुग्णांच्या जवळ जाण्याची संधी अनेकांना मिळाली. एक अनुभव लक्षात राहण्यासारखा आहे. पायल जिरेसाळ पीपीई कीट घालून, डॉक्टरांबरोबर एका महिला रुग्णापाशी गेली. शारीरिक त्रासापेक्षा आपण आपल्या घरच्या माणसांबरोबर नाही आहोत याचाच त्रास जास्त असतो. हे त्या महिला रुग्णापेक्षा वयाने लहान असणाऱ्या पायलने बरोबर ओळखले. त्या महिलेचा हात हातात घेऊन तिचे सांत्वन केले. त्या बाईंना खूप आधार वाटला. त्यांनी तिला भरभरून आशीर्वाद दिले. काही रुग्ण खूप मजेशीर असायचे. 'मला झोपच येत नाहीये. आता मी काय करू ?' असे फोन तर रात्री नित्याचेच. गरवारे सेंटरमधून घरी गेलेल्या व्यक्तीही कधी कधी असे फोन करत. अशा वेळी त्यांना दिलासा देणे हे कामही करायला लागायचे. एकाच कुटुंबातील आई आणि छोटी मुलगी एका इमारतीत आणि बाबा दुसऱ्या इमारतीत. एकमेकांना लांबून फक्त बघायचे. चहा नाष्ट्याच्या वेळी छोटीला तिचे बाबा दिसणार. अशा वेळी आनंदून गेलेली पण बाबांच्या जवळ जाऊ शकत नसल्याने येणारी अगतिकता असे संमिश्र भाव चेहऱ्यावर असलेली छोटी बघून आपल्या ऋतुजाचेही मन हेलावून गेले. ऋतुजा स्वतः मानसशास्त्र विषयाचे शिक्षण घेत आहे. ज्या रुग्णांना दुसऱ्या दिवशी

डिस्चार्ज मिळणार आहे अशा रुग्णांचे समुपदेशन डॉक्टर कसे करतात हे पाहण्याची संधी ऋतुजाला मिळाली. सगळ्यात मजेशीर गोष्ट होती, रुग्णांच्या घरून येणाऱ्या वस्तूंचे पार्सल त्या त्या रुग्णापर्यंत पोहोचवणे. त्या पार्सलमध्ये नेमके काय आहे ? हे तपासणे जिकीरीचे काम होते. कारण अनेकदा रुग्णाचे पथ्य मोडणारे पदार्थ पार्सलमधून यायचे. कोणाकोणाला काही व्यसन असेल तर त्या व्यसनांपासून दहा ते बारा दिवस दूर राहण्याची सजा रुग्णाला असायची. मग तेही पार्सल माध्यमातून स्वतःचे व्यसन पूर्ण होईल असा प्रयत्न करायचे. पण आपले स्वयंसेवक भारी होते. त्यांना बैठकांमधून सांगितले असायचेच. पार्सल नीट तपासून घेऊन मगच आवश्यक त्या गोष्टी रुग्णापर्यंत पोहोचायच्या. सिगारेट, गुटखा, तेलकट-तळलेल्या वस्तू, विकतचे खाद्यपदार्थ रुग्णांपर्यंत पोहोचायच्या नाहीत. अनेकदा स्वयंसेवकांचे असे मनापासून काम करणे पाहिल्यावर अनेक रुग्ण त्यांच्या नातेवाईकांना सांगून सर्व स्वयंसेवकांसाठी खाऊही मागवायचे.

दोन बॅचमध्ये सलग आपले कार्यकर्ते तिथे स्वयंसेवक म्हणून गेले होते. पहिल्या बॅचमधील सर्वांचे कोरोना रिपोर्ट निगेटिव्ह आले आणि काम करताना स्वतःची योग्य प्रकारे काळजी घेण्याचे समाधान लाभले. ''जब देश ने दी आवाज तो हम, घर की राहें भूल गये ।'' असे म्हणत दुसऱ्या बॅचमधील सर्वच ९ जणांनी आणखी एक आठवडा काम पुढे चालू ठेवण्याचे ठरवले. सर्वांनी आपापल्या घरच्यांना येथील कामाची माहिती व्यवस्थितपणे समजावून सांगितल्याचा फायदा असा झाला की सगळ्यांच्याच घरच्यांनी अजून एक आठवडा काम करण्यासाठी परवानगी दिली. त्यात भर पडली नव्या उमेदीच्या ४ जणांची, असे एकूण तेराजण एकत्र तिसऱ्या बॅचमध्ये होते.

सात दिवस तेथे काम केल्यावर, पुढील सात दिवस विलगीकरण होते. मुलांची राहण्याची सोय पौड रस्त्यावरील सरस्वती वसतीगृहात तर मुलींची सोय कर्वे वसतीगृहात असते. तेथेही वेळच्या वेळी चहा-नाष्टा, दोन्ही वेळचे भोजन, Vitals तपासणी असतेच. सुनीलजी, युवराजजी यांच्यासोबत गप्पा हा एक आनंदाचा भाग. हा कालावधी थोडा कंटाळवाणा वाटतो. कारण तेथून बाहेर पडता येत नाही. आपण तिथे Corona Warriors म्हणून गेलेलो असतो. तिथून बाहेर पडताना Corona Carriers म्हणून बाहेर पडायचे नसते. या संपूर्ण कालावधीत भेटायला येणारे आणि सोबत खाऊचा साठा आणणारे निलेशदादा, कोमलताई, राहुलदादा, सुमितदादा, चेतनदादा, सुरेशदादा यांचेही प्रोत्साहन मोलाचे आहे. सर्वात कमाल आहे, सुरज उणेचा याची. दररोज संध्याकाळी आपली नोकरी सांभाळून तो गरवारे सेंटरला जातो आणि तिथे काम करतो.

समाजऋण, देणे समाजाचे असे मोठे शब्द न वापरता आपल्या कृतीतून सहजपणे स्वयंसेवक म्हणून काम करणारी आजची युवा पिढी पाहिली की आशादायक चित्र नजरेसमोर येते. येथे येणाऱ्या स्वयंसेवकांना काही मानधन दिले जाते का ? असाही प्रश्न मला एकांनी विचारला. त्याचे उत्तर नाही म्हणून देताना माझी मान अभिमानाने उंचावली होती.

सहभागी स्वयंसेवक - १) मनीषा पाठक २) ऋतुजा नराल ३) अहिल्या धायगुडे ४) पुष्कर सागडे ५) सतीश बिराजदार ६) अक्षय मुळे ७) पायल जिरेसाळ ८) ओम इजंतकर ९) निखिल साबळे १०) शेखर चव्हाण ११) सत्यम तांबडे १२) प्रणव पोळ १३) प्रथमेश राजगुडे १४) हर्षद पेंढार १५) रोहित ठाकूर १६) वैभव दळवी १७) केदार घाडगे १८) प्रणव ढमाले १९) दिव्या कुंभारकर २०) पायल शहा २१) पौर्णिमा कांबळे २२) सुरज उणेचा २३) संदीप जगधने.

* * *

**युवा ऊर्जा उपक्रम –**

इतिहास शिकवितो बरेच काही, ज्यातून सतत ऊर्जा मिळत राही !

'स्व'–रूपवर्धिनीच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून कामात असणारे श्री. शिरीष पटवर्धन सध्या वर्धिनीचे उपाध्यक्ष आहेत. अनेक अनुभवसमृद्ध असे सरांचे व्यक्तिमत्त्व. सरांनी हेच अनुभव 'आठवणींची आवर्तन' या संग्रहात एकत्रित केले. युवक–युवतींसाठी या बंदीच्या काळातील आव्हान पेलण्याची उर्जा आणि प्रेरणा मिळावी यासाठी सरांचे स्वतःच्या आवाजात ध्वनिमुद्रित केलेले अनुभव प्रसारित करण्यात आले. 'स्व'–रूपवर्धिनीच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांचा प्रवास इतर सर्व कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

**युवा शिबिर –**

अगस्त्य फाऊंडेशन सोबत युवा विभागाने design thinking या विषयावर ७ दिवसांचे ऑनलाईन शिबिर घेतले. त्यात ४० युवक युवतींनी सहभाग घेतला. (शिबिर समन्वयक – चेतन कुसाळकर)

**युवती विभाग –**

युवती विभागाच्या वतीने नवरात्रोत्सव विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. स्त्रियांमध्ये ममत्व, प्रेम, औदार्य, धैर्य, संवेदनशीलता, सामाजिक जाणीव असे अनेक गुण असतात. या सगळ्या गुणांचे एकत्रित दर्शन ज्यांच्या ठायी दिसते आणि ज्या त्यांनी स्वतः निवडलेल्या क्षेत्रात उंचीवर जाऊन पोहोचल्या आहेत, अशा कर्तृत्वाचा परिचय कार्यकर्त्यांना व्हावा, या उद्देशाने या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

● दि. १७ ऑक्टोबर २०२० या दिवशी नर्मदालय शिक्षण संकुलाच्या प्रमुख मा. भारतीताई ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. मध्य प्रदेशातील आदिवासी व आसामच्या दुर्गम भागामध्ये वंचित मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी सुरू केलेल्या शाळा, नर्मदा परिक्रमेतील अनुभव, नर्मदालयाची स्थापना हा त्यांचा जीवनप्रवास अतिशय प्रेरणादायी होता. सामान्यातील असामान्य देवीरूप स्त्रीचे दर्शन घडले.

● दुसरे व्याख्यान दि. २४ ऑक्टोबर या दिवशी संपन्न झाले. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या उक्तीला सार्थ ठरवणाऱ्या काही निश्चयी व्यक्ती आपल्याला नेहमी प्रेरणा देत असतात. अशाच प्रकारे शांतपणे पण तितक्याच ठामपणे काम करणाऱ्या **निवेदिता शाखेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या संगीता यादव (पोलिस इन्स्पेक्टर)** यांची मुलाखत अनेक युवती कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारी ठरली. ही मुलाखत आरतीताई काटकर यांनी घेतली. अनेक गुन्हेगारांना वठणीवर आणताना त्यांनी केलेला संघर्ष परिस्थितीमुळे वाट चुकलेल्या महिलांना सन्मार्गाला लावताना मिळालेले समाधान, बेरड समाजाचे काम करणारे डॉ. भीमराव गस्ती यांच्या सहवासातील अमूल्य आठवणी हा सर्व जीवनप्रवास ताईंनी मांडला. 'स्व'–रूपवर्धिनीच्या संस्कारांचा प्रशासकीय सेवेत काम करताना झालेला फायदा आणि वर्धिनीशी जोडलेली जिव्हाळ्याची नाळ या विषयी ऐकताना सगळेजण भावूक झाले होते.

**माहिती आणि तंत्रज्ञान समिती (IT Commitee) - प्रगतीच्या दिशेने एक नवे पाऊल –**

माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण – कुशल मनुष्यबळाला तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर कौशल्य विकास आणि पर्यायाने व्यक्ती, संस्था आणि समाजाचा विकास हा जलदगतीने होतो, असे आयटी समिती मानते. ह्या तत्त्वाला धरून आयटी समितीने सप्टेंबर महिन्यापासून माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण वर्गाचा उपक्रम हाती घेतला आहे. वर्धिनीतील कार्यकर्तेआणि कर्मचारी यांना सॉफ्टवेअर आणि ॲप्लिकेशनचे प्रशिक्षण देऊन त्याचा वापर संस्थेच्या अनेक कामामध्ये सुलभतेने करता यावा यासाठी हा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.

ITAP - **I**nformation **T**echnology **A**wareness **P**rogramme – ॲप्स, चॅट, लिंक, मिम्स हे शब्द आता

संतांचं जीवन समाजाच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी असतं म्हणून
त्याचा व्यवहारही बोले तैसा चाले असाच असला पाहिजे.

सर्वांनाच माहीत झाले आहेत. पण एखादे साधन हाताशी आले, तरी त्याचा प्रभावी आणि योग्य वापर झाला नाही तर त्यामुळे सर्वांचे नुकसान होते. त्यामुळे ह्या गोष्टींचा योग्य वापर व्हावा आणि तो सर्व कार्यकर्त्यांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचावा या हेतूने आयटी समितीने I-TAP हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत दर आठवड्याला माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन माहिती देणारा एक पानी लेख देत आहोत.

वरील उपक्रमाव्यतिरिक्त डिजिटल समाजमाध्यमे हाताळण्यासाठी संस्थेचे धोरण तयार करणे, डाटा मॅनेजमेंट ॲप्लिकेशन तयार करणे, टाटा प्रो एनगेजसारख्या संस्थेबरोबर काही संयुक्त उपक्रम राबवणे असे काही उपक्रम आयटी समितीने हाती घेतले आहेत.

❖ ❖ ❖

**अभिमान वाटतो गौरीताई तुझा.**

वर्धिनीच्या भगिनी निवेदिता शाखेची माजी शाखाप्रमुख आणि भागप्रमुखही सगळ्याच गोष्टीत पहिल्यापासून अत्यंत Sincere शांत आणि हसतमुख सर्व वर्धिका आणि युवतींची लाडकी. शिक्षण M.Sc. Microbiology. नुकतीच काही महिन्यांपूर्वी लग्न होऊन सासरी गेली. कोरोनाचे थैमान सुरू झाल्यापासून गेले २ महिने Technical Officer of Viral Load Laboratory, at BJ Government Medical College Sassoon General Hospital मध्ये एकही दिवस सुट्टी न घेता; रोजचे किमान १२-१२ तास विषाणू परीक्षणाचे जोखमीचे काम संपूर्ण एकाग्रतेने आणि अत्यंत काळजीपूर्वक करत आहे. रोज सकाळी ७ वाजता सांगवीतून आपल्या दुचाकीवरून गौरीताई ससून आवारात शिरते ते परतीची माहीत नसलेली वेळ डोक्यातून काढून टाकून. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले Samples तिची वाटच बघत असतात. जेवणाची १५ मिनिटं सोडली तर गौरीताई अखंड परीक्षण आणि अहवालाच्या कामात पूर्ण गढलेली असते. आपले काय होईल याची अजिबात पर्वा न करता धैर्याने हे काम करणाऱ्या गौरीताईला लाख लाख सलाम. तिला हे काम करण्यासाठी पूर्ण प्रोत्साहन देणारे आमचे जावईबापू महेश पवार हेही निश्चितच कौतुकास पात्र आहेत.



**अभिनंदन –** स्वामी अखंडानंद शाखेचे युवक व वर्धिनीचे युवा कार्यकर्ते **प्रा. उमेश बिबवे** यांनी क्रीडा विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांचा विषय होता –

Study on attitude of Physical Education Professionals towards Professional Development and Job Satisfaction.

# ज्ञापुंचे आपल्यासाठी पत्र

नमस्कार मंडळी,

तुमच्या वाढदिवसाला खूप पत्रे लिहिली, मग म्हणलं जाता जाता एक पत्र नक्की लिहिलं पाहिजे.

लोक हो, मी काय रिकामा जात नाहीये. तुमच्या सगळ्या आठवणी घेऊन चाललोय. हरिश्चंद्रगडाची मज्जा, शिबिरातील 'चला उठा' अशी हाक, बैठकीतले रुसवे फुगवे, तुमच्या बरोबर साजरा केलेला आनंद, वाटून घेतलेले दुःख असे बरेच काही घेऊन चाललोय. पण काही गोष्टी राहिल्या. त्या म्हणजे किशाभाऊंचा जन्मशताब्दी कार्यक्रम, सुरेश रावांचा कविता संग्रह, पायगुडेच्या लग्नात करणार होतो तो डान्स, युवकांना भेटण्याची उत्सुकता, बैठकीत होणारी समोसा पार्टी असे बरेच काही... ते तुमच्यासाठी ठेवलंय. नक्की पूर्ण करा बरं का...

हा आत्ता आलेला कोरोना फिरोना काय करणार माझे ? एवढे पाठीराखे होते माझ्याबरोबर की तोच घाबरला मला. पण आधीच्या आजारांनी जरा डोकं वर काढलं आणि माझी तब्बेत बिघडली. तुमचे ज्ञापु लढले बरं का, पण दुर्देवाने जिंकू शकले नाहीत.

पण मी अशी इतक्या सहजा सहजी पाठ सोडणार नाही तुमची. वर्धिनीत आलात तर मी माझ्या खुर्चीवर बसलेला दिसन. चिंतेत असाल तर डोळे मिटा मी तुमच्या सोबतच असेन. आनंदाची बातमी असेल तर मोठ्याने सांगा नक्की ऐकू येईल मला. शरीराने नसलो तरी मनाने तुमच्या जवळ सदैव असेन.

पण मंडळी काही कामे मात्र मागे राहिली आहेत. ती तुम्हाला पूर्ण करायची आहेत. किशाभाऊंची स्वप्नातली वर्धिनी अजून थोडी दूर आहे. ते काम पूर्ण करायचे आहे. माझ्या वाटचं काम तुम्हाला आता वाटून घ्यावे लागेल. त्यामुळे आता सुटका नाही. जोमाने परत कामाला लागा. मी तुमच्या बरोबर आहेच. किशाभाऊंना भेटून सगळी खबर कळवतो, आपली काळजी घ्या.

तुमच्या मनात सदैव असणारे,

**ज्ञापु**

# अशी आपली शाखा

काम करून आल्यावर पण,
ज्याची आठवण यायची ।
अशी आपली शाखा,
स्वप्नात पण भरायची ।।

जग जसं थांबलं,
त्याच एवढं वाईट नाही वाटलं ।
शाखा पण थांबणार,
यासारखं स्वप्न पण नाही पडलं ।।

घरात बसून सगळे,
कोणत्याही गोष्टीत रमू लागले ।
आमचे पाय मात्र संध्याकाळी,
बाहेर जाता जाता थांबले ।।

सकाळ आणि दुपार,
मज्जा करण्यात जाते ।
सहा च्या ठोक्याला मात्र,
शाखेची आठवण येते ।।

शाखेचा विषय निघाला ,
की जीवाची घालमेल व्हायची ।
विचार करता करता ,
रात्र सरून जायची ।।

शाखेची आठवण येता,
मैदान उभं राहतं ।
सवंगड्यांच्या भेटीसाठी,
मन व्याकुळ होतं ।।

आता मात्र करमत नाही,
शाखेशिवाय रहावत नाही ।
शुभरात्रीची मिठी,
आता कोणीच मारत नाही ।।

माफ करा किशाभाऊ,
आम्ही कुठेच कमी पडलो नाही ।
तुमच्या संस्काराचे झाड,
कधीच मोडू दिले नाही ।।

अशी संकटे लाख येतील,
आम्ही असेच उभे राहू ।
तुम्ही केलेली संकटांवरची मात,
आम्ही सदैव स्मरणात ठेऊ ।।

बऱ्याच काळानंतर आम्ही,
पुन्हा उभे राहणार आहोत ।
शाखेतल्या मूल्यांचे बीज,
पुन्हा जमिनीत रुजवणार आहोत ।।

**– राहुल पायगुडे**

## बहुआयामी प्रशिक्षण संकुल–चऱ्होली

**प्रकल्पामागची पार्श्वभूमी**

१९८९–९० पासून वर्धिनीच्या मंगळवार पेठेतील वास्तूमध्ये गरजू मुली व महिलांसाठी वेगवेगळे उद्योग प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले. त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. प्रतिसाद चांगला मिळण्याचे कारण हेच आहे की गरजू समाजघटकातील महिलांना घर चालवताना येणाऱ्या आर्थिक मर्यादा. अशा घरातील महिलांना असं मनापासून वाटतं की आपण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हायला हवं. त्यांच्या या इच्छेला बळ देणारं हे काम असल्याने प्रतिसाद उदंड मिळाला. गेल्या तीस वर्षांमध्ये वेगवेगळे अभ्यासक्रम पूर्ण करून स्वावलंबी झालेल्या मुली व महिलांची संख्या चार हजाराहून अधिक आहे. स्वावलंबी होऊ शकल्याने अनेक महिला या त्यांच्या त्यांच्या घराच्या कर्त्या होऊ शकल्या.

अनेकजणी घरातील निर्णय घेणाऱ्या झाल्या. ग्रामीण भागातील ज्या मुलींना हे अभ्यासक्रम पूर्ण करता आले अशा मुलींचं लग्नाचं वय हे १६–१७ वरून २२–२३ पर्यंत पुढे गेलं. कारण या मुली त्यांच्या त्यांच्या घराच्या आधार बनल्या होत्या. अनेक मुलींनी स्वत:च्या लग्नासाठी स्वत:च्या कमाईतून पैसे उभे केले आणि आई वडिलांना कर्ज घेऊन लग्न लावून देण्याची वेळ येऊ दिली नाही. इतकंच नाही तर मोजक्या घटना अशाही अनुभवायला मिळाल्या ज्यामध्ये या मुलींचा संसार मोडण्याच्या टोकावर होता पण आपली पत्नी आता कमावती झाली आहे आणि तिचाच आपल्याला आधार होऊ शकतो असा साक्षात्कार झालेल्या त्यांच्या यजमानांना उपरती झाली आणि संसार सुखाने सुरु झाले.

वेगवेगळ्या घरातील अशा शेकडो यशकथा आहेत. अशा अनुभवांमुळे आणि प्रतिसादामुळे महिलांसाठीच्या उद्योग शिक्षण विभागात अधिकाधिक काम करण्याची गरज जाणवत होती. अडचण होती ती उपलब्ध जागेची आणि वेळेची. वर्धिनीच्या मंगळवार पेठेतील वास्तूमध्ये अनेक प्रकल्प आणि उपक्रम चालतात. त्यामुळे प्रत्येक विभागालाच मर्यादित वेळेत आणि जागेत काम करावं लागतं आहे. गरजू मुली आणि महिला स्वावलंबी होण्यासाठीचे काम हे अत्यंत महत्त्वाचे आहे कारण एक महिला स्वावलंबी झाली की तिच्या घराचे संपूर्ण चित्रच बदलते. त्यामुळे या विभागाला पूर्ण वेळ उपलब्ध अशी जागा असावी असे वर्धिनीच्या विश्वस्तांना, विशेषत: संस्थापक स्वर्गीय किशाभाऊ पटवर्धन सर आणि संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांच्या मनात होते. विश्वस्त मंडळाच्या अनेक बैठकांमध्ये या संबंधी बोलणे होत असायचे.

**दान पत्राने जमीन मिळाली आणि...**

२००४ साली वृद्धापकाळामुळे किशाभाऊ पटवर्धन सरांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या मनात असलेल्या या प्रकल्पाला गती देण्यासाठी पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांनी पुणे आणि पिंपरी–चिंचवड महानगरपालिकांच्या सीमेवर असलेल्या चऱ्होली बुद्रुक या गावातील त्यांची एक एकर जागा दानपत्राने वर्धिनीला दिली. त्यानंतर खऱ्या अर्थाने या विषयाला गती मिळाली. जागा जरी मिळाली तरी बांधकाम आराखडे मंजूर होण्यासाठी आवश्यक अशा सर्व बाबींची पूर्तता करण्यामध्ये जवळ जवळ दहा वर्षे गेली. कारण रस्त्यासारखा विषय पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील होता आणि त्यांनी रस्ता मंजूर करून त्याचे काम मार्गी लावणे हे केवळ त्यांच्याच अखत्यारीतील होते आणि ते मार्गी लागण्यात इतका काळ गेला. तत्कालीन महापौर आणि सर्व संबंधित विभागांच्या सहकार्यामुळे संकुलाच्या बांधकामाचा आरखडा मंजूर झाला.

**जन्मशताब्दी वर्षाचा सुयोग**

२०२० हे स्वर्गीय किशाभाऊ पटवर्धन सरांचे जन्मशताब्दी वर्ष. या वर्षात त्यांच्या आणि पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांच्या मनात असलेला परंतु ते असेपर्यंत मार्गी न लागू शकलेला हा प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प वर्धिनीच्या विश्वस्तांनी घेतला. १५ ऑगस्ट २०१९ रोजी वर्धिनीचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. भूमिपूजन जरी १५ ऑगस्टला झाले तरी प्रत्यक्ष बांधकाम सुरु व्हायला नोव्हेंबर महिना उजाडला. कारण २०१९ मध्ये नोव्हेंबर सुरु होईपर्यंत पाऊस पडतच होता आणि संस्थेच्या जागेवर जाण्यासाठीच्या रस्त्याचे कामही सुरु झाले नव्हते.

नोव्हेंबरमध्ये काम सुरु झाले. हळूहळू बांधकाम आकारास येऊ लागले. या गतीने किशाभाऊ सरांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या सांगतेपर्यंत बांधकामाचा पहिला टप्पा पूर्ण होईल आणि त्यासाठी आवश्यक असे निधीसंकलनही होईल असा सर्वांना विश्वास वाटत होता.

**कोरोना विषाणूचा आघात**

२०२० चा मार्च महिना जसा सुरु झाला तसा तसा कोरोना विषाणू केवळ भारतामध्येच नाही तर संपूर्ण जगभर थैमान घालू लागला होता. त्यामुळे भारत सरकारने संपूर्ण देशामध्ये लॉकडाऊन घोषित केला आणि सुरू झालेले बांधकाम पूर्ण थांबवावे लागले. वेळापत्रकानुसार प्रगतीपथावर असलेल्या बांधकामाला खीळ बसली. अर्थात तीन महिन्यानंतर अनलॉक प्रक्रिया सुरु झाली आणि हळूहळू बांधकाम सुरू झाले. अर्थात पूर्ण वेगाने काम सुरु व्हायला २०२० चा ऑक्टोबर महिना उजाडावा लागला.

लॉकडाऊनमुळे केवळ हे बांधकामच नाही तर वर्धिनीच्या सर्व विभागांचे काम शासनाच्या आदेशानुसार बंद ठेवण्यात आले. आपापल्या घरात सुरक्षित राहायच्या या काळात घरात बसूनच पण whatsapp, email अशा माध्यमातून या प्रकल्पासाठी निधी संकलन करण्याचा प्रयत्न केला आणि त्याला अतिशय उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. या कालावधीत सुमारे चाळीस लाख रुपयांचा निधी संकलित झाला. संकलित झालेली रक्कम तर महत्त्वाची आहेच पण त्यापेक्षा एक गोष्ट या निमित्ताने जाणवली की अशा कठीण काळातही समाज वर्धिनीच्या कामाच्या मागे, त्याच्या संकल्पाच्या मागे ठामपणे उभा आहे. या प्रोत्साहनामुळे अधिक जोमाने काम करण्याचे बळ मिळाले हे निर्विवाद.

**एकूण बांधकाम आणि त्यातील पहिल्या टप्प्याच्या बांधकामासंबंधी थोडेसे...**

चऱ्होली येथील प्रशिक्षण संकुलाची मूळ योजना मोठी आहे. तळ मजला/ पार्किंग + सहा मजले असं प्रशिक्षण संकुल असेल तर त्याला जोडूनच ग्रामीण/वनवासी भागातील गरजू मुली/महिला राहू शकतील अशी सहा मजली वसतिगृहाची इमारत असेल. इतकं बांधकाम पूर्ण करायला खूप मोठा निधी उभा करावा लागेल. कोरोनाचं संकट दूर झाल्यावर समाज निधी उभा राहण्यासाठी मदत करेल असा विश्वास आहे परंतु तरीही मंगळवार पेठेत वर्धिनीची वास्तू उभी करताना जसा विचार केला होता तसाच विचार चऱ्होली प्रकल्पांच्याही बाबतीत केला आहे. मंगळवार पेठेतील वर्धिनीची वास्तू उभी करताना चारही मजल्यांच्या आराखड्याला मंजुरी मिळाली होती परंतु पहिल्या टप्यात तेव्हा दोनच मजले बांधले होते. दोन मजल्यांची ही वास्तू उपक्रमांमुळे अपुरी पडायला लागल्यावर उर्वरित दोन मजल्यांचे बांधकाम पूर्ण केले गेले. चऱ्होली येथेही पहिला टप्पा तळमजला + तीन मजले असा असणार आहे. बांधकामाचा हा टप्पा पूर्ण करण्यासाठी सुमारे दहा कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. वर्धिनीला विश्वास आहे की समाज या कामासाठीही वर्धिनीच्या पाठीशी उभा राहील.

**प्रस्तावित अभ्यासक्रम**

या उभ्या रहात असलेल्या संकुलाच्या पहिल्या टप्यात खालील अभ्यासक्रम टप्याटप्याने सुरु करण्याचा मानस आहे. दहावी–बारावी पर्यंत शिक्षण झालेल्या गरजू घटकातील मुली व महिलांना करता येतील अशा अभ्यासक्रमांचा विचार प्राधान्याने केला आहे जेणेकरून मुलींना/महिलांना लवकरात लवकर स्वत:च्या पायावर उभे राहता येईल.

* Gen. Nursing Midwifery (GNM) Diploma Course
* Rugna Sahayak Course (ongoing activity)
* X Ray Technicians
* Dialysis Operators
* Lab. Technicians
* Diploma in Physiotherapy
* Alternative Medicines (Acupressure Diploma)
* Alternative Medicines (Naturopathy)
* Yoga Training Course
* Basic Tailoring & Fashion Designing
* Food Processing

या अभ्यासक्रमांच्या व्यतिरिक्त या जागेचा उपयोग अन्य विविध उपक्रम आणि कार्यक्रमांसाठी केला जाईल. उदा.

१) शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान संशोधिका

२) व्हर्च्युअल क्लासरूम

३) चऱ्होली आणि परिसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी सायंकालीन शाखा.

४) निवासी शिबिरे / प्रशिक्षण वर्ग इ.

आकारास येत असलेल्या या बांधकाम प्रकल्पाला आपण भेट द्यावी. प्रकल्प वेळेवर पूर्ण होण्यासाठी आणि या नव्या वास्तूमध्ये प्रस्तावित अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आर्थिक मदतीबरोबरच आपणास जे जे सहकार्य करणे शक्य आहे ते करावे अशी या निमित्ताने विनंती.





**वस्ती विकास प्रकल्प :**

'स्व'-रूपवर्धिनीच्या शाखांमधून वस्तीतील निवडक मुलांना शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास याच्या मार्गदर्शनाचे काम चालू आहे. पण याचबरोबर जी मुले शाखांमध्ये जाऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी सर्वांगीण विकासाचे काम गेल्या वर्षीपासून उत्थान प्रकल्प या अंतर्गत चालू आहे. या वर्षी झालेले विशेष उपक्रम -

✲ **आरोग्य मार्गदर्शन सप्ताह** – डॉ. मेहता फाउंडेशन संचालित आरोग्य मार्गदर्शन शिबिर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सर्व अभ्यासिकांवर झाले. डॉ. जोशी सरांनी मुलांना आहार, स्वच्छता, व्यायाम याची माहिती वेगवेगळ्या खेळांतून दिली. यातून बाहेरील उघड्यावरचे तसेच पिशवीबंद पदार्थ खाऊ नयेत, पाणी जास्त प्यायला हवे, नेहमीच हात-पाय स्वच्छ धुवायला हवेत इत्यादी प्राथमिक स्वच्छतेच्या सवयी मुलांच्या लक्षात आणून दिल्या.

✲ **मकर संक्रमण उत्सव** – सर्व अभ्यासिकेतील विद्यार्थी व पालक शाखांच्या उत्सवात सहभागी झाले होते. लोहियानगर, गंज पेठ, समता भूमी इथल्या अभ्यासिकांमधील पालकांसाठी विशेष कार्यक्रम झाले. तिळगुळ वाटपासोबत पालक समितीची गरज, मुलांच्या अभ्यासातील अडचणी यावर पालकांशी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी संवाद साधला. पालकांचे मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले.

✲ **डान्स फॉर एज्युकेशन** – प्रियदर्शनी अभ्यासिकेतील मुलांच्या अंगभूत कलांना वाव मिळावा म्हणून डान्स फॉर एज्युकेशनच्या माध्यमातून काही शैक्षणिक गाणी, नाटिका शिकवण्यात आल्या. पुण्यातील एकूण २२ केंद्राची स्पर्धा २८ फेब्रुवारीला भरत नाट्य मंदिरात झाली. प्रियदर्शनी अभ्यासिकेतील मुलांनी यात भाग घेतला.

✲ **वर्धिनी आमच्या घरी** – मार्च महिन्यापासून कोरोनाच्या निर्बंधामुळे सर्व अभ्यासिका मोबाईलच्या व्हॉटसअॅप ग्रुपच्या मदतीने सुरू होत्या. या काळात सर्व अभ्यासिका, संस्कार वर्ग यांनी विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमात अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. पालक आणि मुलांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे सर्व मुलांना विविध उपक्रम, वेगवेगळ्या स्पर्धा, गाणी, गप्पा, कुटुंब मैफील इत्यादी घरी असताना देणे शक्य झाले.

विशेष म्हणजे अभ्यासिका प्रमुखांसाठी खालील प्रेरणासत्रे ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली.

श्रीमती बागेश्री पोंक्षे – 'स्व'ची जडणघडण
श्री. निलेश धायरकर – नियोजन पूर्तता
श्री. सुरेश पवार – प्रेरणा सत्र
श्री. सुमित डोळे – संपर्क कसा असावा ?
श्री. ज्ञानेश पुरंदरे – सामाजिक कार्य व कार्यकर्ता कसा असावा ?

✲ **ऑनलाईन शिबिर** – एकूण शिबिर संख्या – ३, सहभागी संख्या – ३२५ (मुले-मुली)

कसबा नगर भागाने समर्थ रामकृष्ण व भगिनी निवेदिता शाखा यांच्या मदतीने, महात्मा फुले नगर भागाने स्वामी श्रद्धानंद व क्रांतीज्योती सावित्री शाखा यांच्या मदतीने वस्तीतील अनेक मुलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. पाककला, चित्रकला, वादन कला, व्हिडिओ तयार करणे, लेखन कौशल्य, वक्तृत्व कौशल्य, ओरिगामी अशा वेगवेगळ्या विषयांवर शिबिर झाले. मुलांनी या सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. लष्कर, भवानीनगर या भागात स्वतंत्रपणे शिबिरे झाली. शिबिराच्या माध्यमातून ४० कुटुंबापर्यंत कार्यकर्ते पोहोचले. कोरोनाच्या बंधनामुळे कंटाळलेल्या मुलांना शिबिरात विविध प्रकार शिकायला मिळाले.

✲ **अभिनंदन** – प्रियदर्शनी अभ्यासिकेतील **श्रुतिका परदेशी** हिला शाळेत वनराई पर्यावरण वाहिनीचे 'इको कॅप्टन' म्हणून बक्षीस मिळाले तसेच तिने वेगवेगळया स्पर्धांमध्ये भाग घेऊन दहा बक्षिसे मिळविली.

**✲ अभ्यासिकांची वर्षपूर्ती –** प्रियदर्शिनी अभ्यासिकेला १६ जून रोजी दोन वर्ष पूर्ण झाली. द्वितीय वर्धापन दिनानिमित्त सर्व मुलांचे, पालकांचे व अभ्यासिका प्रमुख अनुजा ताई – अनिल दादा यांचे अनुभव कथन झाले. सिद्धी गुळंबे हिने अभ्यासिकेच्या पहिल्या दिवशीच्या आठवणी मनोगतातून ताज्या केल्या. मंजुळाबाई चाळ, तळई, समता भूमी, गुरुकुल, स्वराज्य, पंचशील, काशेवाडी, हरकानगर, कुंभारवाडा, आर्यभट्ट, राजमाता जिजाऊ या अभ्यासिकांना एक वर्ष पूर्ण झाले. तेथेही ऑनलाईन पद्धतीने कार्यक्रम झाले.

**✲ साप्ताहिक ऑनलाईन अभ्यासिका –** दि. १ ऑगस्टला श्री. निलेश धायरकर यांनी ऑनलाईन अभ्यासिका उपक्रमाचे उद्घाटन केले. त्यांच्या कथाकथनाला मुलांनी उत्तम प्रतिसाद दिला. दर आठवड्याला प्रसंगानुरुप कथाकथन, वादनकला सादरीकरण, शिक्षकांच्या मुलाखती इत्यादी उपक्रम झाले. तसेच मानसिक विकास बैठकीत वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी त्यांचा कामातील प्रवास, मन व मनावरील ताबा ठेवण्याचे मार्ग, मन व बुद्धी यांचा समन्वय, आचार विचार सकारात्मकतेने करताना असे विषय मांडले.

**✲ संगीत कला वर्ग –** अभ्यासिकेतील व शाखेतील मुलांसाठी तसेच युवकांसाठी कला संगीत वर्गाची सुरुवात दि. २९ नोव्हेंबरला झाली. डिसेंबर महिन्यापासून दर रविवार होणाऱ्या वर्गाला १६ गायक–वादक कलाकार नियमित येत असतात. सध्या वर्गात प्रेरणादायी पद्यांचा सराव चालू आहे. या वर्गासाठी एक हार्मोनियम देणगी म्हणून मिळाल्याने सर्वांचा उत्साह वाढला आहे.

**✲ आपली अभ्यासिका – ई स्मार्ट अभ्यासिका –** कोरोनाच्या काळात मुलांचे ऑनलाईन शिक्षण चालू आहे. परंतु या तासांना मुलांचा प्रतिसाद कमी असतो. त्यांचा उत्साह वाढावा, ती शिक्षणापासून दूर जाऊ नयेत या हेतूने समर्थ भारत पुनर्बांधणी योजनेच्या सहकार्याने २२ अभ्यासिकांमध्ये ई–लर्निंग कीट बसवण्यात आले. संध्याकाळी इयत्ताशः आठवी ते दहावीची मुले या अभ्यासिकांचा लाभ घेत आहेत.

**✲ शैक्षणिक साहित्य वाटप –** कसबा भागातील सेवा वस्त्यांमधील इ. १ ली ते १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी सेवा सहयोग व समर्थ भारत पुनर्बांधणी योजने अंतर्गत ११०० संचांची मदत मिळाली. वस्तींमधील गरजू मुलांना याचे वाटप करण्यात आले.

**✲ किशोरी विकास कार्यशाळा –** 'स्व'–रूपवर्धिनी, सेवा सहयोग आणि समर्थ भारत पुनर्बांधणी यांच्या संयुक्त विद्यमानाने किशोरी विकास कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये मासिक पाळीबद्दल दृकश्राव्य (PPT) माध्यमातून श्रीमती गौरीताई पेंडसे यांनी मार्गदर्शन केले व प्रश्नोत्तरांची चर्चा झाली.

✲ ✲ ✲

कोरोनाकाळात समर्थ भारत पुर्नबांधणी योजनेअंतर्गत परिसरातील वस्ती विभागात खालील उपक्रम झाले.

१) **धान्य वाटप –** कसबा भागातील ५५० हून अधिक कुटुंबांना जीवनावश्यक धान्य साहित्याचा संच देण्यात आला.

२) **आरोग्य शिबिर –** १६ ठिकाणी आरोग्य शिबिरे झाली. याचा लाभ १५०० हून अधिक नागरिकांनी घेतला. सर्व शिबिरांमध्ये तपासणी झाली. आरोग्यदायी काढा व आर्सेनिक गोळ्यांचे वाटप करण्यात आले.

३) **प्लाझ्मा दान प्राथमिक तपासणी शिबिर –** जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने दोन ठिकाणी झालेल्या शिबिरांमधून ४४ नागरिकांची तपासणी झाली. दानासाठी झालेल्या समुपदेशनातून १५ नागरिकांनी प्लाझ्मा दान केले. हे शिबिर जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने घेण्यात आले.

४) **रोजगार व व्यवसाय मार्गदर्शन –** परिसरातील छोट्या व्यावसायिक नागरिकांचे सर्वेक्षण करून ८५० अर्ज

भरून घेतले. यातून रोजगार जोडणीसाठी ११७ तर आर्थिक मदतीसाठी १७ नागरिकांच्या अर्जांची विशेष दखल घेतली गेली. ५ नागरिकांना कर्ज मिळाले व ३ जणांनी नव्याने व्यवसाय सुरू केला. श्री. दिनेश नायकू यांना सामोसा तयार करण्याचे मशीन दिले व श्रीमती कमल गायकवाड यांना पिठाची गिरणी दिली गेली.

५) **दिवाळी भेट धान्य वाटप –** वस्तीतील गरजू व गरीब ५० कुटुंबांना धान्य साहित्य दिवाळी भेट म्हणून दिले.

**विश्वासाने बंधुत्वाचे नाते सर्वा सांगुया !**

लहानपणापासून विवेकानंद शाखेत येणारा हनुमान आज वर्धिनीच्या वस्ती विकास प्रकल्पात प्रकल्प समन्वयक म्हणून काम आहे. काही दिवसांपूर्वी स्वतः हनुमान, त्याची आई, आजी, वडील असे सगळं कुटुंब कोरोना पॉझिटिव्ह झालं. अशा कठीण परिस्थितीत स्वतःची काळजी घेत घरच्यांची देखभाल करत आमचा हनुमान लढत होता.

अशातच एका कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तीला प्लाझ्माची आवश्यकता आहे, हे त्याच्या कानावर आलं. आज अशा तरुणांनी प्लाझ्मा डोनेट करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे अनेक कोरोनाबाधित रुग्ण बरे होण्यास मदत होईल. हा निरोप हनुमानने वाचला आणि लगेचच प्लाझ्मा डोनेट करण्याची तयारी दाखवली. आपल्या बांधवांच्या मदतीला धावून जायचे ही वर्धिनीची शिकवण त्याने आपल्या प्रत्यक्ष वागणुकीतून दाखवून दिली. खरं तर ही गोष्ट थोडी अवघड होती परंतु काही दिवसांपूर्वी या आजाराचा अनुभव घेतला असल्याने त्यातून बरे होण्याचे महत्त्व त्याने ओळखले आणि मदतीसाठी धावून गेला.

**अभिनंदन**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेमधून –

✻ योगेश काटे ✻ वैजिनाथ साळवे ✻ निहाल रामटेके ✻ रविशंकर चव्हाण ✻ संदीप मोरे ✻ संघर्ष मेश्राम ✻ आरती मसराम यांची **मंत्रालय लिपिक पदी** निवड झाल्याबद्दल

व

✻ सुप्रिया जगताप ✻ वर्षाराणी सुतार ✻ महेश अंजनवाड ✻ अविनाश घोरपडे ✻ संतोष देशमुख यांची **पोलिस उपनिरीक्षक**पदी निवड झाल्याबद्दल

व

राज्य सेवा २०१९ परीक्षेमधून खालील विद्यार्थ्यांची अधिकारी पदासाठी निवड झाली.

✻ प्रदीप शेंडगे – गटविकास अधिकारी ✻ कावेरी कदम – कक्ष अधिकारी
✻ शुभम घुगे – कक्ष अधिकारी ✻ गणेश मंडलिक – भूमी अभिलेख उपनिबंधक
✻ अभिजित हजारे–नायब तहसीलदार ✻ समीर येनपुरे – तलाठी



व

✻ Black Lives Matter या शीर्षकांतर्गत आयोजित 'जगातील वर्णद्वेष – उत्पत्ति, समस्या आणि आव्हाने' या आंतरराष्ट्रीय वेबिनारच्या आयोजनामध्ये वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष डॉ. संजय तांबट यांनी संयोजक या नात्याने महत्वपूर्ण भूमिका बजावली.

**हार्दिक अभिनंदन.**

### विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा - फुलवू स्वप्न उद्याचे

*** अभ्यास सहल - जलविज्ञान स्पर्धा गुणगौरव समारंभ आणि टाटा हायड्रो पॉवर प्लांट, भिरा, जि. रायगड -**
जलविज्ञान स्पर्धेतील विजेते विद्यार्थी आणि काही शिक्षक यांची सहल १३ फेब्रुवारी २०२० रोजी टाटा हायड्रो पॉवर प्लांट, भिरा, जिल्हा रायगड येथे आयोजित करण्यात आली होती. पाण्यापासून कशी वीजनिर्मिती केली जाते, पाण्याचा पुनर्वापर तसेच निर्माण झालेल्या विजेचे वितरण याची माहिती गटागटाने देण्यात आली. यासाठी श्री. गणेश देशमुख मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच त्यांचे सहकारी सुनील देशमुख HR, अमेय खोत, कुणाल कुमार, शिवसाई गरुड, संजय कुमार, दिनेश शहा, गौरव रांजणे - इंजिनियर यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**जलविज्ञान स्पर्धा गुणगौरव समारंभ -** मुख्य पाहुणे श्री. विजय माइनकर आणि श्री. मिथुन चास्कर - इआरसी टाटा मोटर्स पुणे हे उपस्थित होते. श्री एम. एल. देवकर मुख्य प्रशासकीय अधिकारी टाटा विद्यालय, भिरा यांनी स्थानिक आयोजनासाठी सहकार्य केले.

**शिष्यवृत्ती -** टाटा मोटर्स पुणेच्या सी.एस.आर.विभागाच्या विद्याधनम शिष्यवृत्ती योजनेतून २३७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या २८ शाळांमधील ५१ विद्यार्थ्यांना Ideal App रोटरी क्लब, कात्रज पुणे आणि फिरती प्रयोगशाळा यांच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आले.

फिरती प्रयोगशाळा पुणे, सातारा, ठाणे जिल्ह्यातील १०० शाळातील विद्यार्थ्यांबरोबर काम करते. तपशील पुढीलप्रमाणे -

| विद्यार्थी | ८ वी | ९ वी | १० वी | एकूण |
|---|---|---|---|---|
| मुले | ४०७३ | ४५४२ | ४०९९ | १२७१४ |
| मुली | ३००८ | ३१७८ | २८२७ | ९०१३ |
| एकूण | ७०८१ | ७७२० | ६९२६ | २१७२७ |

**ध्वनी प्रश्नमंजुषा स्पर्धा -**
विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय ध्वनी वर्षाच्या अनुषंगाने ध्वनी प्रश्नमंजुषा या स्पर्धेचे आयोजन उन्हाळी सुट्टीत करण्यात आले होते. लॉकडाऊनमुळे प्रश्नावली सर्वच शाळांमध्ये पाठवणे शक्य झाले नाही. पर्यायी काही शाळात पोस्टाने तर काही शाळांतील शिक्षकांकडे व्हॉट्सॲपद्वारे प्रश्नावली पाठवण्यात आल्या. पुणे जिल्ह्यातील भोर, मुळशी, हवेली, खेड त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील खंडाळा, पाटण येथून एकूण ६४० विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रा. विनायक शुक्ल यांनी प्रश्नावली तयार करणे तसेच आदर्श उत्तरपत्रिका निश्चित करणे यासाठी मार्गदर्शन केले. परीक्षक म्हणून कार्यक्रम कुमारी ऋतुजा जगदाळे तसेच सौ. मेखला निखळ यांनी काम पहिले.

या स्पर्धेचा गुणगौरव समारंभ शनिवार दि. ३ ऑक्टोबर २०२० रोजी ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विजय रायबागकर यांनी ध्वनी विज्ञानाची शास्त्रीय माहिती व संज्ञा सोप्या भाषेत सांगितल्या. बासरीचे शास्त्र आणि प्रत्यक्ष बासरी बनवणे याचे प्रात्यक्षिकासह विषद केले.

**'जाणुया कोरोनाला, जाणुया विषाणूला, दुर ठेवू आजारांना' स्पर्धा -**
विभागाच्या वतीने दिनांक २१ जुलै ते १९ ऑगस्ट २०२० या कालावधीत व्हॉट्सॲपच्या माध्यमातून दररोज एक प्रश्न विद्यार्थ्यांना पाठवला जात होता. स्पर्धेचे स्वरूप आणि प्रश्न निश्चित करण्यामध्ये डॉ. राजेंद्र देवपूरकर,

माजी विभाग प्रमुख, सूक्ष्मजीवशास्त्र–पुणे विद्यापीठ यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील भोर, मुळशी, हवेली, खेड, पुणे शहर, सातारा जिल्ह्यातील खंडाळा, पाटण, ठाणे जिल्ह्यातील कल्याण, सांगली जिल्ह्यातील वाळवा येथून एकूण ११५४ विद्यार्थी सहभागी झाले होते. परीक्षक म्हणून कुमारी ऋतुजा जगदाळे आणि सौ. मेखला निखळ यांनी काम पहिले.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दि. १० ऑक्टोबर २०२० रोजी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला. प्रमुख पाहुणे डॉ. पंडित विद्यासागर यांनी मुलांना संशोधक वृत्ती जोपासण्यासाठी विज्ञान शिकणे आणि शोधणे गरजेचे आहे असे सांगितले. या स्पर्धेमुळे मुले मांडणी आणि प्रस्तुती करण्यास शिकली. येणाऱ्या नवीन शिक्षण धोरणाला पूरक असाच हा उपक्रम आहे. संशोधनामध्ये कल्पना सुचणे, निरीक्षण करणे, माहितीद्वारे अनुमान काढणे, विश्लेषण करणे तसेच विज्ञानात आवडीच्या विषयाबरोबर इतर विद्या शाखांचा अभ्यास असणे महत्त्वाचे आहे. नवीन पिढीने शिक्षण अवगत करणे, चौकस आणि चिकित्सक वृत्ती असणे आवश्यक आहे हे वेगवेगळ्या शास्त्रज्ञांच्या उदाहरणाद्वारे साध्या सोप्या भाषेत समजावून सांगितले. भारतीय शास्त्रज्ञांना जगभरातून मागणी आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होऊन भारताला जगभरात अव्वलस्थानी घेऊन जाण्याची संधी विद्यार्थ्यांसमोर आहे हे विषद केले. या उपक्रमावर आधारित पुस्तिका प्रकाशित करावी अशी सूचना त्यांनी केली.

**स्पर्धेविषयी काही निवडक प्रतिक्रिया –**

✻ श्री. रोहित सरोज (सी. एस. आर. प्रमुख टाटा मोटर्स, पुणे) – 'सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणीवेतून विज्ञान प्रबोधन.' : टाटा मोटर्स आपल्या सी एस आर प्रकल्प – विद्याधनमच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करत आहे. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास होणे हेही याचे एक उद्दिष्ट आहे. या हेतूने टाटा मोटर्स 'स्व'–रुपवर्धिनीच्या संयुक्ताने फिरती प्रयोगशाळाच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील सुमारे १०० शाळांपर्यंत पोहचले आहे आणि वैज्ञानिक प्रयोगातून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल रुची निर्माण करत आहे. संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. माशेलकर यांच्या मार्गदर्शनानुसार फिरती प्रयोगशाळा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. विभागाच्या वतीने 'जाणुया कोरोनाला, जाणुया विषाणूला, दुर ठेवू आजारांना' या स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा कोरोनाच्या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये कोरोनाबाबतचे ज्ञान वाढवण्यासाठी तसेच गैरसमज दूर होऊन जागरूकता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरली आहे. याविषयीची पुस्तिका वाचकांना शास्त्रीय माहिती मिळावी यासाठी उपयुक्त ठरेल या उपक्रमाला मनःपूर्वक शुभेच्छा...

✻ कु. ऋतुजा जगदाळे (परीक्षक) : सध्या सुरू असलेले कोरोनाचे सामाजिक संकट ज्या विषाणूमुळे पसरले आहे, त्या Covid-19 या विषाणूबद्दल योग्य माहिती मुलांना कळावी हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन 'स्व'–रूपवर्धिनीने यावर्षी विषाणूवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले आणि विशेष म्हणजे काळाची गरज लक्षात घेऊन आधुनिक पद्धतीने ऑनलाइनद्वारे उत्तरपत्रिकांच्या सॉफ्ट कॉपी बनवून हा उपक्रम पार पाडला.

खरंतर फेब्रुवारी–मार्च महिन्यात जेव्हा या Covid-19 विषाणूने भारतात थैमान घालायला सुरुवात केली, त्यावेळी आपल्याला या विषाणूबद्दल योग्य व अचूक माहिती मिळत नव्हती. सोशल मीडियावर, न्यूज चॅनलवर जे बघायला, वाचायला मिळेल त्यावर आपण लगेच विश्वास ठेवत होतो. लहान मुलांच्या साध्या सरळ प्रश्नांना अचूक उत्तर द्यायला आपण असमर्थ होतो आणि हेच लक्षात घेऊन या प्रश्नमंजुषा स्पर्धेची रचना झाली.

या प्रश्नावलीमधून विद्यार्थ्यांच्या मनातील कोरोना विषाणूबद्दल सर्व प्रश्नांची विज्ञानावर आधारित अचूक उत्तरे शोधायला मदत झाली. मुलांनी पुस्तक, इंटरनेट व वर्तमानपत्र अशा माध्यमांचा वापर करून प्रश्नांची उत्तरे

लिहिली आहेत. उत्तरपत्रिकेतील सादरीकरणावरून मुलांची ही प्रश्नावली सोडवण्यात उत्सुकता व रंजकता दिसून आली. काही विद्यार्थ्यांनी वर्ड डॉक्युमेंट, पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनचा वापर करून उत्तरपत्रिकेचे सादरीकरण केले. या निमित्ताने मुलांना नवीन गोष्टी शिकण्यास मदत झाली. आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांच्या मनातील कोरोनाची भीती आता सज्ञानतेने घेतली, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. संस्थेच्या उपक्रमात मी सहभागी होऊ शकले याचा मला आनंद वाटतो.

❃ सौ. उमा शिरगुरकर (शिक्षक, कॅ. र. मा. ओक हायस्कूल, कल्याण-ठाणे) – आपल्या सर्वांना माहीतच आहे Covid 19 या विषाणूने सर्व जगभर थैमान घातलं आहे आणि आपल्या संपूर्ण जीवनावर त्याचा परिणाम झाला आहे. असे असताना काळाची गरज लक्षात घेऊन 'स्व'-रूपवर्धिनीने ही आगळीवेगळी विषाणू प्रश्नमंजुषा स्पर्धा मुलांसाठी घेतली. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रश्नांची मांडणी अशी होती की या नवीन विषाणूबद्दल सर्व माहिती म्हणजे विषाणूचा आकार, विषाणूजन्य आजार, ते होऊ नयेत म्हणून घ्यावयाची काळजी इ. माहिती स्पर्धकाला मिळाली. या स्पर्धेत एकूण ३० प्रश्न विचारले गेले पण रोज फक्त एकच प्रश्न मुलांना पाठवला जाई. त्यामुळे सर्व प्रश्नांचा सखोल अभ्यास करणे मुलांना शक्य झाले. मुलांची उत्सुकता वाढतच गेली. मुलांनी आणि आम्ही निरनिराळ्या माध्यमांचा वापर करून प्रश्नांची उत्तरे शोधली.

विशेष म्हणजे या स्पर्धेचा शेवटचा प्रश्न खूप interesting होता. How will be the next battle between human and virus? यावर मुलांना स्वतः चे विचार व्यक्त करायचे होते. मुलांनीही खूप छान आणि तर्कशुद्ध आपले विचार मांडले. आजची मुले उद्याचे जबाबदार नागरिक आहेत या स्पर्धेद्वारे मिळालेली माहिती ते इतरांनाही देतील आणि अशा कोणत्याही संकटाला धैर्याने सामोरे जातील. 'स्व'-रूपवर्धिनीने या काळात राबवलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून कार्यकर्त्यांची विद्यार्थ्यांसाठीची तळमळ यातून दिसून येते.

❃ मानसी उमेश पाटोळे (इ. १० वी, विद्यार्थी), भैरवनाथ विद्यालय, दोंदेखेड, पुणे – मी 'स्व'-रूपवर्धिनी द्वारे आयोजित केलेल्या ध्वनी व विषाणू या दोन्ही स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. मी ध्वनी प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी सहावी ते दहावीपर्यंतच्या विज्ञानाच्या पुस्तकातले ध्वनीबद्दलचे धडे वाचले. ध्वनीचा वेग, ध्वनीला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी कोणते माध्यम आवश्यक आहे, तीव्रता, हे सर्व मला आधी माहिती नव्हते जेव्हा मी प्रश्नपत्रिका सोडवली तेव्हा मला हे सर्व समजले. प्रश्नपत्रिका सोडवताना मला मोबाईलची समस्या निर्माण व्हायची म्हणून मी पुस्तकांचा वापर केला. विषाणू प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी मी पुस्तकांचा व मोबाईल या दोन्हींचा वापर केला. मला यात विषाणूचा आकार, विषाणूचा संसर्ग, विषाणूचे कार्य, रचना, RNA, DNA इत्यादीबद्दल माहिती मिळाली. आणि मी उत्तरपत्रिका पोस्टाने पाठवली. त्यामुळे मला पोस्ट ऑफिसमधल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. मला असे वाटते की अशा स्पर्धांमुळे आमच्यासारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळते. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नामध्ये खूप लहान-सहान गोष्टी दडलेल्या होत्या, त्या मला शिकायला मिळाल्या. मला या सर्व अनुभवातून एक गोष्ट शिकायला मिळाली ती म्हणजे, प्रत्येक गोष्टीचा अभ्यास पूर्णपणे करणे खूप आवश्यक आहे.

❃ पूर्वा बाळाराम देशमुख (इ.९ वी) (कॅ. र. मा. ओक हायस्कूल, कल्याण-ठाणे) – विषाणू स्पर्धेचे प्रश्न मला सौ. उमा शिरगुरकर मॅडम यांनी पाठवले, त्या बाबत मी गुगल वरून या प्रश्नाचा शोध घेतला त्यामध्ये मला अधिक सविस्तर असे प्रश्न अभ्यासायला मिळाले. या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी मी वर्तमानपत्र, गुगल, दूरदर्शन या माध्यमांचा उपयोग केला. उत्तरे शोधताना मला काही अडचणी आल्या, त्यामुळे मी माझ्या वर्गशिक्षिका

सौ. उमा शिरगुरकर व विज्ञान विषयाचे शिक्षक श्री. चव्हाण सर यांच्याशी मी फोनद्वारे संपर्क साधून त्यांना काही अडचणी सांगितल्या त्यावर त्यांनीही मला योग्य प्रकारे मार्गदर्शन केले. प्रश्न व्यवस्थित समजून घेऊन त्याचा अभ्यास करून त्यांची योग्य उत्तरे लिहिण्याचा मी प्रयत्न केला.

नेहमीची स्पर्धा आणि विषाणूची स्पर्धा यामध्ये खुप मोठा फरक मला जाणवला. यामध्ये नेहमीची स्पर्धा प्रत्येक व्यक्तिगणिक वेगळी होती. यामध्ये विद्यार्थी, पालक, बालक, श्रमिक, नोकरदार यांची प्रत्येकाची स्वतःच्या वैयक्तिक समस्येसाठी स्पर्धा चालू होती, परंतु विषाणूमुळे या जगाची संपूर्ण सूत्रे बदलून गेली. यामध्ये प्रत्येकजण स्वतःच्या बचावासाठी या विषाणूपासून संरक्षण करण्यासाठी स्पर्धेत उतरला आहे. मास्क, सॅनिटाईझर, आयसोलेशन, इम्युनिटी पॉवर या शब्दांची माहिती संपूर्ण जगाला या कोरोना विषाणूमुळे झाली. या स्पर्धेत जो जिंकेल तोच या जगात टिकेल याचे भान संपूर्ण मानव जातीला या छोटया विषाणूने करून दिले. त्यावर मात करण्यासाठी देश विदेशात विविध लसींची चाचणी केली जात आहे.मी उत्तर पत्रिका संगणकाद्वारे लिहिली आहे व उत्तर पत्रिकेची PDF करून E-mail वर पाठवली.

**ध्वनी संदर्भ पुस्तिकेबाबतचे निवृत्त प्रा. विनायक शुक्ल (आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे) यांचे मनोगत–**

माणसाच्या शरीरातील प्रत्येक अवयवाच्या कामाला महत्त्व आहे. पंचेंद्रियांपैकी श्रवणेंद्रिये ऐकण्याचे काम करतात. सर्व प्रकारचा ध्वनी किंवा आवाज कानांनी ऐकला जातो. ध्वनिलहरी म्हणजे कोणत्याही गोष्टींनी उत्पन्न होणारी कंपने असतात.  हा आवाज आपण ऐकतो म्हणजे तो कानाच्या विविध छोट्या इतर भागांचे एकत्रित काम असते. यासाठी आपण कानाला खूप जपले पाहीजे. तसेच आपण बोलतो तेव्हा आपल्या घशातील स्वरयंत्र काम करत असते. याची शास्त्रीय माहिती आपल्याला या पुस्तिकेतून मिळते. मनोरंजनासाठी विविध वाद्यांचा उपयोग होतो. या वाद्यांमध्येही खूप विविधता दिसते. काही वाद्यतंतु म्हणजे तारा वापरून तर काही चामडे वापरून बनवली जातात. पण यातून निर्माण होणारा नाद मनाला आनंद देतो. यामागचे शास्त्र पुस्तिकेतून लक्षात येते. ध्वनीलहरींच्या गुणधर्मांचा उपयोग करून वेगवेगळी शास्त्रीय उपकरणे बनवली जातात. उदा. सोनार यंत्र, मायक्रोफोन, सोनोग्राफी यंत्र इत्यादी. या सर्व उपयोगी साधनांबरोबर आवाजाचा अतिरेक झाला तर आपण ध्वनीप्रदूषण झाले असे म्हणतो, ते कसे मोजतात, आरोग्याच्या दृष्टीने त्याचे प्रमाण काय असावे, याही गोष्टींची माहिती या पुस्तिकेतून मिळते.

२०२० हे वर्ष International Commission for Acoustics या विज्ञान संस्थेने आंतरराष्ट्रीय ध्वनी वर्ष म्हणून निर्धारित केले आहे. त्या अनुषंगाने ही पुस्तिका आपणा सर्वांना त्याबद्दलची शास्त्रीय माहिती व ध्वनीप्रदूषणाबाबत आपण कसे जागरूक राहायला हवे याची माहिती देते. या प्रकल्पाने तयार केलेली ही संकलन पुस्तिका विद्यार्थ्यांना निश्चित उपयुक्त आहे.

✲ ✲ ✲

**जाणुया कोरोनाला, जाणुया विषाणूला, दूर ठेवू आजारांना पुस्तिकेबाबतचे डॉ. पंडित विद्यासागर, (माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभाग प्रमुख) यांचे मनोगत –**

‘कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मार्च २०२० पासून शाळा बंद झाल्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित झाले. या कठीण काळात डगमगून न जाता अनेक शिक्षक आणि संस्थांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. या शिक्षण विषयक

कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचा शिक्षणाबरोबरचा अनुबंध कायम राहिला. 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेने राबविलेला उपक्रम असाच नाविन्यपूर्ण आहे. ही संस्था अनेक दशके विज्ञान प्रसाराचे कार्य करीत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान विषयावरील तज्ज्ञांची व्याख्याने तसेच विज्ञान विषयावरील स्पर्धांचे आयोजन करतात. विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा हा प्रकल्प राबवून ग्रामीण आणि शहरी मुलांना विज्ञानातील प्रयोग करण्याची दुर्मिळ संधी ही संस्था उपलब्ध करून देते. विज्ञान शिक्षणात प्रयोगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र साधनांच्या अभावामुळे अनेक शाळांमधील विद्यार्थी प्रयोगांपासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना विज्ञानातील संकल्पना न समजल्यामुळे त्यांच्यामध्ये विज्ञान विषयाची गोडी निर्माण होत नाही. त्यांना विज्ञान हा विषय रूक्ष आणि कठीण वाटतो. या पार्श्वभूमीवर 'स्व'-रूपवर्धिनीने दिलेल्या योगदानाला खूपच महत्त्व आहे. विज्ञान शिक्षणाचे हे कार्य कोरोनाच्या काळात सुरू ठेवण्यासाठी त्यांनी 'जाणुया कोरोनाला - जाणूया विषाणूला - दूर ठेवू आजारांना' हा अभिनव उपक्रम राबविला. या उपक्रमाची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. या उपक्रमात विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी होणार होते. रोज एक या प्रकारे तीस प्रश्न विचारण्याची योजना होती. या प्रश्नाचे थोडक्यात आणि समर्पक उत्तर लिहून ते ऑनलाईन पद्धतीने संस्थेकडे पाठवायचे होते. डॉ. राजेंद्र देवपूरकर हे सूक्ष्मजीवशास्त्र विषयातील ज्येष्ठ अभ्यासक आणि संशोधक आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविला गेल्यामुळे त्याला उंची प्राप्त झाली. या प्रश्नांमुळे कोरोना या रोगाविषयी आणि विषाणूविषयी विद्यार्थ्यांचे आकलन वाढले. शिवाय विषाणू म्हणजे काय ?, त्याची रचना, विषाणू बाधेवरील उपाय, त्यांची जनुकीय रचना, विषाणू रोगांचे प्रकार, घ्यावयाची काळजी आणि विषाणू बाधेचे सामाजिक परिणाम याचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळाले. त्यांच्या मनातील कुतूहल जागृत झाले. त्यांचा शिकण्यातील सहभाग वाढला. शिक्षण बंद असल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मनातील नैराश्य कमी झाले, त्यांना आपल्या सामाजिक दायित्वाची आणि जबाबदारीची जाणीव झाली.

'स्व'-रुपवर्धिनीचे श्री. विश्वास कुलकर्णी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा प्रकल्प नियोजनपूर्वक राबविला. प्रथम भित्तीपत्रकाच्याद्वारे शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आवाहन करुन त्यांना सहभागी केले. त्यामुळे १,१५४ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. मराठी आणि इंग्रजी भाषेतील समर्पक उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासपुर्ण योगदान दिल्याचे दर्शवितात. विद्यार्थी आणि शिक्षकांनी भरभरून दिलेला प्रतिसाद आणि उस्फुर्त सहभाग हे या प्रकल्पाच्या यशाचे गमक आहे. कोरोनाविषयी अद्यापही अनेकांना असणारी माहिती ही अपूर्ण आणि चुकीची आहे. ही पुस्तिका त्या दृष्टीने एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल. त्याचा इतर विद्यार्थी, शिक्षक आणि सामान्य नागरिकांना निश्चित फायदा होईल. पुस्तिकेची रचना ही सुटसुटीत आणि समर्पक झाली आहे. विशेषतः प्रश्नांच्या अचूक उत्तरांचा सहभाग ह्या पुस्तिकेची उपयुक्तता वाढविणार आहे. वाचक या पुस्तिकेचे निश्चित स्वागत करतील.'

❖ ❖ ❖

## स्पर्धा परीक्षा केंद्र

**राज्यसेवा – अभिरूप मुलाखत मार्गदर्शन –**

फेब्रु–मार्च २०२० मध्ये राज्य सेवा आयोगाद्वारे (MPSC) गट अ व गट ब या पदासाठी मुलाखती घेण्यात येणार होत्या. याची पूर्व तयारी म्हणून केंद्रातर्फे 'अभिरूप मुलाखती'चे (MPSC Mock) दि. २५ जानेवारी २०२० रोजी आयोजन केले. वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे माजी विद्यार्थी अधिकारी पदावर कार्यरत असलेले व वर्धिनीच्या संपर्कात असलेले तज्ज्ञ अधिकारी यांना मुलाखती घेण्यासाठी बोलविण्यात आले. श्री. रंगनाथ नाईकडे (भारतीय वन सेवा), श्री. प्रशांत सूर्यवंशी (उपनिबंधक, कृषी व पणन, पुणे), श्रीमती सीमा होळकर (उपजिल्हाधिकारी), श्री. विशाल तनपूरे (गट विकास अधिकारी भोर, पुणे), श्री. विजय गोते (सहाय्यक आयुक्त, राज्य कर, पुणे) यांनी मुलाखत घेण्यासाठी साहाय्य केले. प्रत्येक विद्यार्थ्याची मुलाखत घेऊन, प्रत्येकाशी वैयक्तिक चर्चात्मक संवाद साधून सर्वांना उत्तम मार्गदर्शन केले. मुलाखतीमध्ये कोणत्या सुधारणा हव्यात व त्या कशा कराव्यात, विद्यार्थ्यांची गुणवत्ता कुठे कमी पडली हे त्यांना सांगितले. समर्पक उत्तरे कशी द्यावीत आणि मुलाखत देताना ताणतणाव बाजूला कसा ठेवला पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले. ३२ विद्यार्थ्यांनी या सत्रासाठी नावनोंदणी केली होती. सर्व विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास जागवून शुभेच्छांसह हे सत्र संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी वैयक्तिकरीत्या चांगले अभिप्राय दिले.

**मानसिक ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळा –**

दि. १६ जानेवारी २०२० ला मानसिक ताणतणाव कसे कमी करावे यासाठी प्रसिद्ध तज्ज्ञ डॉ. आनंद गोडसे सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा पर्सिस्टंट फाऊंडेशन यांच्या माध्यमातून ओंकार सभागृहात संपन्न झाली.

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना सतत मानसिक ताणतणावांचा सामना करावा लागतो. सलग १५–१६ तास सर्व विद्यार्थी अभ्यास करत असतात. त्यामध्ये स्पर्धा परीक्षांमधून उपलब्ध होणाऱ्या अल्प जागा, स्पर्धा, निकाल इ. गोष्टींमुळे विद्यार्थ्यांच्या मनात ताणतणाव निर्माण होतात. या ताणतणावांचे कशा रीतीने व्यवस्थापन केले पाहिजे ह्याविषयी श्री. आनंद गोडसे सर यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. बोलत बोलत कृती करणे ह्याचा फायदा होतो. ज्याप्रमाणे शारीरिक आरोग्य चांगले रहावे म्हणून व्यायामाची गरज असते, त्याचप्रमाणे मानसिक व्यायामांची पण गरज असते. मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी प्रत्येकाने काही ना काही छंद जोपासला पाहिजे, स्वतःसाठी दररोज किमान १ तास दिला पाहिजे, सर्वांनी कमीतकमी ३० मिनिटे ध्यान हे केलेच पाहिजे हेही आवर्जून सांगितले.

श्री. आनंद गोडसे सर यांनी तालवाद्य व संगीत याच्या माध्यमातून ताणतणाव कसा कमी करावा त्यांचे प्रात्यक्षिक दाखवले. सर्व विद्यार्थ्यांच्या हातांमध्ये वाद्य होते. सर्वांनी प्रथमच हातात वाद्यं घेतली होती. सर सांगतील त्या पद्धतीने विद्यार्थ्यांनी वाद्यं वाजवले.

**स्नेहमेळावा –**

कै. किशाभाऊ पटवर्धन सरांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने मुंबईतील अधिकाऱ्यांचा स्नेहमेळावा दि. १ मार्च रोजी आयोजित करण्यात आला. आजपर्यंत स्पर्धा परीक्षा केंद्रामधून राज्य सेवा व केंद्र सेवा आयोग आणि इतर परीक्षांच्या माध्यमातून २८० पेक्षा जास्त अधिकाऱ्यांची निवड झाली आहे. ३० अधिकाऱ्यांचा या मेळाव्यात सहभाग होता.

कै. ज्ञानेश पुरंदरे सरांनी प्रशासकीय सेवा आणि आपले उत्तरदायित्व या विषयी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन

केले. छ. शिवाजी महाराजांचे प्रशासकीय कार्य, प्रशासन नीती, कायदा व न्याय व्यवस्था यांचे दाखले देत विषय स्पष्ट केला. सध्या Dy.SP. या पदावर कार्यरत असलेले श्री. गणेश शिंदे सर यांनी त्यांच्या कामातील काही स्मरणीय अनुभव सांगितले. किशाभाऊंचा सहवास लाभलेल्या श्री. सतीश भारतीय सरांनी किशाभाऊंचा टापटीपपणा, स्वच्छतेचा आग्रह, विजेची बचत याबद्दलच्या आठवणी जाग्या केल्या. श्री. कैलास अंडिल सरांनी कार्यक्रमाचा समारोप केला. सरांनी घनसावंगी, अंबड या भागातील जलसंधारण, गडचिरोली व भामरागड येथील कार्य अनुभव सांगितले. सध्या अंडिल सर राज्याचे आरोग्य मंत्री श्री. राजेश टोपे यांच्या बरोबर आरोग्य विभागाचे प्रमुख म्हणून काम बघत आहेत.

**२६ जुलै कारगिल विजय दिन –**

विजय दिनाच्या दिवशी ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'डोकलाम ते गलवान – चीनचे मनसुबे' या विषयावर लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर (निवृत्त) यांनी मार्गदर्शन केले. गलवान खोऱ्याच्या भागात ते स्वतः कार्यरत होते. त्यांनी तेथील भौगोलिक व सामरिक परिस्थितीची सखोल माहिती दिली. सीमा सुरक्षेच्या दृष्टीने त्याचे महत्त्व सांगितले. प्रसंगानुसार भारतीय सैनिक परिस्थिती कशी हाताळतात, प्रतिकार करताना कोणत्या योजना आखतात या त्यांनी दिलेल्या माहितीतून सैनिकांबद्दलचा आदर आणखीनच वाढला. कारगिल युद्ध व सर्जिकल स्ट्राइक यातील काही रोमांचकारी प्रसंग सरांनी सांगितले. सर्वांना स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन करताना ते म्हणाले, आपल्या देशात बनवलेल्या वस्तू आपण वापरल्याने उद्योगधंदे वाढतील व पर्यायाने देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

कोरोनाच्या निर्बंधांमुळे स्पर्धा परीक्षेचे काम ऑनलाईन पद्धतीने झाले. यामध्ये नियमित तासिका व विशेष सत्र झाली.

१) दि. १३ जून – प्राची कचरे (CO) – पुन्हा एकदा दमदार सुरुवात

२) दि. १ जुलै – प्रदीप शेंडगे Dy. CEO – प्रेरणा सत्र

३) दि. १८ जुलै – रंगनाथ नाईकडे IFS – वनसेवा मुलाखत मार्गदर्शन

४) दि. २९ जुलै – हिरालाल चौधरी RFO – वनसेवा मुलाखत मार्गदर्शन

५) दि. ६ ऑगस्ट – स्वप्नील जाधव Dy. SP/ACP – अभ्यास नियोजन

✻ ✻ ✻

**कोविड अधिकारी नव्हे कोविड योद्धे**

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन काळात सर्व अधिकाऱ्यांना देहभान हरपून समाजोपयोगी कामे करावी लागली. केंद्राचे अधिकारी पदावर असलेले माजी विद्यार्थी पण या कामात सहभागी होते. त्यांची काही मनोगते –

**✻ कर्तव्यपूर्तीचा हृद्य अनुभव – डॉ. नरेंद्र माने, नायब तहसिलदार, पालघर**

दि. ०४/०५/२०२० रोजी संध्याकाळी ६:०० वा. पालघर जिल्हातील तलासरी, डहाणू, पालघर व वसई या तालुक्यातील निवारागृहामध्ये सुमारे ३५ दिवसांपासून राहणाऱ्या एकूण १२१० राजस्थानी मजूर लोकांसाठीची विशेष रेल्वे डहाणू रेल्वे स्टेशनवरून जयपूर– राजस्थानला रवाना करण्यात आली. सुमारे ३५ दिवसांपासून महसूल व पोलीस प्रशासन त्यांची घरातील लोकांप्रमाणे देखभाल करत होते. अशा वेळी काही NGO, बऱ्याच दानशूर व्यक्तींनी स्वतः पुढे येऊन प्रशासनाला मदत केली. काही लोकांना यामध्ये नोकरी, कर्तव्य यांच्या

'मी'चं चिंतन करा. मी कुठून आलो मला कुठं जायचं आहे.
मी इथं का आहे अशा प्रश्नावर चिंतन करा. मनन करा. स्व जाणून घ्या.

पलीकडे काहीच दिसणार नाही. परंतु या मजूर लोकांना आमच्यातील कर्तव्यापलीकडील माणूस दिसला. या ३५ दिवसांच्या कालावधीमध्ये हे मजूर बांधव आणि आमच्यामध्ये एक भावनिक नाते निर्माण झाले होते. त्याचा प्रत्यय आम्हा दोघांनाही दुरावताना वेळोवेळी येत होता. सर्व लोकांनी चहा, नाश्ता, जेवण, पाणी साबण (अंघोळीला आणि कपडे धुण्यासाठी वेगळे), mosquito coils, टूथब्रश, टूथपेस्ट, बादली, मग तसेच वाचण्यासाठी हिंदी भाषेतील गीता अशी घरच्याप्रमाणे सोय करुन दिल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानले. या लोकांमधील आणि वरिष्ठ अधिकारी तसेच या लोकांसाठी रात्रदिवस सदैव सेवेत असणारे नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, तलाठी (म्हणजेच राजस्थानी लोकांचा अधिक जवळचा पटवारी), ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांचा ऋणानुबंध कायम स्मरणात राहील. संध्या. ६:०० वाजता मा. जिल्हाधिकारी पालघर यांनी रेल्वे सुरु करण्याचा इशारा केला आणि रेल्वे सुरु झाली आणि एकच जल्लोष झाला. घरी जाताना प्रत्येक राजस्थानी लोकांच्या डोळ्यामध्ये आनंदाश्रू आणि आम्हा लोकांच्या डोळ्यांमध्ये समाधानाचे आणि कृतज्ञतेचे अश्रू एकत्रितरित्या तरळले. आम्ही दोघांनीही हात उंचावून एकमेकांचा भावनिक निरोप घेतला.

✼ ✼ ✼

✼ **नक्कीच उष:काल होणार आहे.... – डॉ. योगिता ढोले,** नायब तहसीलदार, श्रीगोंदा, अहमदनगर

धुलीवंदनाच्या सुट्टीनंतर श्रीगोंद्यात कार्यालयात रुजू झाल्यावर शासनाकडून कोरोनाबाबत सूचना व आदेश येऊ लागले आणि कोरोना संकटावर उपाय म्हणून २२ मार्च पासून दैनंदिन जीवनाचा लॉकडाऊन सुरू झाला. अत्यावश्यक सेवा वगळता सर्व कामकाज बंद झाले. सगळीकडचे व्यवहार ठप्प झाले. जिथे लोकांनी दुकानदारांनी सहकार्य केले नाही तिथे सांगून काही वेळा कायद्याचा बडगा दाखवत लॉकडाऊनची अंमलबजावणी यशस्वी होण्यासाठी प्रशासन रस्त्यावर उतरले. काही दिवसांनी परिस्थिती गंभीर होऊ लागली. शहरातून आलेल्या मजूर लोकांसाठी एका शाळेत निवारा केंद्र सुरू झाले. गावातील दानशूर लोकांनी त्यांच्या जेवणाची व्यवस्था केली. आम्हाला घरी जाऊ द्या असे म्हणणाऱ्या परराज्यातील लोकांना समजावून, समुपदेशन करून त्याना केंद्रात स्थिर केले. नव्याने येणाऱ्या मजुरांची तपासणी केली. त्यांच्या लहान मुलांचे लसीकरण केले. कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्ष सुरू करण्यात आला. तालुक्यातील लोक विविध समस्यांसाठी फोन करू लागले.

आमची जेवायची सोय नाही, घरात सगळं संपलं आहे असा फोन आला की माहिती काढून त्या ठिकाणी भेट देऊन, परिस्थिती पाहून समाजातील दानशूर व्यक्तींनी, NGO यांनी तयार केलेले किट, शिधा मिळेल तसे आम्ही पोचवू लागलो. हे करताना स्वतः ला कोरोनापासून रोखण्यासाठी मास्क व शारीरिक अंतर ह्याची खबरदारी घेऊ लागलो. भेट दिल्यावर काही वेळा मन सुन्न होऊन जाई. पालात कापड, प्लास्टिकचा वापर करून उभारलेल्या छोट्याशा आडोशात कुटुंब राही.

हे पाहून रस्त्यावर कारण नसताना गाड्यांवर फिरणाऱ्या, काळ्या बाजारातुन चढ्या दरात तंबाखू, दारू घेण्याऱ्या लोकांना पाहून समाजातील विषमता आणि विरोधाभास यांनी डोळे भरून यायला लागले.

एप्रिल महिन्यात रास्त भाव दुकानातून प्रति व्यक्ती ५ किलो तांदूळ अन्न सुरक्षा यादीतील लाभार्थ्यांना मिळू लागला. हे वितरण योग्य व्हावे यासाठी सकाळी ८ पासून खेडोपाडी फिरून लक्ष ठेवायला लागलो. धान्य मिळालं तरी तेल, तिखट-मिठाची चिंता ! पण ही व्यवस्था परिपूर्ण नसली तरी आहे याबद्दल खूप समाधान

आहे. त्यात कृषी विषयक कामांना लॉकडाऊनमधून सूट मिळाली तरी बळीराजाला अडचणी होत्याच. गव्हाची कापणी यंत्रे, गुरांचे खाद्य, द्राक्ष बाजारपेठ, भाजीपाला, दूध ह्याबाबतचे प्रश्न सोडवू लागलो. आशा ताई गावात फिरून बाहेरून आलेल्या लोकांच्या हातावर Home Quarantine चा शिक्का मारून घरातच विलगीकरण करू लागल्या.

एकदा एका दुष्काळी खेड्यात किट वाटप करताना गेलो असतानाची गोष्ट. एक वृद्ध माऊली घरात एकटीच होती. मालक वारलेले, मुलगा नाही, मुलगी दूर सासरी. तिची अवस्था पाहून तिची मदत घरात नेऊन दिली. आम्ही निघताना आजीच्या डोळ्यात पाणी आले, म्हणाली, 'जीव दमतो माझा, या परिस्थितीबद्दल वाईट ही वाटतंय'. अशा अनुभवांनी आपण करत असलेल्या निरंतर श्रमाचे चीज होतं आणि उन्हाचा, कोरोनाचा त्रास विसरून परत कामाला जोर येतो. वेगवेगळ्या पातळीवर प्रशासन कामं करीत आहे. रूग्ण संख्या वाढली तर तालुकास्तरावर लक्षणांप्रमाणे mild, moderate आणि severe अशी वर्गवारी करून त्यासाठी रुग्णालय, वसतिगृह ताब्यात घेऊन कोविड केअर सेंटर व डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर उभारली.

मला वाटतं ही लढाई कोविड १९ ह्या विषाणू बरोबरची तर आहेच परंतु आपल्यातील अप्रामाणिकपणा, साठेबाजू वृत्ती, माहिती लपवून ठेवणे, चांगली परिस्थिती असताना फुकटच्या मदतीची हाव धरणे ह्या सर्व गोष्टींविरुद्ध आहे. ह्या गोष्टी कोरोनाचे संकट अजून गडद करत आहेत. हा देश माझा आहे, हा समाज-गाव-शहर माझे आहे असा भाव घेणाऱ्या आणि देणाऱ्या लोकांनी ठेवला पाहिजे. आपल्या घरात राहणं इष्ट आहे. काही दिवस संयम बाळगा, नक्कीच उषःकाल होणार आहे.

✻ ✻ ✻

**✻ मदत नव्हे कर्तव्य – श्री. कपिल बोरकर,** वनपरिक्षेत्र अधिकारी, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, ढाकणा, चिखलदरा.
सध्या कोरोनामुळे सगळ्या जगात हाहाकार माजला आहे. ह्या भयानक रोगाच्या संसर्गामुळे सगळे नागरिक त्रस्त आहेत. मग यामध्ये गरीब असो किंवा श्रीमंत ! ह्या रोगाची झळ सर्वांनाच पोहोचली आहे. निसर्ग आणि जैवविविधतेने नटलेल्या मेळघाट भागातील बरेच लोक शेतीवर आणि शेतमजुरीवर अवलंबून आहेत आणि उर्वरित लोक गावात किंवा कुठेतरी बाहेर गावी किंवा अगदी बाहेरील राज्यात पण कामासाठी जातात. शासन घोषित लॉकडाऊनमुळे सर्व कारखाने, उद्योग बंद करण्यात आले त्यामुळे मजुरी करीता बाहेर गेलेले लोक पण आता गावात पायी चालत परत येत आहेत. अशातच आमच्या ग्रुपमधील सध्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अतिदुर्गम ढाकणा वनपरिक्षेत्रात सेवा देणाऱ्या श्री. हिरालाल चौधरी सरांचा फोन येतो, 'कपिल परिस्थिती खूपच भयावह आहे, गोरगरीब मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या आदिवासी बांधवांवर उपासमारीची वेळ आली आहे. आपण फूड किट वाटुया का ?' आणि एवढे म्हणताच प्रवास सुरु झाला. माझी आणि RFO हिरालाल चौधरी सरांची ओळख तशी फेसबुकच्या माध्यमातून झालेली, पण कर्तव्यदक्ष आणि कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आम्हाला या अगोदरच झाली होती. वन विभाग आणि गांवकरी यांच्यात सरांनी उत्तम दुवा साधला आहे.

मग मी हिरालाल सरांना मेसेज केला की सर आम्ही काही गरजू लोकांना मदत करायचे ठरवले आहे तर आपण आम्हाला गाव सुचवावे की जिथे अजून मदत पोहचली नाही. लगेच सरांचा रिप्लाय आला की इकडे खरंच खूप परिस्थिती वाईट आहे आणि सर सांगत होते की काही लोक बाहेर राज्यातून पायी गावात येत आहेत. चालून चालून त्यांच्या पायाला अगदी जखमा झाल्या आहेत. काही महिला तर तान्ह्या बाळांना घेऊन

समोर आलेल्या अन्नाचा आनंदाने आणि प्रसन्न मनाने आस्वाद घ्यावा. या उलट पौष्टिक जेवणही आपण दुःखी वैतागलेल्या मनःस्थितीत घेतलं तर ते निःकृष्ट होतं. क्वचित अपायकारक होऊ शकतं.

उपाशीपोटी मैलोनमैल चालत आल्या आहेत. हे सगळे ऐकून मी ठरवलं की आता आपल्या मेळघाटातील या कुटुंबांना मदत करणे खरच खूप आवश्यक आहे. ८-१० दिवसांपूर्वीही चौधरी सरांनी आपल्या मित्रांसोबत मिळून मेळघाटातील दाभिया आणि भांडुम गावात असे किट दिलेले आहेत असे कळले. आता आमच्या पुढे आव्हान होते. ते मदत गोळा करणे पण कोरोनामुळे सगळे घरीच, त्यामुळे ठरवले की मदतीचे मेसेज तयार करायचे आणि कार्यालयातील काही लोक आणि जवळच्या काही मित्रांना पाठवायचे आणि हे सगळे सुरु झाले. या दरम्यान जेव्हा जेव्हा मला अडचण आली मी हिरालाल सरांना विचारत होतो व सर पण मला व्यवस्थित समजून सांगत होते. सांगितल्याप्रमाणे आम्हाला निदान ५० फूड किट तरी तयार करायचे होते, ज्यात निदान १५ दिवस तरी ते कुटुंब जेवले पाहिजे. सर सांगत होते की १०० किट झाले तर आपण २ गावांना मदत पोहचवू शकतो. मी म्हटले, सर मग आपण एकाच गावात १०० किट वाटूयात का म्हणजे एक छोटे गाव पूर्ण होईल. चौधरी सर मला अतिशय गंभीरतेने म्हणाले. आपली मदत अशाच गरजूंना मिळायला हवी की ज्यांना आपण आज राशन किट नाही दिले तर त्यांची लेकरं उद्या उपाशीपोटी निजतील, आता मात्र मला परिस्थितीचे गांभीर्य पुरते समजले. इकडे मदतीचा ओघ सुरु झाला होता. पाहता पाहता ५० किट तयार झाली, आणि हे सत्र सुरूच राहिले. बघता बघता १०० रेशन किट तयार झाले. नेहमी आपण ऐकतो की घरी बसल्या कुठे कामे होतात का ? पण इथे आम्ही घरात राहून चक्क १०० किटची मदत उभी केली होती, आम्हाला विश्वासच होत नव्हता, सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता आणि दिवस ठरला की १२ मे ला किट वाटपासाठी सरांनी सांगितल्याप्रमाणे बोरीखेडा आणि बोथरा ही गावं निवडली. १२ मे ला सकाळी लवकर उठून रेशन किट भरले व १०.४० ला ढाकणा वनपरिक्षेत्र कार्यालयात पोहचलो. बघतो तर काय, चौधरी सर आमची वाट बघत थांबले होते. सरांची मिटिंग असून सुद्धा त्यांनी आम्हाला वेळ उपलब्ध करून दिला होता. बोरिखेडा येथे पोचल्यावर लक्षात आले कि सरांनी आधीच सगळी व्यवस्था चोख करून ठेवली होती. गरजू लोकांची यादी तसेच त्यांच्या कार्यालयातील त्यांचे सहकारी सुद्धा मदतीला होते. आवश्यक ती खबरदारी पाळत, सोशल डिस्टन्सिंग राखत हा कार्यक्रम दोन्ही गावात अतिशय सुंदररीत्या संपन्न झाला. लोकांच्या चेहऱ्यावरील आनंद मात्र काही केल्या डोळ्यासमोरून जात नव्हता. 'जगण्याचं समाधान' की काय म्हणतात ते हेच असावं बहुतेक! कोरोनाचे हे खूप मोठे संकट आपल्या सर्वांवर ओढवले आहे. त्याला जर हरवायचे असेल तर आपण सर्वांनी एकत्र येऊन निर्धार करायला हवा. चला तर मग, 'एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ' या ऊक्तीप्रमाणे तसेच मास्क आणि शारीरिक अंतरासंबंधी जागरूकता निर्माण करुन परतीच्या प्रवासाला निघालो.आज ही कुटुंबं आणि एवढ्या भर उन्हात अनवाणी पायांनी पळणारी ती लेकरं आपण दिलेल्या ह्या छोट्याशा मदतीने निदान पुढचे काही दिवस तरी पोटभर जेवून झोपतील ही कल्पनाच मुळात खूप आनंद देणारी, आत्म्याला सुखावणारी, नवी उमेद व ऊर्जा देणारी ठरली. ह्या उपक्रमामध्ये ज्यांनी तन-मन-धन अर्पण करून मदत केली त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

✻ ✻ ✻

**✻ कवठेमहांकाळ नगरपंचायतीचे मुख्याधिकारी – डॉ. संतोष मोरे**

त्यांच्या मार्गदर्शनाखाली कवठेमहांकाळमध्ये नगरपंचायतीने कोविड १९ च्या अनुषंगाने केलेली कामे.

✻ संपूर्ण शहरात, वर्दळीच्या ठिकाणी जंतुनाशक औषध फवारणी.

✻ स्वत: मुख्याधिकारी MD डॉक्टर असल्याने स्वच्छतेकडे आणि स्वच्छता कर्मचारी वर्गाकडे वैयक्तिक लक्ष देतात.

✻ जीवनोपयोगी वस्तूंचा मार्गदर्शक नियमांनुसार सुरळीतपणे पुरवठा केला. गरजू व मजूर वर्गातील नागरिकांना अन्नधान्य किटचे वाटप झाले. यासाठी त्यांनी स्वतः आर्थिक मदत केली. गावातील दानशूर व्यक्तींना या मदत कार्यात जोडले.
✻ मुख्याधिकारी रोज त्यांच्या टीमबरोबर शहरात फिरून परिस्थितीची पाहणी करतात.
✻ नागरिकांच्या तसेच तहसीलदार, पोलीस निरीक्षक व प्रशासन यांच्या सहकार्याने हा कोविडचा लढा आपण जिंकू याची त्यांना खात्री आहे.

✻ ✻ ✻

**✻ प्रा. गणेश लेंगरे यांच्या कार्याची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड लंडनकडून दखल**

केंद्राचे माजी विद्यार्थी प्रा. गणेश लेंगरे, उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर येथे कार्यरत आहेत. प्रा. लेंगरे यांनी महानगरपालिका अंतर्गत जुना विडी घरकुल नागरी आरोग्य केंद्र येथे कोविड पेशंट कॉन्टॅक्ट ट्रेसिंगचे महत्त्वपूर्ण कार्य केले. तसेच त्यांनी गरजू लोकांना भाजीपाल्याचे मोफत वाटप व पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना 'श्यामची आई' या संस्कारक्षम पुस्तकाचे मोफत वाटप केले.
परप्रांतीयांना मास्क, पाणी बॉटल, टोप्या, किराणा माल व सॅनिटायझर तसेच शहरातील मुक्या जनावरांना मोफत चारा वाटप केले. या कामाची दखल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड लंडनने घेऊन त्यांना **स्टार २०२०** हा बहुमान देऊन सन्मानित केले आहे.

✻ ✻ ✻

स्पर्धा परीक्षा केंद्राच्या अभ्यासिकेचा श्री. प्रविण राठोड विद्यार्थी. अधिकारी झाल्यावर समाजोपयोगी कामे करायची आहेतच पण त्याचा पूर्वानुभव निश्चित आनंददायी आहे या विचाराने त्याने त्याच्या गावात केलेले विशेष काम...

**तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला...**

अभ्यासिका बंद झाल्यावर पुण्याहून धुळ्याला आलो. वडील गेल्यानंतर (२०१४) प्रथमच गावी आलो. गाव अगदी तसंच. तीच लोक आणि त्याच समस्या. खरंतर अशा वातातवरणात आपण फारच नकारात्मक होतो पण MPSC ने संयम शिकवला. विचार केला की काही दिवस गावात आहोत तर गावाला आपला काही फायदा व्हायला हवा. समस्या अनेक आहेत पण त्यातील अत्यंत निकडीची समस्या होती पिण्याच्या पाण्याची. सुदैवाने धरण जवळ असल्याने पाण्याचा भरपूर साठा आहे. पण योग्य नियोजना अभावी गावकरी वंचित राहत होते. यावर काम करण्याचा इरादा पक्का केला. जाऊन सरपंच, ग्रामसेवक यांना भेटलो, त्यांच्याकडून माहिती घेतली, अडचणी समजून घेतल्या. सन २००५ साली नळाद्वारे पाणी पुरवठा योजना पूर्ण झाली होती. पण वीजजोडणी साठी स्वतंत्र DP नसल्याने घोडे अडले होते. त्या DP साठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी मा. खासदार उन्मेष पाटील यांना निवेदन सादर केलं होतं. ग्रामसेवकांना सोबत घेऊन खासदार साहेबांचं ऑफिस गाठलं. भेटीत त्यांना प्रश्न व्यवस्थित समजावून सांगितला. माझ्या बोलण्यातील तळमळ त्यांच्या लक्षात आली. त्यांनीही त्याची अडचण सांगितली की, 'कोरोनामुळे खासदार विकासनिधी आरोग्यसेवेकडे वळविण्यात आला आहे. तरी मी १००% प्रयत्न करतो.' ती भेट खूप सकारात्मक झाली. पुढच्या आठवड्यातच धरणाच्या शेजारी आमच्या गावात स्वतंत्र जोडणी उपलब्ध झाली होती. कष्टाला फळ मिळाले. आता पुढची १०-१२ वर्ष तरी गावाला पाण्यासाठी वणवण करावी लागणार नाही याचं समाधान खूप मोठं आहे.'

**एवढं सुंदर विश्व निर्माण करणारा तो विधाता आपलं अस्तित्वही जाणवू देत नाही; अदृश्यच राहतो !
अशा वेळी आपल्या कर्तृत्वाचा, अहंकाराचा किती टेंबा मिरवायचा याचा विचार आपण केला पाहिजे.**

## पालावरची शाळा

कोरोनामुळे पुणे सोडून घरी धुळ्यात आलो. काही दिवसांनी म्हटलं गावी आजोळी यावं म्हणून गाव गाठलं. कोविड–१९ मुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. याची सर्वाधिक झळ भटक्या विमुक्त जातींना बसत होती. आजपर्यंत जी सरकारी झळ वाडवडिलांना बसत होती ती आता त्यांच्या मुलाबाळांना बसत होती. बंजारा तांड्यात ज्या मुलाची आई १०० रुपये रोजंदारीवर दुसऱ्याच्या शेतात कामाला जाते व ज्यांच्या पिढ्यान्पिढ्या ऊसतोडणी कामगार म्हणून खपल्या अशा मुलांकडे ''स्मार्टफोन येणार तरी कुठून?'' सरकारने आणलेल्या ऑनलाईन शिक्षणापासून गरीब विद्यार्थी वंचित रहात होते, त्यामुळे हे ऑनलाईन शिक्षण गरीब विद्यार्थ्यांना शापच ठरत होते. अशा परिस्थितीत तांड्यावरील विद्यार्थ्यांची नाळ ''शिक्षणापासून'' तुटत होती हे पाहून मन व्यथित झाले. म्हणून मित्रांची बैठक घेतली. नंतर मुख्याध्यापकांना जाऊन भेटलो. त्यांना कळकळीने विषय समजून सांगितले. त्यांनीही केंद्र प्रमुखांसोबत बोलणी केली व हताशपणे म्हणाले की या संदर्भात आम्ही तहसील कार्यालय गाठून त्यांना निवेदन सादर केले. काही दिवस वाट पाहिली नंतर स्मरणपत्र सादर केलं पण काहीही होत नव्हतं. शेवटी माझी 'स्व'–रूपवर्धिनी डोळ्यासमोर प्रेरणा म्हणून उभी होतीच. कै. किशाभाऊंचे प्रयत्न ऐकून होतो. त्याची प्रेरणा घेऊन मी विद्यार्थ्यांना जाऊन भेटलो. मुलांशी गप्पा मारणं, त्यांना जाऊन भेटणं, खेळ शिकवणं हे सगळं सुरू केलं आणि मुलं रमायला लागली आणि रोज संध्याकाळी अभ्यासाला जमायला लागली.

* * *

## – यशोगाथा –

**निश्चयाचा महामेरू –** वरील शीर्षक सार्थ ठरवणारे **श्री. अविनाश रंगनाथ घोरपडे** यांची (PSI) पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पोलीस या पदावर यशस्वी निवड झाली. केवळ जिद्दीच्या जोरावर असाध्यचे साध्य करून दाखवणारं निव्वळ अचाट व्यक्तिमत्त्व.

त्याचं मूळ गाव पुणे जिल्ह्यातील, शिरूर तालुक्यातील तांदळी. घरात आई, वडील व आजी अस छोटंसं कुटुंब. आई अंगणवाडी मदतनीस आणि वडील व आजी शेतमजूर म्हणून काम करणारे. त्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नातून केवळ घरखर्चच भागवता येण्यासारखी एकंदर परिस्थिती होती. परंतु शिक्षणाचे महत्त्व ओळखून या माऊलींनी अक्षरशः पोटाला चिमटे काढून वेळ पडेल तेव्हा उसने पैसे, कर्ज घेऊन त्यांचे पदवी पर्यंतचे शिक्षण केले.

कधी शेणखत भरायचे काम असो किंवा कधी ऊस लागवड तर कधी कांदे लागवड, त्यांनीसुध्दा आपल्या आईवडिलांच्या कष्टास कृतज्ञ राहून अगदी लहान वयापासूनच त्यांच्या मोलमजुरीत कोणतीही लाज न बाळगता मदत केली. कष्ट, जिद्द, कृतज्ञता व कोणत्याही चांगल्या गोष्टींची लाज न बाळगणे, हे बाळकडू त्यांना त्यांच्या घरातूनच मिळाले. या कठोर परिश्रमातून त्यांनी E & TC शाखेतून अभियांत्रिकीची पदवी मिळवली. घरची आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी एका महाविद्यालयात व्याख्याता (lecturer) म्हणून काम करायला सुरुवात केली. सलग तीन वर्षे हे काम करताना सर्व काही सुरळीत चालले होते, आर्थिक प्रश्नाचा गुंता सुटत होता, मात्र त्यांचे त्याच कामात मन रमत नव्हते.

या वाटचालीत त्यांना अनेक चांगले वाईट अनुभव आले होते. त्यामुळे समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी होण्याचे त्यांनी ठरवले. २०१६ मध्ये आपली व्याख्याता पदाची नोकरी सोडून दिली आणि त्याच वर्षापासून अभ्यासाला सुरुवात केली.

आता पुढे तर खरी गंमत होती, हाती असलेली नोकरी सोडून पुन्हा अभ्यास करावा लागणार होता. घरातील

आर्थिक परिस्थिती पुन्हा तिचा मूळ अवतार धारण करणार होती. ज्यासाठी हे धनुष्य हाती घेतले होते, तोच समाज पुन्हा सुशिक्षित बेरोजगार म्हणून हिणवणार होता. परंतु हार न मानता ते पुन्हा विद्यार्थीदशेत आले. आलेल्या संकटावर मात करण्यासाठी, हाती घेतलेल्या धनुष्याबरोबर सोबतीला होता जुना भाता. त्या भात्यात होती कष्ट, चिकाटी, सातत्य, कृतज्ञता नावाची शस्त्रं.

तयारीसाठी पुण्यात आल्यानंतर 'स्व'-रुपवर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या शिष्यवृत्ती बॅचला त्यांना प्रवेश मिळाला. कालांतराने अभ्यासिकेत संस्थेच्या कमवा व शिका योजनेंतर्गत अभ्यासिका समन्वयक म्हणूनही त्यांना संधी मिळाली. त्यातून महिन्याच्या पुस्तकांची व तसेच इतर खर्चाची गरज भागू लागली.

२०१६ साली पहिल्याच प्रयत्नात PSI पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षेला पास होऊनही काही गुणांनी मुलाखतीची संधी हुकली. पुढच्या वर्षी २०१७ साली पुन्हा PSI मुख्य परीक्षा देऊन गेल्या वर्षाची परत एकदा पुनरावृत्ती झाली. नक्कीच काही तरी चुकत असणार असे म्हणत त्यांनी आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात केली, certain darkness is needed to see the stars- या ओशोच्या उक्तीनुसार आलेल्या निराशेला आशेमध्ये परिवर्तित करण्यासाठी पुन्हा एकदा अविनाश सर तयार झाले आणि २०१८ साली PSI पूर्व व मुख्य परीक्षेत २०० पैकी १२५ गुणांनी पास होत शारीरिक चाचणी व मुलाखतीची संधी मिळवली.

या परीक्षेबरोबर नियतीने पण त्यांची कठोर परीक्षा घेतली. शारीरिक चाचणी अगदीच दीड ते दोन महिन्यावर आली होती. एका रात्री नेहमीप्रमाणे घरी जात असताना सरांच्या सायकलला एका अज्ञात चार चाकी वाहनाने मागून जोराची धडक दिली. डाव्या हाताच्या मनगटाला गंभीर जखम होऊन ते मोडले होते. त्याचे ऑपरेशन करावे लागले. डॉक्टरांनी किमान तीन महिने सक्तीची विश्रांती घ्यायला लावली त्याशिवाय पुन्हा डावा हात पूर्वीसारखा होणार नाही म्हणून सांगितलं.

सरांच्या सहकाऱ्यांनी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. पुढच्या वेळेस पुन्हा प्रयत्न कर म्हणून सांगितले. मात्र आत्ता नाही तर परत कधीच नाही म्हणत सरांनी सर्व शक्तीनिशी याही परिस्थितीशी दोन हात करण्याचे ठरवले.

डावा हात जपत जपत, शरीराची योग्य काळजी घेत त्यांनी सरावाला सुरुवात केली. हळूहळू योग्य आहार, विश्रांती आणि तयारीच्या जोरावर पुन्हा एकदा सरावात रंगत येऊ लागली. जखमी, मोडलेल्या डाव्या हाताने ८ पूलअप्स काढायचे होते हळूहळू तेही जमू लागले. यात जास्तीत जास्त गुण मिळवणे महत्वाचे व गरजेचे होते कारण तेच गुण अंतिम क्षणी निर्णायक ठरणार होते. तयारी करून घेणाऱ्या सरांना त्यांच्या जिद्दीचे नवल वाटत होते.

शेवटी शारीरिक चाचणी व मुलाखतीची तारीख जाहीर झाली ९ जानेवारी २०२०. एकाच दिवशी दोन्ही चाचण्या होणार होत्या. पहाटे शारीरिक व नंतर लगेच मुलाखत होती. सरांनी त्यादिवशी असीम साहस आणि धैर्याचे प्रदर्शन घडवून शारिरीक चाचणीत १०० पैकी सुमारे ९५ गुण मिळवले आणि मुलाखत सुद्धा चांगली झाली. अंदाजे दोन महिन्याने १७ मार्च २०२० रोजी दुपारी अडीच वाजता आयोगाचा निकाल जाहीर झाला आणि त्यांची PSI, पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पदी यशस्वी निवड झाल्याची गोड वार्ता मिळाली. अविनाश सरांसोबतच त्यांचे आईवडिल, बहिण व दाजींनी, 'स्व'-रूपवर्धिनीने घेतलेल्या कष्टाचे फळ आज मिळाले.

**- शब्दांकन :**

**दिपक वारे** (अभ्यासिका समन्वयक)

**आत्मविश्वासाचे फळ –**

मी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील बेलसर गावची. १० वी पर्यंतचं माझं शिक्षण गावातच झालं. त्यानंतर १२ वीला सासवड आणि मुधोजी कॉलेज, फलटणमधून B.A. B.ed, M.A. पर्यंत शिकले. शिकत असतानाच लग्न झाले. घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण पूर्ण केले. आयुष्यात काही प्रसंग माणसाला पूर्ण निराश करतात. असेच माझेही झाले. मी सासर सोडून कायमची माहेरी आले. या कठीण काळात माझ्या आई–वडिलांनी, भावंडांनी खूप चांगली साथ दिली.

त्यांच्या प्रोत्साहनाने मी स्पर्धा परीक्षेचा मार्ग निवडला आणि २०१४ ला पुण्यात आले. 'स्व'–रुपवर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राची, शिष्यवृत्ती वर्गाची माहिती मिळाली होती. वर्गाची परीक्षा दिली, निवड झाली आणि माझा अभ्यास सुरू झाला. रोजच्या मार्गदर्शनातून अभ्यासाचा आवाका किती मोठा आहे ते समजले. PSI पदाची परीक्षा हेच ध्येय ठरवून अभ्यासाचे नियोजन आखले. काही वेळा भूतकाळातील आठवणी मला परत मागे नेत, अशा वेळी मनीषा ताई, वर्गातील मित्र–मैत्रिणी यांचा आधार मला परत मूळपदावर आणे. २०१७ च्या पूर्व परीक्षेला वेळेचं नियोजन नीट न झाल्याने अपयश आले. पण मनाने हार मानली नव्हती आणि मोठ्या चिकाटीने २०१८ ची पूर्व परीक्षा मी पास झाले. पहिला टप्पा पूर्ण केला. पुढचा टप्पा खरंतर खूप अवघड. पण मेहनतीवर खूप विश्वास होता. अभ्यासाचे योग्य नियोजन करून आयोगाच्या मागील प्रश्नांचं स्वरूप समजून घेऊन अभ्यासाला लागले. या कष्टाचे उत्तम चीज झाले. २०१८ ची मुख्य परीक्षा ९७ गुण मिळवून मी पास झाले. सगळ्यांनाच खूप आनंद झाला.

तिसरा टप्पा फिजिकल आणि मुलाखत हा बाकी होता. मैदानावरील सराव अवघड गेला कारण मैदानाशी कमी संबंध. पण मनाला बजावत होते, मी शेतकऱ्याची काटक आणि कणखर मुलगी आहे. ही परीक्षा हरायची नाही. एक दिवस मैदानावर सराव करताना पायाला दुखापत झाली आणि तीन महिन्यांसाठी मैदानावरील सराव बंद झाला. या हाती आलेल्या वेळेमध्ये सकारात्मकतेने मुलाखतीचा कसून अभ्यास केला. श्री. उमेश कुदळे सरांनी मुलाखतीची चांगली तयारी करून घेतली. तीन महिन्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने मैदान सुरू केले. दुखऱ्या पायाकडे दुर्लक्ष करून सराव चालूच ठेवला. आमच्या बॅचचे सुदैव की दुर्दैव, या दोन्ही परीक्षा १६ जानेवारी २०२० ला झाल्या.

मैदानात सरावाला मिळालेला वेळ, 'स्व'–रुपवर्धिनीत मुलाखतींसाठी झालेले वैयक्तिक मार्गदर्शन यांचा मला खूप फायदा झाला आणि १ मार्च २०२० ला मला माझ्या कष्टाचे फळ मिळालं. मी OBC गटात २१३ गुण मिळवून महाराष्ट्रात ५ वी आले. या दिवसाने सगळ्यांच्या डोळ्यात आंनदाश्रू उभे राहिले. या परीक्षेतून, अभ्यासातून माझे विशेष शिक्षण झाले. मला वाटतं, स्वतःवरील विश्वास, अभ्यासाचे योग्य नियोजन, सातत्य, जिद्द, चिकाटी व संयम या गोष्टींमुळे यश तुम्हाला कधीच हुलकावणी देणार नाही.

**– सुप्रिया शिवाजी जगताप**

❖ ❖ ❖



**कोणतीही गोष्ट, सूचना किंवा तक्रारसुद्धा योग्य ठिकाणी, योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने सांगणे हेच कार्याच्या हिताचे असते.**

समुपदेशन ही काळाची गरज आहे. त्यामुळे समुपदेशन विभागांतर्गत शैक्षणिक, व्यावसायिक, वैयक्तिक, सामाजिक व मानसिक अशा गोष्टींवर वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले.

**उपक्रम –** ✻ बुद्धी गुणांक चाचणी – ४३० विद्यार्थी
✻ प्रशिक्षण कार्यशाळा – ५० स्वयंसेवक
✻ करिअर समुपदेशन – १२७
✻ युवा वैयक्तिक समुपदेशन – ८० युवा
✻ पालक समुपदेशन – २०० हून अधिक कुटुंब
✻ अभ्यास कौशल्ये सत्र – ३ महिने दैनंदिन.

**युवक–युवती उपक्रम –**

कोरोनाच्या काळात कार्यकर्त्यांशी मोबाईलद्वारे संभाषण कौशल्य, काम करताना येणारे प्रश्न, करिअर मार्गदर्शन, करिअर कसे निवडावे याबाबत मार्गदर्शन केले.

जून आणि ऑगस्ट महिन्यात सातत्याने १० वी १२ वी गटावर अभ्यासकौशल्य, वेळापत्रक, आहाराचे महत्त्व, एकाग्रता असे विषय मांडले.

व्याख्याने – श्री. अरविंद केळकर सरांनी 'संवाद आणि संपर्क कौशल्य' हा विषय मांडला. संघटनात्मक कामात यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्यातील, तोंडी संवाद, शाब्दिक संप्रेषण, विक्री कौशल्ये, वाटाघाटी, समस्या सोडवणे, ठामपणाने निर्णय घेणे अशी वैशिष्ट्ये सांगितली.

श्रीमती लताताई टिळेकर–पुरंदरे यांनी 'ऑनलाईन परीक्षा एक संधी' हा विषय मांडला. परीक्षा म्हणजे स्वतःचे मूल्यांकन करायला पाहिजे. कोरोनामुळे मिळालेल्या वेळेकडे उत्तम संधी म्हणून बघितले पाहिजे.

निबंध लेखन स्पर्धा – मला जीवनात काय व्हायचं ? या विषयावर निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली.

कार्यशाळा – 'स्व'ची जाणीव, मैत्री, प्रेम, आकर्षण.

**पालक गट/महिला गट उपक्रम –**

या गटासाठी विविध व्याख्याने झाली.

डॉ. अनघाताई लवळेकर – महिलांचा विकास, संधी आणि समस्या

महिलांना कोणत्या क्षेत्रात संधी आहेत हे सांगितले. महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही वयात शिकायला लाजू नये, शिकणं थांबवू नये, तिसरं म्हणजे आपण जे शिकलो ते इतरांना शिकवणे, अशा प्रकारे मार्गदर्शन केले.

डॉ. अरुणाताई कौलगुड – लॉकडाऊननंतर कामाचे नियोजन कसे करावे ?

त्यात out of box कसा विचार करावा, स्वत:चा आदर, सादरीकरण, मांडणी हे उत्तम आले पाहिजे असे सांगितले.

चा आदर, सादरीकरण, मांडणी हे उत्तम आले पाहिजे असे सांगितले.

सौ. हर्षा जैन – स्त्रियांचे आरोग्य आणि व्यायाम

डॉ. मनीषा नारकर – आहार आणि दिनचर्या

सौ दिपाली थोरात – मुलांचे ऑनलाईन शिक्षण आणि पालक

पालकांचा मुलांवरचा विश्वास खूप महत्त्वाचा आहे. पालकांनी चिकाटीने, सातत्याने मुलांसाठी सजग राहावे, मुलांना वेळ द्यावा असे सांगितले.

श्रीमती बागेश्री पोंक्षे – मनाचा आरसा

'कोणत्याही गोष्टीची उत्साहाने सुरुवात करायला हवी आणि ठरवलेल्या ध्येयासाठी मनापासून प्रयत्न करून कोणाची वाट न बघता पुढे जात राहिले पाहिजे' असे सांगितले.

**ऑनलाईन शिबिर –**

अगस्त्य फौंडेशन आयोजित शिबिरात ग्रामीण भागातील ३५ शिक्षक सहभागी होते. सौ. मेघा नगरे यांनी ‘बदलत्या काळात शिक्षकांची भूमिका व मुलांना समजून घेताना’ या विषयाची मांडणी केली.

संयम प्रकल्प – सौ. विमलाबाई गरवारे हायस्कूलमध्ये २२ दिवस कार्यशाळा झाली.

**पालकांचा अभिप्राय**

✲ खूप खूप आभारी आहोत सगळ्यांचे ज्यांनी ज्यांनी या गटात पालकांना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व माहिती दिली, फोन करून संबंधित विद्यार्थ्यांची विचारपूस केली. खूप खूप धन्यवाद – श्री. पल्ले.

✲ तुमच्या मार्गदर्शनातून ‘आम्हा पालकांना मुलांच्या नकाराला सकाराकडे कसे वळवू शकतो’ हे समजले. – श्री. धोत्रे

❖ ❖ ❖

**कष्ट आणि समर्पणाची कहाणी**

समुपदेशन करण्यास आलेला गोपाळ (नाव बदललेलं आहे) त्याच्यामधली जिद्ध पाहून मी अवाक झाले. त्याला १२ वी नंतरचे शिक्षण कोणत्या क्षेत्रात करावे, हे समजत नव्हते.

सुरुवातीच्या संवादातून त्याची दिनचर्या व घरचे सर्व चित्र मला समजले.

गोपाळ सहावीत असताना आईने दोन्ही मुलांना घेऊन व्यसनी वडिलांचे घर सोडले. त्यानंतर आजीच्या घरी काही दिवस राहिलो. अचानक सर्व जवाबदारी आईवर आली. पण आई अजिबात खचली नाही, चार घरची कामे शोधली आणि नव्याने संसार सुरु केला. फक्त आईवर खूप जबाबदारी असल्याने तिचा वेळ आम्हा भावंडांना कमी मिळाला. आईला मदत व्हावी म्हणून घरची कामे आम्ही वाटून घेतली. एकदा शाळेत आलेल्या कार्यकर्त्यांनी वर्धिनीची माहिती सांगितली. घरीपण संपर्क झाला. ७ वी पासून वर्धिनीच्या शाखेत येतोय. माझ्याबरोबर धाकटा भाऊसुद्धा.

मी रोज पहाटे ४.०० उठून पेपर टाकायला जातो. त्याचे मला १७०० रुपये मिळतात, त्यातले मी १००० रुपये आईला देतो आणि ७०० बस पाससाठी वापरतो. १० वी मध्ये मला ७८% मिळाले, मला शासनाकडून शिष्यवृत्तीचे १५,००० रुपये मिळाले. मग काय लगेच विचार केला, ‘आई दहा घरची कामे करते, तिला गाडी घ्यावी.’ मला मिळालेले पैसे आईला गाडी घ्यायला दिले, आता आईचा थोडा चालण्याचा त्रास कमी झाला. आईला आम्ही खूप मोठे झालेले बघायचे आहे. त्यात वर्धिनीसारख्या संस्थेची आम्हाला साथ मिळाली. समंजस गोपाळ महिन्यातून एकदा वडिलांना बघायला जातो.

गोपाळचे हे सर्व ऐकून डोळ्यातून पाणी यायचे राहिले होते. पण स्वतःला सावरत.. त्याची पाठ थोपटली. मला त्याचा खूप अभिमान वाटला. कधी कधी आपण खूप छोट्या छोट्या तक्रारी घेऊन बसतो... पण गोपाळ आणि त्याची आई यांच्यासारखी मंडळी आपल्याला खूप काही शिकवून जातात.

## पाकोळी बालवाडी – पुणे, भेकराईनगर

बालवाडीत होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांतून मुलांना संस्कारित केले जाते, असे काही उपक्रम.

**सहल –** डिसेंबर महिन्यात सगळ्यांनाच सहलीचे वेध लागतात. छोट्या गटाची सहल २० डिसेंबर २०१९ ला शाहू उद्यानात तर मधल्या व मोठ्या गटाची सहल २१ डिसेंबरला संभाजी उद्यानात गेली. मुलांच्या सहलीच्या वेळा दुपारच्या असल्याने सर्व मुलांनी सगळ्या खेळण्यांचा मनसोक्त आनंद घेतला. सहलीच्या गाड्या सजवण्यासाठी पालकांची नेहमीच मदत होते. यावर्षी संभाजी बागेतील मत्स्यालयातील रंगीत मासे बघताना मुले दंग झाली होती. इतर वेळेला असे मासे बघायला मिळत नाहीत. त्यांचा आकार, रंग, चपलता अशा गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या. बागेतील सर्व खेळण्यांवर खेळून, ओल्या भेळीचा, उकडलेल्या कणसांचा स्वाद घेऊन दुपारी ४ वाजता सर्वजण वर्धिनीत परत आले.

**संक्रांत उत्सव –**

दि. २४ जानेवारी २०२० ला वार्षिक उत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात उत्साहाने साजरा झाला.

अस्मि फाऊंडेशनच्या संचालिका सौ. वैशाली व्यवहारे प्रमुख पाहुण्या व सामाजिक कार्यकर्ते श्री. आनंद तुपे अध्यक्ष म्हणून कार्यक्रमास उपस्थित होते. सौ. वैशालीताईंनी पालकांशी उत्तम संवाद साधला तर श्री. तुपे सरांनी **वर्धिनीच्या विविध उपक्रमातून व्यक्ती घडवण्याच्या प्रयत्नाचे मोल खूप मोठे असून अशा कामाची सध्या जास्त गरज असल्याचे सांगितले.**

'देशभक्ती' या विषयावर आधारित विविध गाणी बालचमूंनी सादर केली. कार्यक्रमाची सुरुवात 'सत्यम शिवम सुंदरा...' या प्रार्थना गीताने झाली. त्यानंतर आपण एकीने राहू, देशासाठी बलिदान करू. राष्ट्रध्वजाची शान वाढवू अशा आशयाची 'देश मेरे देश तेरा कितना प्यारा नाम है..', 'नन्हा मुन्ना राही हूँ..', 'जिंकू किंवा मरू..', 'आओ बच्चो तुम्हे दिखाए..' 'उठा राष्ट्रवीर हो..', 'सुनो गौर से दुनिया वालो..', 'मेरे देश की धरती..' व 'हम बच्चे हिंदुस्थान के' ही गाणी सादर झाली. मुलांच्या सादरीकरणाला पालकांनी टाळ्यांच्या गजरात व 'भारतमाता की जय' अशा उत्स्फूर्त प्रतिसादाने रंगत आणली.

सर्व गटातील पालकांसाठी रांगोळी रेखाटन व पाककला या स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी पालकांचे या कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देऊन कौतुक केले.

**चित्रकला स्पर्धा –**

सर्व गटातील मुलांसाठी 'गुरुकुल' संस्था दरवर्षी चित्र रंगवण्याची स्पर्धा आयोजित करते. स्पर्धा ६ जानेवारीला वर्धिनीच्या ओंकार सभागृहात झाली. उत्तम सहभागाचा पाकोळी बालवाडीला पुरस्कार मिळाला व मोठ्या गटातील चार मुलांना बक्षीस मिळाले.

**प्रजासत्ताक दिन –**

वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या सौ. त्रिगुणाईत ताई झेंडावंदनासाठी उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते वार्षिक कार्यवृत्ताचे प्रकाशन झाले. मनोगत व्यक्त करताना त्या म्हणाल्या, ''एकत्र कुटुंबात राहणारी मी वर्धिनीच्या सहवासाने, संस्काराने शिवणवर्ग, फॅशन डिझायनिंग शिकून महिलांसाठी प्रशिक्षण देणारी तसेच मुलांच्या शिक्षणाला, व्यक्तिमत्त्व विकसनाला प्राधान्य देणारी शिक्षण संस्था सुरू करू शकले. मिळालेल्या प्रत्येक संधीचा लाभ घेत मी काम करत आहे तसे तुम्हीपण करत रहा.''

२८ जानेवारीला गणेश जयंती निमित्त मोठ्या गटातील मुलांनी शाहू उद्यानाजवळील शिवाजी गणपती सार्वजनिक

ऋग्वेदातील कोणतीही ऋचा घ्या, तिच्यामध्ये व्यक्तिगत लाभासाठी प्रार्थना केलेली नाही.
त्यातील प्रत्येक प्रार्थना आमच्यासाठी आहे. 'माझ्या'साठी नाही.

मंडळात अथर्वशीर्ष पठण केले.
३० जानेवारीला म. गांधीजींची पुण्यतिथी स्वच्छता अभियानाने साजरी झाली. मुलांनी वर्गाची, वर्गासमोरील व्हरांड्यांची स्वच्छता केली.
३१ जानेवारीला छोट्या गटातील मुलांचे बोरनहाण झाले. मोठ्या व मधल्या गटातील मुलांनी या मुलांसाठी हलव्याचे मुकुट तयार केले. सर्वांनी याचा खूप आनंद लुटला.

**कोरोना काळातील बालवाडी :**

वर्धिनीच्या इतर विभागांप्रमाणे बालवाडी विभागाने देखील लॉकडाऊनच्या काळात विविध उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. विद्यार्थी बालवाडीत येऊ शकत नसतील तरीही वर्धिनीची बालवाडी प्रत्येक मुलाच्या घरी सुरू आहे. यासाठी बालवाडी शिक्षिका तंत्रज्ञानाचा आधार घेऊन आपल्या मुलांशी संवाद साधून त्यांच्यापर्यंत रंगकाम, कागदी वस्तू बनविणे, गाणी, गोष्टी, चित्र काढणे, चिकट काम इ. उपक्रम पोचवत आहेत. त्यानुसार आपण केलेल्या उपक्रमांचे फोटो, व्हिडीओ मुलं आपल्या बाईंना पाठवतात. रोज घरात 'शाळा शाळा' हा खेळ खूप वेळा मुलं खेळतात. गाणी, श्लोक म्हणतात, अभ्यास करतात. मुले आपल्या बाईंचा फोन कधी येईल आतुरतेने वाट पाहतात, असे अनेक मुलांच्या पालकाकडून समजते. यातून मुलांच्या आणि शिक्षिकाच्या नात्यातला जिव्हाळा या काळातही तसाच टिकून आहे याची पावती मिळाली.

**ऑनलाईन शिबिर –** बालवाडीचे ऑनलाईन शिबीर ही कल्पना शिक्षकांनी प्रत्यक्षात कृतीत आणली ती हा कोरोनाचा कृपाप्रसाद म्हणून. वाईटातून चांगलं घडलं हे मात्र खरं. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात बालवाडी बंद करावी लागली पण व्हॉटस्‌ॲपच्या माध्यमातून ती सुरूही होती घराघरांत. या संपर्काने मोठ्या गटाला शिबिराचा निरोप सहजतेने मिळाला.
आणि पालकांच्या सहकार्याने दि. २८ मे ते ३१ मे  दिवसभर चार वेळा वेगवेगळे विषय घेऊन हे शिबीर चांगल्या प्रतिसादात झाले. सुट्टीत जरा उशिराने उठणारी मुलं सकाळी ८ वाजता व्यायामाचा व्हिडिओ बघून व्यायामासाठी उठू लागली. त्यांच्या बरोबर घरातील छोटी भावंडेही सामील होत होती. त्यानंतर ११ वाजता कृतीसत्रात ओरिगामी, जीवन व्यवहार हे विषय झाले. यात कागदाची फुले, गुच्छ, कुत्रा, पंखा बनवणे, कोशिंबीर बनवणे, सरबत बनवणे, मास्क बनवणे अंकांपासून चित्र काढणे हे व्हिडिओ मार्फत शिकवले. दुपारी ४ वाजता अभिनय गीत, बडबडगीते यांचे सादरीकरण झाले. मुलांची नवीन शिकवलेली गाणीपण पाठ झाली. संध्याकाळी ७ वाजता पुष्पाताई, अनघा ताई, छाया ताई, ज्ञानेश पुरंदरे सर यांनी मुलांना वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या. पालकांनी या गोष्टी मुलांकडून करून घेतल्या आणि त्यांचे फोटो पाठवून उत्तम प्रतिसाद दिला.

**नवीन वर्षाला सुरुवात –** एप्रिल महिन्यापासून ऑनलाईन बालवाडी (मधला गट, मोठा गट) सुरू झाली. पण सुरुवातीला ही संकल्पना जरा अवघडच वाटत होती. अभ्यासक्रमातील पाठ घेताना साहित्याची कमतरता भासत होती. पण हळूहळू दर शनिवारच्या बैठकीत यावर चर्चा होऊन एकमेकांच्या कल्पना लक्षात घेऊन घरच्या साहित्यातून पाठ घेणे सोपे जाऊ लागले. लॉकडाऊनमुळे सौ. संगीता तावरे भेकराईनगरच्या शिक्षिका ग्रामीण भागात अडकल्या. पण त्यांनी गावातील दिनचर्या, मुलांना व्हिडिओमार्फत दाखवली.
कोरोनाच्या बंधनामुळे जून महिन्यात सुरू होणारी बालवाडी नवीन तंत्रज्ञानाच्या (व्हॉट्सॲपच्या) साहाय्याने सुरू झाली आहे. पालकांशी फोनवरूनचा संपर्क सतत चालू राहिल्याने हे शक्य झाले. दररोज विषयानुसार शिक्षिका व्हिडिओ करून पाठवतात व त्याप्रमाणे मुले घरी कृती करून त्याचा फोटो किंवा व्हिडिओ गटावर

पाठवतात.

आषाढ महिन्यातील **दीप अमावस्येला** अक्षता ताईंनी दिव्याची पूजा करून मुलांना गोष्ट सांगितली. याप्रमाणे मुलांनी पण घरी दिव्याचे पूजन केले आणि शुभंकरोती म्हटली.

**नागपंचमीला** मोनाली ताईंनी पाटावर मातीचे छोटे वारूळ व नाग बनवले. त्याची पूजा करून नागोबाची गाणी व गोष्टी मुलांना सांगितल्या. श्रावणी शुक्रवारची गोष्ट अनघा ताईंनी सांगितली.

**१५ ऑगस्टला** घरा-घरात झेंडावंदन झाले.

सप्टेंबर महिन्यापासून नियोजनपूर्वक वेगवेगळ्या पाठांचा अभ्यास सुरू झाला. बालवाडीतील मुले पालकांच्या मदतीने ताईंनी पाठवलेले व्हिडिओ बघून सर्व उपक्रम पूर्ण करत आहेत. पालकही उत्साहाने यात सहभागी होत आहेत.

राणी ताईंनी रांगोळी सोडणे, मनीषाताईंनी पक्ष्यांची ओळख व परिचय, मोनाली ताईंनी काकडी सोलणे व भौमितिक आकाराची ओळख, राजश्रीताईंनी वेगवेगळ्या आकारावर पिस्त्याच्या साली लावणे, पुष्पाताईंनी फळभाज्यांचा परिचय अशा विविध विषयांवर व्हिडिओ करून पालक गटावर पाठवले. या व्हिडिओचे मुलांना खूप आकर्षण वाटते. ते मनापासून व्हिडिओची वाट बघत असतात. याशिवाय गाणी, गोष्टी, श्लोक मुलांना ऐकवले जातात. सततच्या वापराने, ऐकण्याने त्यांचे पाठांतरही चांगले होत आहे.

**गणपती उत्सवात** राणी ताईंनी गणपती अथर्वशीर्ष, गणपतीची गाणी व गोष्टी मुलांना सांगितल्या.

भाजी निवडणे, केर काढणे, छोट्या कपड्यांच्या घड्या घालणे अशा कामात मुले आईला मदत करतात. यामुळे मुलं घरात रमतात. काही पालकांनी मुलांचे चित्रीकरण (व्हिडिओ) करून पाठवले. त्यात वेदांतने रंगांचा व चवींचा परिचय करून दिला, हिनाने स्वतःच्या नावावर व शाळेच्या नावावर शेंगदाणे आकाराप्रमाणे व्यवस्थित लावले.

५ सप्टेंबर **शिक्षक दिना**निमित्त पालकांच्या मदतीने मुलांनी घरी काही पाठ घेतले. ओवीने भातुकलीच्या भांड्यांचा परिचय करून दिला.

२६ सप्टेंबरला **ऑनलाईन पालकसभा** झाली (उपस्थिती ६०). पालकांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना सर्व शिक्षिकांचे कौतुक केले आणि मुलांना प्रत्यक्ष शाळेत जाण्याची शिक्षिकांना भेटण्याची ओढ लागल्याचे सांगितले.

नोव्हेंबर महिन्यात अभिनय गीत, कोलाज काम, प्राण्यांचा मराठी व इंग्रजीतून परिचय, पाळीव प्राणी, जंगली प्राणी, A to Z ही अक्षरे, रेषांचा अभ्यास, बडबड गीते इ. विषयावर शिक्षिकांनी चित्रफिती (व्हिडिओ) करून पालक गटावर पाठवले. याला प्रतिसाद म्हणून पालकांनी मुलांच्या चित्रफिती (व्हिडिओ) करून पाठवल्या. यात सोहाने माशाच्या चित्रावर कोलाज काम केले तर उर्मिला, भार्गवीनी एक व अनेक ही संकल्पना वस्तूंमधून दाखवली, श्रेयस सकटने A to Z आद्याक्षरे म्हटली.

**दिवाळीसाठी** आकाशकंदील बनवण्याचे व्हिडिओ गटावर पाठवले. रांगोळीत रंग भरणे, आकाशकंदील करणे, वसुबारसेला गाईची पूजा करणे अशी मुलांची छायाचित्रे (फोटो) पालकांनी गटावर पाठवली. घरोघरी तुळशी विवाहाच्या कार्यक्रमात मुलांनी उत्साहाने भाग घेतला. पालकांच्या व मुलांच्या प्रतिसादाने शिक्षिकांचा उत्साह वाढत आहे.

**अभिप्राय :**

नमस्कार. मी वेदांतची मम्मी, सौ. वर्षा मंगेश साखरे. या कोरोनाच्या काळात ऑनलाईन शिक्षण घ्यावे लागेल याची कल्पना नव्हती. 'स्व'-रूपवर्धिनी पाकोळी शाळेमार्फत पालक ग्रुपवर आपल्या शिक्षका मुलांसाठी नवनवीन उपक्रम पाठवतात. आता शाळा चालू नाही परंतु मुलांचा अभ्यास झाला पाहिजे असे सर्वांना मनापासून वाटते. त्यातून त्यांची तळमळ देखील लक्षात येते. आपण पालकांनीही त्यासाठी एक पाऊल पुढे टाकावे. ज्या पद्धतीने आपल्या शिक्षिका ग्रुपवरती मुलां-मुलीकरिता नवनवीन अभ्यासक्रम पाठवतात, त्या पद्धतीने पालकांनीही आपल्या पाल्याकडून अभ्यास पूर्ण करून घेतला पाहिजे. अभ्यास घेतल्यानंतर मुले देखील आनंदी असतात. त्यांच्यात प्रगती होताना दिसते. 'स्व'-रूपवर्धिनी पाकोळी बालवाडीच्या समस्त शिक्षक वर्गाचे मनापासून आभार.

**अशी रंगली बालवाडी**

कोरोनाचा शिरकाव झाला
लॉकडाऊनचा काळ सुरू झाला
शाळा पडल्या ओस
सुट्टी मिळाली भरघोस ।।
नव्याची ती नवलाई संपली
मुलांना शाळेची ओढ लागली
सुरू झाले ऑनलाईन शिबिर
मुलांना झाला आनंद भरपूर ।।
पाहून आपल्या बाईंना
आनंद गगनात मावेना
व्यायाम केल्याशिवाय
मुलांनाही राहवेना ।।
कोशिंबिर झाली तयार झटपट
कपडेही बसले कपाटात पटपट
बिया बसल्या आकारावर हसत
हातात आले थंडगार लिंबू सरबत ।।
घडी कामात बनले कुत्रा आणि होडी
वर्तमानपत्रापासून सजली फुलांची परडी
हाताचे झाले मोर, अंगठ्याची झाली कोंबडी ।।
शिवाजीच्या गोष्टी ऐकून मन झाले तंदुरुस्त
पुष्पाताईंचे बोलणे ऐकण्यात सगळे झाले व्यस्त
असे आमुचे शिबिर खूप झाले मस्त, खूप झाले मस्त ।।

**- सौ. मोनाली यंदे**

❖ ❖ ❖



केवळ बौद्धिक श्रद्धा माणसाला शेळपट बनवते; तर अंतःकरणापासूनची श्रद्धा त्याला निर्भय बनवते.

**रुग्ण सहाय्यक वर्ग –**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्हॉटस्‌ॲपमुळे रोजचा संपर्क सुलभ झाला आहे. रोज सरावासाठी सर्व विषयांवर शिक्षिका प्रश्न पाठवत आहेत. मुलींच्या शंकांचे निरसन करत आहेत.

**⁕ प्रशस्तीपत्रक वितरण –** यावर्षी रुग्ण सहाय्यक वर्गाची (२०१९–२०, पुणे–माले) अंतिम परीक्षा व्हॉट्सॲपच्या मदतीने घेण्यात आली. विद्यार्थिनींनी घरी पेपर लिहून ते शिक्षकांना फोनवर पाठवले. प्रॅक्टिकलची परीक्षा व्हिडिओ कॉलवरून झाली. नियोजित तारखेला या सर्व उत्तरपत्रिका ऑनलाईन पद्धतीने एकत्र केल्या. या वर्गाचा प्रशस्तीपत्रक वितरण दि. ११ नोव्हेंबरला डॉ. देवधर, श्री. केदार परांजपे व हिंगणे स्त्री संस्थेच्या नर्सिंग कॉलेजच्या प्राध्यापिका सौ. उज्ज्वला जाधव यांच्या उपस्थितीत पार पडला. वर्गाच्या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून घेतलेले शिक्षण कोरोनाच्या काळात खूप उपयोगी पडल्याचे सांगितले. डॉ. देवधरांनी आपल्या कामाशी नेहमी प्रामाणिक राहून ममतेने काम करा, ही सेवा तुम्हाला कायम आशिर्वाद देत राहील असे सांगितले. सौ. उज्ज्वलाताईंच्या भाषणातून मुलींना नर्सिंग विषयातील पुढील शिक्षणाची माहिती मिळाली.

**⁕ नवीन वर्गाची सुरुवात –** कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे २०२०–२१ चा नवीन वर्ग सप्टेंबर महिन्यात सुरू झाला. १० वी, १२ वीच्या निकालानंतर प्रवेशासाठी चौकशी सुरू झाली आणि ऑनलाईन पद्धतीने दि. १४ सप्टेंबर वर्गाचे उद्‌घाटन झाले. या कार्यक्रमाला के.ई.एम. परिचारिका महाविद्यालयाच्या प्राध्यापिका सौ. नेहाताई दिवे व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्कील डेव्हलपमेंट विभागाचे समन्वयक श्री. धीरज सिंग सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सर्व कार्यक्रम गुगल मीटद्वारे घेण्यात आले. यात वर्धिनीच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या युवक कार्यकर्त्यांची खूप मदत झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्गाच्या शिक्षिका कु. अतिषाताई भोसले, पाहुण्यांचा परिचय सौ. लता सत्तूर, प्रास्ताविक श्री. शिरिष पटवर्धन सर आणि आभार प्रदर्शन श्रीमती पुष्पाताई नडे यांनी केले. वर्गाचे माजी विद्यार्थी सौ. विद्या चंदनशिवे, श्री. भास्कर साखरे व कु. सुवर्णा हिलम यांची मनोगते सादर झाली. या सर्व उपक्रमांतून नवीन मुलींना वर्धिनीची व अभ्यासक्रमाची उत्तम ओळख झाली. सौ. नेहाताई मुलींना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, ''कोणत्याही रुग्णालयाची ओळख तिथे मिळणाऱ्या चांगल्या पद्धतीच्या उपचारांमुळे होते. इथे काम करणारी परिचारिका ही रुग्णालयाचे हृदय किंवा कणा असते. प्रत्येक क्षणाचे महत्त्व जाणून वेळेवर दिलेली सेवा खूप मोलाची असते. आपला अभ्यास मनापासून रस घेऊन करा, खोलवर माहिती घ्यायची सवय लावा. परदेशात सध्या परिचारिका रुग्णालय सांभाळतात त्याप्रमाणे आपल्यालाही सखोल अभ्यास करून काम करता आले पाहिजे, नित्य नवीन वापरण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग करता आला पाहिजे.''

**⁕ विशेष व्याख्यान –** दि. ६ नोव्हेंबरला श्री. सुनिल कुलकर्णी सरांनी (PPT) दृकश्राव्य माध्यमातून (गुगल मीटद्वारे) कोविड–१९ ची सविस्तर माहिती सांगितली. रोग प्रसार करणारे जिवाणू, विषाणू यातील फरक, त्यामुळे होणारे रोग (Co-कोरोना, vi- व्हायरस, d- डिसीझ, 19 - वर्ष) याप्रमाणे कोविड–१९ शब्दाचा अर्थ, कोविडची लक्षणे, त्याचा शरीरात प्रवेश झाल्यावर तो कसा कार्यरत होतो, तो रोग होऊ नये म्हणून घेण्याची खबरदारी याबद्दलची माहिती सर्वांना मिळाली.

दि. २ डिसेंबरला 'जागतिक एड्स दिना'निमित्त के. ई. एम. हॉस्पिटल नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या सौ. नेहाताई दिवे यांचे दृकश्राव्य माध्यमातून (गुगल मीटद्वारे) व्याख्यान झाले. त्यांनी खूप सोप्या भाषेत सर्व शास्त्रीय माहिती

सांगितली. सध्याच्या संशोधनानुसार मधुमेहाप्रमाणे HIV रोगातही Type 1 व Type 2 असे प्रकार आहेत व त्यातील फरक हे सर्वांना नव्यानेच माहीत झाले. दि. १० डिसेंबरला वर्गाची पहिली पालकसभा झाली. सर्व पालक उपस्थित होते. त्यांना 'स्व'–रूपवर्धिनीची माहिती तसेच वर्गाचे नियम, आणि दि. ७ व ८ डिसेंबरला झालेल्या चाचणी परीक्षेचा निकाल सांगितला. पालकांच्या शंकांचे निरसन शिक्षकांनी केले. तसेच यापुढील वर्गाच्या अन्य उपक्रमांसाठी दवाखान्यातील प्रत्यक्ष कामासाठी (प्रॅक्टिकलसाठी) सहकार्य करू, पाल्यांना प्रोत्साहन देऊ असे पालकांनी सांगितले.

**यशोगाथा**

आत्मविश्वास जागा झाला...

**विमल कुडले** एका मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी. आईवडिलांनी मोठ्या थाटामाटात तिचे लग्न लावून दिले. गंगाधाम सोसायटीत नवीन घरात ती रहात होती. लग्नाला अडीच वर्षे झाली असताना तिच्या पतीचे अपघाती निधन झाले. पदरी दहा महिन्याची मुलगी, सासू–सासऱ्यांचे छत्र नाही. नवीन घराचे हप्ते थकलेले. अशा परिस्थितीत मनावर ताण येऊन तिचा आत्मविश्वास नाहीसा झाला. आईवडिलांनी आधार दिला पण तिच्यात काही फरक पडेना. वर्धिनीतील रुग्ण सहाय्यक वर्गातल्या माजी विद्यार्थिनींनी तिच्या आईला या वर्गाची माहिती सांगितली आणि दहावी पास झालेल्या विमलने आई वडील मागे लागतात म्हणून वर्गाला प्रवेश घेतला. वर्धिनीतल्या वातावरणाने शिक्षकांच्या समुपदेशनाने तिच्यात खूप फरक पडला. के.ई.एम. हॉस्पिटलमधील प्रात्यक्षिक सुरू झाल्यावर रुग्णांची सेवा करताना तिला वेगळाच आनंद मिळू लागला. आपल्या दुःखापेक्षाही या जगात अजूनही दुःखी कष्टी माणसं आहेत हे बघून तिची मानसिक स्थिती खूपच सावरली. नवीन लोकांच्या संपर्काने, मैत्रिणींच्या सहवासाने, आत्मविश्वास जागा झाला आणि चांगल्या गुणांनी तिचा वर्ग पूर्ण झाला. सध्या विमल संजीवन हॉस्पिटलमध्ये काम करते. या कामातूनच घराचे हप्ते फेडत आहे आणि मुलीलाही पुढे शिकवत आहे. नोकरीमुळे तिच्या राहणीमानात कमालीचा बदल झाला. नर्स म्हणून काम करताना आत्मसन्मान वाढला. या सर्वांचे श्रेय ती वर्धिनीच्या रुग्ण सहाय्यक वर्गाला देते.

**आम्ही बी घडलो, तुम्ही बी घडाना !**

**विद्या चंदनशिवे** २०१८–१९ च्या वर्गाची माजी विद्यार्थिनी. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने हॉटेलमध्ये शेफचे काम करत करत चार जणांचं कुटुंब सांभाळताना धावपळ करत होती. तिच्या नणंदेकडून अभ्यासक्रमाची माहिती मिळाली. पहिले ३ महिने नोकरी व घर सांभाळून वर्गाला येत होती. पण के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्ष काम सुरू झाल्यावर तिची तारेवरची कसरत सुरू झाली. त्यामुळे नोकरी सोडावी लागली. अनेक अडचणींना तोंड देत वर्ग जिद्दीने पूर्ण केला आणि उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली. लगेचच नोकरीही मिळाली. सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कोविड केंद्रातील अतिक्षता विभागात ज्येष्ठ परिचारिका म्हणून काम करत आहे. त्यांना सेवा देताना वर्धिनीत झालेल्या उपक्रमांतून मिळालेले संस्कार खूप उपयोगी पडतात आणि याचे श्रेय ती सर्व शिक्षिका आणि वर्धिनीला देते.

**✻ प्रेरणा शिबिर –**

बालवाडी सुरू होण्यापूर्वी जून महिन्यात शिक्षकांचे प्रेरणा शिबिर होते. यावर्षी लॉकडाऊन मुळे गुगल मीट द्वारे झालेल्या २२ जून ते २७ जून या सहा दिवसांच्या शिबिरात इतर विभागातील महिला कार्यकर्त्यापण सहभागी झाल्या होत्या.

यातील विशेष सत्र –

✻ श्री. रामभाऊ डिंबळे सर शिबिराच्या उद्‌घाटन सत्रात म्हणाले, 'वर्धिनी ही संस्था नसून संघटना आहे. हे लक्षात ठेवून काम करा. संघटनेच्या कामात आत्मीयता असते. प्रत्येक कामाचं यश किंवा अपयश हे सगळ्यांचं असतं. कै. किशाभाऊंची तळमळ या कामात, या वास्तूत मुरली आहे. ती आपल्या प्रत्येकाच्या कामातून दिसते, त्यात अजून वाढ व्हायला हवी. आपण सर्वजण किशाभाऊंचे प्रतिनिधी म्हणून काम करत आहोत.'

✻ सौ. साधनाताई सेठिया ताईंनी 'सकारात्मक दृष्टिकोन' जपण्यासाठी प्रत्येकाचे आरोग्य चांगले असले पाहिजे हे दैनंदिन उदाहरणातून हसत–खेळत सांगितले. HEALTH या शब्दाची फोड करून H- Hunger, E- Exercise, A- Attitude, L- Laughter, T-Thanks (कृतज्ञता) H- Happiness, या शब्दांच्या सहाय्याने आपले आरोग्य कसे चांगले राखता येईल हा विचार मांडला. कोरोनाचा प्रतिकार करण्यासाठी आहार–विहार व व्यायाम या गोष्टींचे महत्त्व सगळ्यांच्याच लक्षात आले आहे.

✻ योगाचे शास्त्रीय महत्त्व स्पष्ट करताना सौ जान्हवीताई भंडारी म्हणाल्या, योग म्हणजे शरीराचे संतुलन साधणे, आत्मा आणि परमात्मा यांना जोडणे होय. ताईंनी स्त्रियांच्या जीवनातील वयात येणे, गर्भारपण आणि रजोनिवृत्ति या तीन टप्प्यात योगासनांचा होणारा फायदा सांगितला आणि सर्वांच्या शंकांचे निरसन केले.

✻ सौ. स्वातीताई गाडगीळ यांनी 'कल्पनेतील नाविन्य' हा विषय स्पष्ट करताना बागकामासाठी अंड्यांच्या कागदी ट्रेचा वापर, आयत्या वेळचा मास्क बनवण्यासाठी कागदाचे घडी काम, बोटांचे व्यायाम होण्यासाठी कवड्या किंवा सागर गोटे यांचे खेळ इत्यादी नवीन कल्पना सुचवल्या. मुलांकडून कल्पकतेने नवीन उपक्रम किंवा साधने करून घेताना त्या कल्पना वास्तवाच्या पायावर उभ्या असल्या पाहिजेत हा त्यांचा विचार सगळ्यांनाच भावला.

✻ लॉकडाऊनच्या काळात घरातील उपलब्ध साधनांचा वापर करून सौ कुंदाताई नडे यांनी काचेच्या बाटलीवर शाडूची माती वापरून सिरॅमिक पेंटींग करण्यास शिकवले व सौ वसुधा वडके यांनी प्लास्टिकच्या बाटलीचा पाऊच, पुठ्ठ्याचे मोबाईल स्टँड या वस्तू तयार करून दाखवल्या.

✻ कै. ज्ञानेश पुरंदरे सरांनी त्यांनी भेट दिलेल्या काही सामाजिक संस्थांची दृकश्राव्य (ppt) माध्यमातून माहिती सांगितली. जम्मू काश्मीरमधील दृष्टी संस्था, चंदीगड मधील सेवा भारती हे पाळणाघर, दिल्लीमधील सेवाधाम निवासी विद्यालय अशा अनेक संस्थांचे काम ऐकताना सामाजिक प्रश्नांमुळे होणाऱ्या विविध कामांची ओळख झाली.

✻ शिबिराचा समारोप श्रीमती बागेश्री ताई पोंक्षे यांनी केला. सर्व सत्रांचा आढावा घेऊन त्या म्हणाल्या, 'वर्धिनीत आल्यावर इथल्या सर्व उपक्रमांमुळे मनाचे आणि विचारांचे शुद्धीकरण होते. त्यातून नवीन ऊर्जा मिळते आणि काम चांगल्या प्रतीचे होते. यासाठी अशा शिबिरांचा अवश्य फायदा घेतला पाहिजे.'

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| २२-६-२०२० | श्री. रामभाऊ डिंबळे | उद्घाटन |
| | सौ. साधना सेठिया | सकारात्मक दृष्टिकोन |
| २३-६-२०२० | श्री. निलेश धायरकर | अनुभव कथन |
| | श्री. ज्ञानेश पुरंदरे | भारत प्रवासामधील अनुभव |
| २४-६-२०२० | सौ. चैत्राली रहाळकर | विद्यार्थ्यांची भावनिकता जपताना |
| | डॉ. लीना बावडेकर | प्रतिकारशक्ती कशी वाढवावी |
| २५-६-२०२० | श्रीमती पुष्पा नडे | मानसिक स्वास्थ्य आणि अध्यात्म |
| २६-६-२०२० | सौ. स्वाती गाडगीळ | कल्पनेतील नाविन्य |
| | सौ. कुंदा नडे | क्राफ्ट |
| | सौ. वसुधा वडके | क्राफ्ट |
| २७-६-२०२० | सौ. प्राजक्ता कोळपकर | अनुभव कथन |
| | श्रीमती बागेश्री पोंक्षे | समारोप |

**कार्यवृत्त लेखन - कार्यशाळा -** आपण विविध उपक्रम करीत असतो. परंतु आपणापैकी बरेचजण आपल्या उपक्रमाचे शब्दांकन करीत नाहीत किंवा त्याचे शब्दांकन कसे करावे हेच त्यांना माहीत नसते. त्याच्या नोंदी आणि मांडणी करण्यास ते मागे पडतात. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नोंदी करण्याची आणि मांडणी पद्धत माहीत नसते. त्यासाठीच दि. ७ नोव्हेंबर या दिवशी महिला विभागासाठी कार्यवृत्त लेखन कार्यशाळा घेण्यात आली. हा उपक्रम वेगळा नाही. कधीतरी कोणीतरी हा उपक्रम घेतला असेलच पण ह्या उपक्रमातील आनंद वेगळा असतो हे आम्हाला अनुभवायला मिळाले. सौ. मंजूषा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा घेण्यात आली. ह्या कार्यशाळेला शिवणवर्गातील, परिचारिका वर्गातील, बालवाडीच्या शिक्षिका उपस्थित होत्या. कार्यवृत्तासाठी लेखन करताना तो भूतकाळातच लिहायला हवा. सकारात्मक दृष्टिकोन हवा. समाजाविषयीची समरसता आपल्या कार्यवृत्तातून जाणवली पाहिजे. आपले काम लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. पाहुण्यांचा विशेष परिचय ह्याच्या कायम नोंदी हव्यात. उपक्रम कधी कोठे झाला, पाहुणे कोण होते, हे महत्त्वाचे मुद्दे मांडले गेले पाहिजेत. आपण केलेल्या उपक्रमांचा अहवाल लिहून ठेवला तर भविष्यकाळात आपल्याला पुन्हा उपयोगी पडेल व आपण सातत्याने नवीन उपक्रम करत राहू.

**बचतगट - जागर स्त्री शक्तीचा, बचतगटातील व्यवसायाचा -**दि. ३१ ऑक्टोबरला बचतगटातील व्यावसायिक महिलांचे (गुगल मीटद्वारा) एकत्रीकरण झाले. यात महिला विभागाच्या ३५ कार्यकर्त्या सहभागी झाल्या. सुरुवातीला धनलक्ष्मी स्वयंसहायता समूहाच्या सुजाता कुदळे, सुरेखा माळी, मीरा शिंदे व रत्नमाला पेडणेकर यांनी सुरू केलेल्या 'सुरूची फुड' व्यवसायाची माहिती सांगितली. १६ वर्षांपूर्वी 'स्व'-रूपवर्धिनीत प्रकल्पासाठी या महिला एकत्र आल्या. बचतगटाच्या साहाय्याने काही छोटे छोटे व्यवसायही त्यांनी अनुभवले आणि कोरोना काळात नोकरी गेल्याने परत व्यवसायास त्यांनी सुरुवात केली. घरगुती पिठाची गिरणी घेऊन तयार पिठे विकायचा व्यवसायास सप्टेंबर २०२० पासून सुरुवात झाली. दिवाळीच्या दिवसात त्यांनी फराळाचे पदार्थ करून विक्री केली. मार्केट यार्डमध्ये फिरून कच्चा माल आणणे, व्यापाऱ्यांशी ओळख करून घेणे, माल तयार करून मागणीप्रमाणे पोहोचवणे, जाहिरात करणे या सगळ्या आवश्यक गोष्टी चौघीजणी मिळून करतात.

विशेष म्हणजे ह्या धंद्यासाठी लागणारे भांडवल त्यांच्या मुलींनी उभे केले. आईच्या ह्या नव्या धडपडीला मजबूत हातांची साथ मिळाली. त्यांच्या या मनोगतातून आपणही अशी धडपड करू शकतो असा आत्मविश्वास दुणावला.

यानंतर सुनिता नरवणे, मधुमती कुपस्थ, यास्मिन शेख, शकिला शेख, अनिता ढमाले, संगीता गायकवाड, कल्पना पंडित या महिलांनी त्यांच्या व्यवसायाची माहिती सांगितली.

समारोप करताना बागेश्रीताई पोंक्षे म्हणाल्या, '' 'सुरूची फुड' यातील महिलांनी व इतरांनीही उराशी बाळगलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरवले आहे. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन. खरं तर महिलांनी एकत्र येऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे खूप अवघड आहे. पण संधी एकदाच दिसते त्याचा त्यांनी लाभ घेतला आणि समाजातील गरजांचा विचार करून व्यवसाय सुरू केला. यातून आपण सर्वांनी प्रेरणा घेऊन पुढे जाऊयात. आपल्या व्यवसायावर आपल्या मुलाप्रमाणे प्रेम करा. कारण तो तुम्ही निर्माण केला आहात. व्यवसायातून पैसा मिळतो, तयार होतो तो तुमच्यासाठी तसेच राष्ट्रासाठीही उपयोगी असतो. हा बदलाचा गोवर्धन परिचयातील, समविचारी महिलांच्या साथीने उचलूयात.''

**बचत गट –** मार्च अखेरीस बचत गटांची संख्या ४५. २०१९-२० या वर्षात बचतगटातून व्यवसाय, औषधोपचार, शैक्षणिक खर्च इ. साठी महिलांनी कर्ज घेतले. रु. २७ लाख कर्ज वाटप झाले तर सर्व गटांची बचत रु. ४० लाख झाली. कोरोनाच्या काळात गटाच्या बैठका झाल्या नाहीत पण या महिलांशी सतत फोनवरून संपर्क होत असे. शाखेतील युवा कार्यकर्त्यांच्या मदतीने बचतगटातील महिलांना अन्नधान्य संच वाटण्यात आले.

**शिवण वर्ग –** वर्धिनीच्या इमारतीत व सदाशिव पेठेत चालणाऱ्या बेसिक व फॅशन डिझायनिंग दोन्ही वर्गाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. कोरोना काळात महिलांना विविध प्रकारचे मास्क बनवणे व इतर कपडे मोबाईलवरून ऑनलाईन पद्धतीने शिकवण्यात आले. मास्क शिवणे, गाऊन शिवणे, लहान बाळांचे कपडे शिवणे असे घरगुती व्यवसाय महिला करू लागल्या. त्यामुळे त्यांना कुटुंब खर्चाचा आर्थिक भार पेलणे सुसह्य झाले. आफ्रिन शेख आणि चित्रा पन्नाडी यांना शिवणयंत्राची मदत फेब्रुवारी महिन्यात दिली. यामुळे कोरोनाकाळात घरचा फळ, भाजी विक्रीचा व्यवसाय बंद झाला. मशीन घरी असल्याने व वर्ग पूर्ण केल्याने कोरोना काळात घर चालवणे सुखकर झाले. याशिवाय वर्गाच्या शिक्षिकांनी मास्क शिवून गरजू कुटुंबियांना वाटले. तसेच नवजात शिशूंचे कपडे शिवून दिले.

❖ ❖ ❖

**या नात्यानं मी समृद्ध झालो –** अभ्यासिकेची विद्यार्थिनी कु. निमिता जावळे हिला फोन केला असता आईची तब्येत बरी नसल्याचे समजले. मी त्यांना दवाखान्यात जाण्याचा आग्रह धरला. योग्य ती सर्व काळजी घेऊन तिच्या घरी पोचलो. मला बघून त्या माऊलीला झालेला आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. 'अनिल दादा तू सांगितल्याप्रमाणे दवाखान्यात जाऊन आलो आणि औषधही आणलं आहे' त्यांनी सांगितले. ऐकून बरं वाटलं. काळजी घ्या असे सांगून घरातून बाहेर पडणार तोच आईंनी परत बोलावून घेतले. त्यांना मदत म्हणून कुणीतरी भाजी आणून दिली होती. त्यातली निम्मी भाजी एका पिशवीत भरून त्यांनी माझ्या हाती दिली आणि ती माऊली म्हणाली. 'आईच्या काळजीनं इथवर आलास तर मी पण माझ्या लेकराला शक्य ते द्यायला हवं ना' त्या क्षणी दोघांच्याही डोळ्यात पाणी होतं. केवळ वर्धिनीमुळे अशी जीवापाड प्रेम करणारी माणसं आयुष्यात आली.

**– अनिल काळे**

सेवाकार्यात समाजातील सर्व प्रकारच्या लोकांचे यथोचित समाधान करावयाचे असते.

सस्नेह नमस्कार,

गतवर्षीचे (२०१९-२०) निवेदन करण्यापूर्वी सर्वात आधी आपल्यासारख्या सज्जनशक्तीला विनम्र अभिवादन करावेसे वाटते आहे. गेल्या ९-१० महिन्यात जगभर जे काही घडले त्यावेळी सामान्यातला असामान्य दातृत्वाचा अनुभव आपल्याला आला मग तो कोवीड मदतनिधी असेल, आरोग्यनिधी असेल किंवा विविध कामांच्या मागे आपण उभी केलेली आर्थिक व मानसिक ताकद असेल. या सर्व आव्हानात्मक काळातही वर्धिनीचे काम वाढत राहिले ते केवळ आणि केवळ आपल्यासारख्यांमुळेच.

**२०१९-२० च्या आर्थिक वर्षात केवळ १२.३६% म्हणजेच सुमारे रु. २२ लाख हे प्रशासकीय कामांसाठी खर्च झाले तर तब्बल ८७.६४% म्हणजेच १ कोटी ५६ लाख ६९ हजार मूळ उद्दिष्टांसाठी खर्च झाले.**

चालू आर्थिक वर्षात आपण आपले खर्च २.५ कोटीवरून १.३ कोटीवर आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण आता न्यू नॉर्मल (New Normal) मध्ये तंत्रज्ञानाचा भाग खूप मोठा असणार. त्यानुसार अनेक प्रकारची साधने आपल्याला आवश्यक असणार आहेत. चऱ्होली येथील संकुल लवकरच कार्यान्वित होईल आणि वर्धिनीच्या कामाला नवीन आयाम मिळेल असा विश्वास आहे. त्याचप्रमाणे कातवडी येथील आपल्या जागेच्या जवळील ७ गावांमध्ये तसेच कातकरी वस्त्यांमध्ये आता साप्ताहिक काम उभे रहाते आहे. तेथील आवश्यक गोष्टींसाठीही आपल्याला आपले आर्थिक बळ वाढवावे लागणार आहे.

याच सर्व पार्श्वभूमीवर आपल्याला वर्धिनी मनापासून साद घालत आहे.

❋ आपण आपला वेळ, आपले ज्ञान वर्धिनीच्या कामास लावावे.

❋ आपल्या संपर्कातील समाजातील सज्जन, प्रबुद्ध व्यक्तींना वर्धिनीच्या कामाची माहिती द्यावी.

❋ आपण आपले मित्र, नातेवाईक यांनी वर्धिनीच्या कामाला भेट द्यावी आणि आमचा उत्साह वाढवावा.

❋ आपण व आपल्या मित्रपरिवाराच्या मदतीने वर्धिनीला वस्तू व अर्थ स्वरूपात मदत करावी.

अखेरीस हे राष्ट्र आराधनेचे व्रत आहे. आपण सर्वांनी मिळून पूर्ण करायचे आहे आणि तेही सर्व शक्तीनिशी.

'तन मन धन, जीवनसे हम करे राष्ट्र आराधन' !!

निधीसंकलन हा सामाजिक संस्थेच्या कामातील महत्त्वाचा भाग आहे. हे काम करताना वर्धिनी परिवारातील काही देणगीदार, हितचिंतकांचे आलेले अनुभव...

❋ श्री. खेर बँकेत काम करणारे गृहस्थ. वर्तमानपत्रातील वर्धिनीची माहिती व काम वाचल्यावर त्यांना त्यांच्या लहानपणी परिस्थितीमुळे ज्या अडचणींना तोंड द्यावे लागले त्याच प्रकारच्या अडचणी वर्धिनी सोडवत आहे हे जाणवले आणि हे लक्षात घेऊन त्यांनी वर्धिनीला आर्थिक मदत केली.

❋ श्री. बंकटशेट म्हणाले, ''वर्धिनीचे काम मला आवडले आहे पण त्यातून अशी प्रगती झाली पाहिजे की भरपूर कर भरणारे वर्धक तयार झाले पाहिजेत आणि असे वर्धक वर्धिनीला आर्थिक पाठबळ देतील.''

❋ श्री. साठ्ये सरांचे वडील कै. गजानन साठ्ये किशाभाऊंमुळे वर्धिनीशी देणगीदार म्हणून जोडले गेले. ते स्वतः कमवा-शिका योजनेअंतर्गत वर्धकांना घरी बोलावून त्यांच्याकडून चांगले लेख, पुस्तकं वाचून घेत असत. मुलांवर वाचनाचा संस्कार व्हावा, गोडी लागावी या हेतूने. वडिलांचा वारसा दिलीपजींनी देणगी देऊन जपला आहे आणि त्यांच्या पत्नीनेही आर्थिक मदत देऊन त्या प्रगती पालक म्हणून काम करायला उत्सुक आहेत.

❋ श्री. अतुल वर्धिनीत लहान असताना काही महिने शाखेत आलेला युवक. सध्या एका बहुराष्ट्रीय कंपनीत

उच्च पदावर कार्यरत आहे. त्याच्या या जडणघडणीत वर्धिनीतील संस्कारांचा खूप मोठा वाटा असल्याचे त्याने सांगितले. युवक गटासाठी काम करायची त्याची तयारी आहे.

❊ भारत विकास परिषदेचे कार्यकर्ते श्री. भानू सर. त्यांच्या नातीने नजरचुकीने नो पार्किंगमध्ये गाडी लावली होती. दंड भरायला जवळ पैसे नव्हते तेव्हा वर्धिनीच्या युवकाने तिला मदत केली. 'दंडाचे पैसे परत कुठे करू?' असे विचारल्यावर तो म्हणाला, 'मी रोज 'स्व'–रूपवर्धिनीत जातो, तिथे दिलेस तरी चालतील.' तिने हे घरी सांगितल्यावर तिचे आजोबा, भानू सर स्वतः वर्धिनीत आले. वर्धिनीतले वातावरण, मुलांमधील शिस्त पाहून वर्धिनीचे नियमित देणगीदार म्हणून जोडले गेले.

❊ बदलत्या काळात निधी संकलनासाठी रद्दी संकलनासारख्या नवीन कल्पना, ECS, NEFT या अत्याधुनिक सोयी वापरत आहोत. वर्धिनीचे असंख्य व्यावसायिक युवक कार्यकर्ते, हितचिंतक आणि देणगीदार आर्थिक पाठबळ देत आहेत. खूप जणांना विशेष उल्लेख केलेलाही आवडत नाही. अशांसाठी ज्ञानदेवांच्या ओवी आठवतात.

नाना कृषीवळु आपुलें । पांघुरवी पेरिले । तैसे झांकी निपजलें । दानपुण्य ।।

(धान्य पेरल्यावर त्याच्यावर कुळवाणे माती ओढून शेतकरी ज्याप्रमाणे झाकून टाकतो, त्याप्रमाणे आपणही केलेले दान व पुण्य कोणासही कळू देऊ नये म्हणून स्वहाताने झाकावे, असे ज्ञानदेवांचे सांगणे आहे.)

**– श्री. चंदन डाबी**

❊ ❊ ❊

**मनोगत**

माझा मुलगा आनंद याची स्वामी योगानंद शाखेत निवड झाली. पहिल्याच पालकसभेला किशाभाऊंनी अतिशय तळमळीने 'स्व'–रूपवर्धिनीची संकल्पना मांडली होती. ती मला भावली आणि वर्धिनीबरोबरचा प्रवास सुरू झाला. सुरुवातीला 'पालक' आणि नंतर शाखेतील मुलांच्या अभ्यासातील अडचणी सोडवणाऱ्या 'शिक्षिका' असे माझे नाते अधिकच घट्ट होत गेले. काही वर्षे गेली आणि नंतर इच्छा असूनही कामाच्या व्यापातून वेगळा वेळ देता येत नव्हता. मग मला कार्यकारिणीत सामावून घेतले आणि नव्याने काम सुरू झाले. कामातल्या विविध गरजा लक्षात येऊ लागल्या. त्यात मी जमेल तशी मदत करत होते. तीन–चार महिन्यांतून होणाऱ्या बैठकीतून माझे विचार मांडत राहिले. आजारपणामुळे कामात मर्यादा आली. शरीर दुबळं झालं असलं तरी विचारशक्ती शाबूत आहे, मन टवटवीत आहे तोपर्यंत काम करूयात असा निश्चय केला. त्यामुळे निधी संकलन समितीची सदस्या झाले. देणगी मिळवण्यासाठी नातेवाईक, जवळचे मित्रमंडळी, कंपन्यांचे मालक आणि वेगवेगळ्या न्यासांशी माझा संपर्क होत होता आणि माझ्या विनंतीला आणि वर्धिनीच्या कामाला सकारात्मक प्रतिसाद मिळत गेला. निधी संकलनाच्या बैठकांमधून देणगीसाठी नवीननवीन कल्पना सुचवत राहिले. मुख्य म्हणजे आज यशस्वी झालेल्या युवकांनी ठराविक रक्कम दरमहा द्यावी या सुचनेला चांगला प्रतिसाद मिळाला. मीही माझ्या पेन्शनमधून दरमहा मदत करत आहे.

**– सौ. मेघना अत्रे**

**आपण अजातशत्रू असावं. कुणाबद्दलही वाईट न बोलणं ही सुद्धा संघटनेत खूप मोठी सेवा आहे.**

## भावपूर्ण श्रद्धांजली

✻ माजी राष्ट्रपती, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, भारतरत्न सन्मानित **श्री. प्रणव मुखर्जी** यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले.

✻ स्व. किशाभाऊंचे निकटवर्तीय सहकारी आणि वर्धिनीचे भूतपूर्व कार्याध्यक्ष **श्री कल्याण वर्दे** यांचे दुःखद निधन झाले. विविध सामाजिक, शैक्षणिक संस्थांचे ते आधारस्तंभ होते. रोटरी इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. आपण लोकशाहीत राहतो म्हणजे नेमकं काय आणि आपल्याला नेमकी कशी लोकशाही हवी आहे त्यासाठी तरुणांनी काय करायला हवं याविषयी वर्देसर कार्यकर्त्यांशी अनेकदा बोलत असत. या विचारातून वर्धिनीने एक राज्यस्तरीय युवा अधिवेशन आयोजित केले होते. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी लागणाऱ्या सर्व व्यवस्था त्यांनी त्यांच्या प्रचंड लोकसंग्रहाच्या बळावर उभ्या केल्या. खेळ, नाटक, प्रवास-फोटोग्राफी, लेखन-वाचन अशा अनेक क्षेत्रात वर्देसरांनी आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली होती.

✻ वर्धिनीचे पूर्ण वेळ कार्यकर्ते व कार्यवाह **श्री. ज्ञानेश पुरंदरे** यांचे कोरोना आजाराने दुःखद निधन झाले.

**'स्व'-रूपवर्धिनीच्या परिवारातील हितचिंतक, कार्यकर्ते, देणगीदार व विद्यार्थी आप्तेष्ट यांचे निधन झाले -**

✻ डॉ. ह. वि. सरदेसाई
✻ श्री. रत्नाकर मतकरी
✻ श्री. अरुण फडके
✻ डॉ. अनिल गोडबोले
✻ श्रीमती सईताई मोने (मोने काकू)
✻ श्री. शेखर आफळे
✻ श्रीमती पूनम परदेशी
✻ श्री. दत्तात्रय उदागे
✻ श्रीमती गीतांजली गुंजाळ
✻ श्री. मुकुंद जगन्नाथ पारगावकर
✻ श्री. पेंटय्या लक्ष्मण राचेल्ली
✻ श्रीमती सुषमा प्रकाश चाळके
✻ श्री. संजय बाबाजी साळेकर
✻ श्रीमती इरवा कुर्ले



✻ श्रीमती लीलाताई पाटील
✻ श्रीमती कुसुम लवळेकर
✻ श्री गोपाळराव चिपाडे
✻ श्रीमती भारतीताई पाटणकर-किंजवडेकर
✻ श्री. लक्ष्मणराव परळीकर
✻ श्री. दत्तात्रय बळवंत घाटपांडे
✻ ह.भ.प. दत्तात्रय शंकर गोळे
✻ श्रीमती जयश्री शाम सुरत्राण
✻ श्री. मोहन यादव
✻ श्रीमती ज्योती जयंत मुतालिक
✻ श्री. रविंद्र शंकर शेंडये
✻ श्रीमती स्वाती मनोज गादगे
✻ श्रीमती मंगला भालेकर
✻ श्री. हरिभाऊ शिंदे

या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात वर्धिनीचा सर्व परिवार सहभागी आहे.

## दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागपालक–श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२**

**शाखा विभागप्रमुख–श्री. शुभम जगताप ✆ : ९७६३४७१३७२**

### भाग १ (पूर्व शहर विभाग)

**भागप्रमुख : श्री. रोहित धायरकर ✆ : ८३७८८३६६०८**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **समर्थ रामकृष्ण शाखा** | बाबुराव सणस कन्याशाळा, २२/१, मंगळवार पेठ, पुणे – ११. | **कु. अमित भांड** ✆ : ७९७२२४२७५० |
| **स्वामी योगानंद शाखा** | एम. ई. एस. भावे हायस्कूल, (पेरुगेट) सदाशिव पेठ, पुणे – ३० | **कु. हृषिकेश टक्के** ✆ : ७०५७२७२१८६ |
| **स्वामी श्रद्धानंद शाखा** | म. गांधी विद्यालय घोरपडे पेठ, पुणे – ४२ | **कु. प्रथमेश पासलकर** ✆ : ८७९६०६५२२४ |
| **वीर अभिमन्यू बालशाखा** | 'स्व'–रूपवर्धिनी वास्तू २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ११ | **कु. प्रियांका घारे** ✆ : ९७३०८३०१६९ |

### भाग २ (बिबवेवाडी विभाग)

**भागप्रमुख : श्री. किशोर बेंडगे ✆ : ९८३४७३४३३४**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **स्वामी अखंडानंद शाखा** | सीताराम आबाजी विद्यालय, बिबवेवाडी, पुणे – ३७ | **कु. आकाश शेडगे** ✆ : ८६६९०३७४९५ |
| **स्वामी दयानंद सरस्वती शाखा** | प्रियदर्शनी शाळा, व्हीआयटी शाळेशेजारी, बिबवेवाडी, पुणे ३७ | **कु. प्रणव पोळ** ✆ : ९१४५१६९७५२ |
| **स्वामी शिवानंद शाखा** | वि. स. खांडेकर शाळा, सहकारनगर, पर्वती, पुणे–९. | **कु. आशितोष कांबळे** ✆ : ७३५०५३४०९१ |
| **धर्मवीर शंभू राजे शाखा** | प्रेरणा माध्यमिक विद्यालय, गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | **श्री. अजय रायकर** ✆ : ९०९६८५९६२४ |
| **ओंकार शाखा** | ओंकार ट्रस्ट, गुजरवाडी कात्रज, पुणे ४६ | **श्री. राकेश लगदिवे** ✆ : ८७९३७७३११६ |

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. प्रसाद गजमल** ✆ : ९७६७८९०३४०, **श्री. अशोक इंगवले** ✆ : ९८८१५५८१८०

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| स्वामी सुबोधानंद शाखा | पंडित दीनदयाळ उपाध्याय विद्यालय, एरंडवणे गावठाण, पुणे - ५२ | कु. सुरज कनाल ✆ : ८४५९०९५६११ |
| राजर्षी शाहू शाखा | सम्राट अशोक विद्यालय, कर्वेनगर, पुणे - ५२ | श्री. सत्यम तांबडे ✆ : ७८७५८९६८४३ |
| स्वामी ब्रह्मानंद शाखा | म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे - ५१ | कु. ओम इंजतकर ✆ : ८३०८१९५५०१ |
| नरवीर तानाजी मालुसरे शाखा | बंडुजी खंडुजी विद्यालय, धायरी. पुणे-४१ | कु. सागर चव्हाण ✆ : ९९७०५४९४२ |
| जनता वसाहत वस्ती | सीताराम जावळे प्राथमिक शाळा, जनता वसाहत, पुणे-९ | कु. मुरली गायकवाड ✆ : ९६८९८१०६९२ |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. सुरेश पवार** ✆ : ९१७५२०१२२९

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| स्वामी विवेकानंद शाखा | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे-१६ | कु. चेतन धोत्रे ✆ : ८३९०१९०३८७ |
| स्वामी अभेदानंद शाखा | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे - १६ | कु. रोहन धाडवे ✆ : ७८८७४०७१९९ |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : सौ. कोमल कुलकर्णी-धायरकर** ✆ : ९६२३२१५४३०

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| भगिनी निवेदिता शाखा | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११ | कु.समृद्धी यादव ✆ : ९१४५४०१७१३ |
| क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शाखा | महर्षी शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे - ४२ | कु. प्राजक्ता कांबळे ✆ : ७८७५५८०१७२ |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार - सायं. ६ ते ८.३०, शनिवार- दु. ४.३० ते ७.३०, रविवार- स. ७.३० ते १०.३०

## शारदामणि महिला विभाग

महिला विभाग पालक – **श्रीमती पुष्पाताई नडे ✆ : ९८२२८२३७५७**

महिला विभाग प्रमुख – **श्रीमती बागेश्री पोंक्षे ✆ : ९४२०४८१२४४**

महिला विभाग सहाय्यक – **सौ. सुनिता गंगावणे, सौ. मंजुषा कुलकर्णी**

'पाकोळी' बालवाडी प्रमुख – **सौ. संगीता शेडगे** बचतगट समन्वयक – **सौ. वनिता जगताप**

## उद्योगशिक्षण वर्ग

१) रुग्ण सहाय्यक (पुणे वर्ग) – **सौ. लता सत्तूर, कु. अतिशा भोसले**
रुग्ण सहाय्यक (माले वर्ग) – **सौ. दुर्गा केणी, सौ. साधना सातपुते**

२) शिवण वर्ग (पुणे) – **सौ. संगीता पाटील, श्रीमती मनीषा कुलकर्णी**

३) साक्षरता प्रसार – **श्रीमती सुगंधाताई कबीर**

## प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

| **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र** | **अभ्यासिका केंद्र** | **ग्रंथालय** |
|---|---|---|
| सौ. मनीषाताई नरडेकर | श्री. विनोद मोरे | श्रीमती नीला कुडलिंगार |

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

पालक – श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

विभागप्रमुख – श्री. विश्वास कुलकर्णी ✆ : ८६००१०१३०७

## विस्तार विभाग

**शाखा उपक्रम – वर्धिनीची उपकेंद्रे**

१) लक्ष्मीकेशव प्रतिष्ठान, सातारा

२) सेतू चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर

**रुग्ण सहाय्यक वर्ग**

१) योगेश्वरी हॉस्पिटल, दौंड २) भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, सांगली

३) हरिजन सेवक संघाचे गांधी छात्रालय, बार्शी

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

# असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२

२) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४

२) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९

२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८

३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

कुटुंब सल्ला केंद्र – दुसरा व चौथा शनिवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*

२) अभ्यासिका

३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी

२) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण

३) साक्षरता वर्ग

४) सहाय्यक परिचर्या वर्ग

५) शिवण वर्ग

६) बचतगट

७) कुटुंब सल्ला केंद्र

८) वस्ती विकास प्रकल्प – 'उत्थान'***

९) फिरती प्रयोगशाळा /ग्रामविकास प्रकल्प**

१०) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.

** हा प्रकल्प पुणे व परिसरातील ४० शाळांमध्ये चालतो.

*** कसबा, भवानी, सोमवार व मंगळवार पेठ येथील वस्तींमध्ये संध्याकाळी.

उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळांमध्ये चालतात.


**कार्यालय विभाग**

श्री. निलेश मांडगे

श्रीमती प्रगती तांबट, श्रीमती नीला कुडलिंगार,

श्री. चंदन डाबी (समन्वयक – निधी संकलन)

सौ. मेघा नगरे (समुपदेशन विभाग)

(०२०) २६१२१७०४

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११

**संपर्क**

सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

# प्रार्थना



नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।



हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।





जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।। ३ ।।



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।

कोणतंही काम सुनियोजितपणे होण्यासाठी आणखी एका गोष्टीची आवश्यकता असते.
इतर सर्व गोष्टी विसरून हाती घेतलेल्या कामाशी एकरुप होणे.

# CHIRRANTAN

2, Swaroop Apartment, Bhigwan Road, Baramati, Dist. Pune | **M. : +91 9422503047**

Advance & Specialized technologies in Water & waste water treatment

**- V Wire under Drain Systems**
**- Rapid Gravity Sand Filters**
**- Screening Solutions**
**- WTP Strengthening, Coating and Augmentation**
**- Water Distribution Pump and Piping**

***We Design, Construct and Operate***
Water treatment Plants
Sewage treatment Plants
Effluent Treatment Plants
Pressure Filters
Distribution piping and pumping

***Expertise Services***
Plant augmentation & up-gradation
Operation & Maintenance Services
Trouble shooting Services for small & big treatment Plants
Specialty Chemicals & Consumables

**Contact - Email : chirrantan.baramati@gmail.com**
**Contact : 9765822950, 7083139790**

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## Rahul Parkhi

Member Divisional Manager's Club
Agents Code No. : 32036 953

## LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

**Off. :** Br. No. 953, Camp, Aditi Complex, 2-Floor, G.T. Road, Pune - 411001
**Resi. :** Welcome City, A 2/303, Sukhsagar Nagar No. 2, Katraj, Pune 411046
**Tel. : (M) 9822478707, 9881493006**
**E-mail : insure.with.rahul@gmail.com**


कोणतीही क्रिया निरंतर होऊ शकत नाही, तर यथाकाळीच होऊ शकते.
कारण प्रत्येक क्रियेचा आरंभ अंत होत असतो.



SHARDUL ENTERPRISES

SE

**LESS DIRT, MORE SHINE, MORE COLOURS**

The best Residential and Commercial deep cleaning service in Pune.
Now with Painting Services also

**With over 5 years of experience, our highly skilled cleaning team, ensuring reliable and expertise service with quick response, make your home and office look new and feel new.**

**Connect us**
**+91 96 89 934597**
**enterprises.shardul@gmail.com**
**Visit us on -**
**www.shardulservices.com**

*With Best Compliments From*

# M/S KBC Systems

- **Cold Storage and Refrigeration Engineers**
- **Manufactures of Surface Coating Systems**
- **Authorized Distributor for TTK Healthcare Ltd.**
- **Panipuri and other Fryums product for Maharashtra**
- **DAIKIN Channel Partner in Low Temperature Application**

***Vijay Bane***
9422301700

***Suhas Bane***
9422001308

सेवाकार्याच्या स्मरणाच्या जागृतीसाठी कार्याशी आत्मियता असली पाहिजे. ही आत्मियता जितकी दृढ होईल तितकीच सेवाकार्याची स्मृती वारंवार होत असते. (राहील).

With Best Compliments From

**THE POONA MOTOR GOODS TRANSPORT**

❖ *Fleet-Owners & Transport Contractors*
❖ *Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa*
❖ *Full truck load service for Maharashtra & Gujrath State*

❖ ❖ ❖

**Head Office :** 780, Sadashiv Peth,
Pune 411 030.
Phone : 24473222, 24477621, 24476914

❖ **Branch** ❖
137, Transportnagar, Sector 23, Nigdi, Pune 44.
Phone : 27656925, 27656935

❖ **Branch** ❖
13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi,
Girgaon, Mumbai 4,
Phone : 23822538, 23862210

❖ **Branch** ❖
Ramraj Yadav Chal, Gala No. 2,
90 Ft. D.P. Road, Sakinaka,
Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400 072,
Phone : 28513018

**With Best Compliments From**

**PROTOTYPE ENGG. CO.**

**Govt. Approved Valuers**
**for Plant Equipment/Machinery**
**Consulting / Chartered Engineers**

**Tel. : 22662496, 22631214,**
**Cell : 9820302436**
**E-mail : vijayswar@hotmail.com**

**Mahendra P. Oswal**

**Cell : 9822028189**

**M/s. D. Pratap**

**Iron Merchants & Suppliers**

1196, Bhawani Peth, Pune - 411 042

**Ph. : 26383585, 26383595**

**Resi. : 24264847, Fax : 26388607**

**E-mail : dpratap.oswal@gmail.com**

**※ सर्व प्रकारचे कर वेळेवर भरा ※ देशाच्या उन्नतीमध्ये पुढे व्हा ※ देशाचे सच्चे नागरिक बना**

# व्यापारी मित्र

व्यापारी, उद्योगपती, चार्टर्ड अकौंटंट, कर सल्लागार, करदाते, दिवाणजी, कॉलेज विद्यार्थी, सहकारी संस्था, पतसंस्था, कर अधिकारी, कॉलेज व सर्वसामान्य व्यक्ती इ. मध्ये लोकप्रिय असलेले

**१९५० पासून नियमित प्रकाशित होणारे व्यापारी मित्र**

**– मासिकातील नेहमीची सदरे –**

१) व्यापारी बंधूंनी घ्यावयाची दक्षता २) आयकर, जीएसटी, कायद्याचा सल्ला, न्याय-निवाडे, दुरुस्त्या ३) अन्य कायदे निर्णय ४) विविध कायदे विभाग ५) आरोग्य विभाग ६) व्यवस्थापन-यशस्वी लोकांचे जीवन दर्शन

**मासिकाची वार्षिक वर्गणी रुपये ७००**

**सवलतीची योजना –** २ वर्षे – १३०० रुपये, ३ वर्षे – १९०० रुपये

वर्गणी रोख, मनिऑर्डर, एनईएफटीने अथवा ॲटपार चेकने भरावी

वर्गणी पुढील नावाने पाठवावी – **व्यापारी मित्र पब्लिकेशन्स प्रा. लि.**

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, शामराव कलमाडी हायस्कूलसमोर, पुणे ४

**फोन : ०२०-२५४३ १०९४/४१२६ ७३६०, ९४२१८ ८०२९०**

**E-mail :** sampadak@vyaparimitra.com, **Website :** www.vyaparimitra.com, **Facebook :** vyaparimitra

**※ आपल्या मित्रांना 'व्यापारी मित्र' वार्षिक भेट म्हणून पाठवा ※ व्यापारी मित्रातील माहिती जुनी होत नाही. सर्व अंक सांभाळून ठेवा.**



शिक्षणाच्या वाढत्या खर्चासाठी,
आता मदत जनता बँकेची!

जनता
एज्युफ्लेक्स
कर्ज योजना

मान्यताप्राप्त संस्थेचे कोर्स / डिग्री / डिप्लोमा तसेच हॉस्टेल फी / संगणक
व साहित्य खरेदी इत्यादींसाठी अर्थसहाय्य

देशांतर्गत विद्यापीठांसाठी ₹ 10* लाख | परदेशी विद्यापीठांसाठी ₹ 20* लाख

विशेष सवलतीचा आकर्षक व्याजदर । ड्रायपीरिएडसह जास्तीतजास्त १० वर्षे कर्जमुदत

● नेट बँकिंग ● मोबाईल बँकिंग (IMPS) ● एनी ब्रँच बँकिंग ● एटीएम ● परदेशी चलन विनिमय

*अटी व नियम लागू.

जनता सहकारी बँक लि., पुणे
(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ,
थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२.
फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
(बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून)
www.janatabankpune.com



Designer Model
(with chain & gear)



95 T - 10 Model



NL-737/747/757
Novel 3/4/5 Thread
High Speed Machine Overlock



NL-781
Button Hole Machine



Designer Auto Zigzag
Portable Models
DA 33 / 39 / 55

NOVEL SEWING MACHINES

777, Raviwar Peth, Pune - 411002

Tel : 020-24458207, 24458318 Fax : 24472797
Email : novelsm@gmail.com
Pimpri : 206, Mumbai Pune Road, Pimpri Chowk, Pimpri, Pune - 18.
Tel : 27426853, 27424504. email : novel.pimpri@gmail.com
Kolhapur : 464, Shahu Rd., Shahupuri, Kolhapur - 01.
Tel : 0231 2657115 / 2653528 / 2652365

Website : www.novelsewingmachines.com



आपण पाहत असतो ते डोळ्याने. डोळ्यावर मन शासन करते, मनावर बुद्धी,
बुद्धीवर अहम् शासन करतो. जो अहम्‌वर शासन करतो तो अनुशासित होय.

**With Best Compliments**
**From -**

# N. R. BALDOTA FOUNDATION
# &
# SMT. S. N. BALDOTA TRUST

"Krutanjali" Shangrila Restaurant Lane,
65/20, Erandavana, Law College Road,
PUNE - 411 004

**Contact -**

**Tel. : 2543 2300 / 2543 3000**

कार्याच्या ठिकाणी मनाचे आकर्षण झाले पाहिजे, मग त्याचे ठिकाणी स्वाभाविक मन लागते.

With Best Compliments From

# CADMOSIL CHEMICALS PVT. LTD.

(Mfg. of Photo Resists & Allied Chemicals)

A-58, MIDC-Latur
Latur 473531.
www.imagetechindia.com



इच्छा, बुद्धिमत्ता, क्षमता व शक्ती ही सर्व एका प्रकारच्या सुप्त उर्जेचीच विविध रुपे आहेत.

With
Best Compliments
from

**JAYASINH V. MARIWALA**

**TRUSTEE**

**THAKKAR K. M. BHATIA NIWAS &**

**THAKKAR V. CHAWL TRUST**

## WITH BEST COMPLIMENTS FROM : DEODHAR GROUP

### PRODUCT COATING

*An ISO 9001 : 2008 Certified Company*
*Manufacturing & Supply of*
*Resin coated sand,*
*shell cores & core assemblies*

### DECENT DECORATORS

*For Quality Coatings*
*Industrial and Decorative*
*painting contractors*
*Civil Engineers & Contractors*

### JANSEVA BHOJANALAYA

*Maharashtrian Dining Hall*

### MEHFIL CATERING SERVICES

**Vrindavan Banquet Hall**

*Two Marriage Halls with*
*Ample Parking Space*

### RAMRAI

*Farming, Horticulture, Nursery*

**Chinchwad Office :** Plot No. 81, D-III Block, MIDC, Chinchwad, Pune 411019.
Telephone : 27473730, Web : decentdecoratos.com
Email : product_coating@yahoo.com,
decentdecoratorspune@gmail.com

**Pune Office :** 759/55, B, Deccan Gymkhana, Pune 411004
Telephone : 25678217, 25679488, Fax : 25679497



'SWA'-ROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR / 2007 / 26609 24 / 12 / 2008
Concessional postage under Regd. No. PCW / 148 / 2020-2022
DT. of Publication - 25th every month
Dt. of Posting - at PSO Kasba Peth, Pune on 25th of every month


प्रति, ______________________________
______________________________
______________________________


हे मासिक ‘स्व’रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक श्री. नंदकुमार कानडे, प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे – २ येथे छापून व प्रकाशक श्री. विश्वास विनायक कुलकर्णी यांनी २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ११ येथे प्रसिद्ध केले.